CMYK

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ८ अंक : ३४ सोमवार दि. १० ऑगस्ट २०२० ते रविवार दि. १६ ऑगस्ट २०२० पाने : ८ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## पती, पत्नी आणि दोन मुलांचे निर्घृणपणे गळे चिरले
## जवानाच्या कुटुंबातील हत्याकांडाने नाशिक हादरले

नाशिक/क्राईम रिपोर्टर

संपूर्ण महाराष्ट्रात अनलॉकची प्रक्रिया सुरु होवून आता हळूहळू लोक कामधंद्याच्या निमित्ताने घराबाहेर पडत असतानाच संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून टाकणारी एक भयंकर घटना नाशिक जिल्ह्याच्या वाखरी गावात घडली आहे. शेतातल्या घरात शांतपणे झोपलेल्या चव्हाण कुटुंबातील पती पत्नी आणि त्यांच्या दोन चिमुकल्या मुलांची अत्यंत निर्दयपणे गळे चिरून हत्या करण्यात आली आहे. मात्र या हत्ये मागे नेमके कोणते कारण आहे आणि हे भयंकर हत्याकांड कोणी घडवून आणले? याबाबत पोलिसांना अजूनही काही माहिती मिळालेली नाही. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या बाबत गावातले लोकही स्पष्टपणे काही बोलायला तयार नसल्याने पोलिसांच्या तपासाची गाडी जागेवरच अडकली आहे. तरीही पोलिसांना जी काही थोडीफार माहिती मिळाली आहे त्यावरून हे हत्याकांड भावकीतील वादातून किंवा अनैतिक संबंधातून झाले असावे अशी शक्यता पोलीस वर्तवित आहेत. सध्या या भयंकर हत्याकांडाचा तपास मालेगाव मनमाड नांदगाव आणि एलसीबी अशा चार पोलीस पथकाकडे असून जिल्ह्यातील वरिष्ठ पोलीस अधिकारी तपासावर लक्ष ठेऊन आहेत. तसेच पोलिसांनी खाबऱ्यांचे नेटवर्क हि सक्रीय केले आहे. त्यामुळे लवकरच या भयंकर हत्याकांडाचा पर्दाफाश करून आरोपींना गजाआड करण्यात आम्हाला यश येईल असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला असला तरी या हत्याकांडाचे गुढ पोलिसानाही चक्रावून टाकीत आहे. मात्र चोरीचा अनगळ पोलिसांनी फेटाळून लावलाय. ...पान ६ वर






### ते दुर्दैवी कुटुंब लष्करी जवानाचे...



वाखरीच्या मालावर असलेल्या शेतातल्या घरात ज्या चव्हाण कुटुंबाचे हत्याकांड झाले. त्यातील कुटुंब प्रमुख समाधान अण्णा चव्हाण याचा धाकटा भाऊ दादाजी चव्हाण हा लष्करात असून त्याची सध्या जम्मू काश्मीर मध्ये पोस्टिंग आहे, तर त्याची पत्नी माहेरी आहे. तर दादाजी आणि मृत समाधान यांचे आई वडील काही दिवसांपासून मुलीकडे राहायला गेलेत. अशा तऱ्हेने या लष्करी जावांच्या भावाला वाहिनीला आणि भावाच्या दोन लहान मुलांना निर्घुणपणे ठार मारण्यात आल्याने संपूर्ण नाशिक जिल्ह्यात संतापाचे वातावरण आहे. या घटनेची माहिती दादाजी चव्हाण यांना कळवण्यात आली असून त्यांनाही मोठा धक्का बसलाय.

## वसुलीच्या त्रासाला वैतागला फार
## कर्जदारानेच केले सावकाराला ठार

पुणे/राजेंद्र वेदांते



आजकाल गुन्हेगार लोक वाम मार्गाने कमावलेला पैसा व्याजाला लावतात आणि त्याच्याकडून जबरदस्तीने डबल ट्रिपल पैसा व्याजाच्या रूपाने वसूल करतात. मात्र महाराष्ट्रात सावकारी प्रतिबंधक कायदा अस्तित्वात असतानाही सावकारीचा धंदा तेजीत आहे. मात्र या सावकारी पाशात अडकून अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याते. पुण्याच्या कोंढवा परिसरात एका कर्जदारानेच सावकाराची हत्या केल्याने मोठी खळबळ माजली आहे. कारण सावकार पप्पू पडवळ हा मोठा क्रिमिनल होता आणि अशा माणसाची हत्या झाल्याने लोकही हादरून गेलेत. पोलीस या प्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

सावकाराचा फास भल्याभल्यांना यमसदनी धाडतो. म्हणून खाजगी व्यक्ती कडून कोणी कर्ज घेत नाही. त्या व्यक्तीचा कर्ज वसुलीसाठी तगादा आपल्या मागे लागतो. कर्ज फिटले तरी व्याजाच्या रक्कमेसाठी सतावणारे काही सावकार आजही कर्जदारांची पिळवणूक करण्यात व्यस्त आहे. खाजगी सावकारांचा तगादा वसुलीसाठी भल्याभल्याना नाकी नऊ आणतो, कितीही पैसे दिले त्या सावकाराची पैशाची भूक काही भागत नव्हती. म्हणून संतापाच्या भरात आणि या सावकाराच्या फासातून सुटका करून घेण्यासाठी त्याने सावकाराचा मूडदा पाडला. पोलीसांच्या चौकशीत या सावकाराने ज्याला पैसे दिले त्यानेच या सावकाराचा खून केला असल्याचे स्पष्ट झाले. पुण्यातील कोंढवा परिसरात ११ जुलै रोजी एका सावकाराची हत्या करण्यात आली होती. त्या घटनेमागील गूढ उलगडण्यास पोलिसांना यश आले असून पोलिसांनी या प्रकरणी तिघांना अटक केली आहे. घनश्याम उर्फ पप्पू पडवळ (वय ५१) असे खून झालेल्या नाव आहे. तर लतिफ बाबू शेख (वय ४३), शुभम प्रमोद कासवेकर (वय २४) आणि शुभम संतोष उबाळे (वय २२) या तिघांना ...पान २ वर

## चारित्र्याचा संशय अखेर प्राणावर बेतला
## निर्दयी पतीने पत्नीचाच जीव घेतला







नवी मुंबई/एस.कुमार

काही लोकांना सुंदर पत्नी हवी असते. मात्र पत्नीच्या याच सौंदर्यामुळे कधी कधी त्यांच्या मनात संशयाची पाल चुकचुकत असते. आपली सुंदर पत्नी आपल्या मागे दुसऱ्या कुणाला तरी जवळ करीत नाही ना? अशी शंका त्यांच्या मनात येवू लागते. अशावेळी एखाद्या ओळखीच्या किंवा नात्यातल्या माणसाबरोबर जरी ती बोलताना दिसली तरी पतीच्या डोक्यात संशयाचे भूत शिरते आणि संशय खूप वाईट असतो. माणसाला सतत अस्वस्थ करीत असतो आणि याच अस्वस्थतेतून सुखी संसारात ठिणगी पडते आणि भांडणे सुरु होतात. आणि या भांडणातूनच संशयी माणूस टोकाचा निर्णय घेतो.

नवी मुंबईतील राबाले येथे राहणाऱ्या अंबुज आणि नीलम या पती पत्नीच्या बाबतीतही हेच घडले. अंबुजने नीलमच्या चारित्र्यावर संशय घेऊन एकेदिवशी तिला मित्राच्या घरी नेऊन ठार मारले आणि तिचा मृतदेह पिंपात घालून फेकून दिला. मात्र कोणताही ठोस पुरावा नसतानाही पोलिसांनी आरोपीला अटक केली. ...पान २ वर

## जेलमध्ये शस्त्र पोहचली कुणालाच नाही कळाले
## पिस्तुलाचा धाक दाखवून तीन कैदी पळाले







जळगाव/क्राईम रिपोर्टर

देशातील कारागृहानंची सध्याची स्थिती तिथली सुरक्षा व्यवस्था आणि कैदी व तुरुंग प्रशासनाचे साटेलोटे हा खरोखरच दिवसेंदिवस चिंतेचा विषय बनतोय. कारण कारागृहातून कैदी पळून जाण्याच्या घटना वाढत चालल्या आहेत. विशेष म्हणजे कैद्यांकडे मोबाईल आणि पिस्तुले असल्याने जेल मधूनही त्यांचा बाहेरच्या जगाशी संपर्क असतो आणि याच संपर्काचा वापर करून ते जेल मधून पळूनही जातात. जळगाव उप कारागृहात २५ जुलै रोजी अशीच घटना घडली. सुरक्षा रक्षकाला पिस्तुलाचा धाक दाखवून तीन कैद्यांनी जेल मधून पलायन केले. विशेष म्हणजे त्या तीन कैद्यांमध्ये एक दरोड्याच्या प्रकरणातला निलंबित पोलीस आहे. या घटनेने जेल प्रशासन हादरून गेले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.

दरोडा व प्राणघातक हल्ला यासारख्या गंभीर गुन्हयात बंदी असलेल्या तीन कैद्यांनी थेट कारागृह रक्षकाच्या डोक्याला पिस्तूल लावून, गळा दाबून चाव्या हिसकावत कारागृहातून पलायन केले. २५ जुलैच्या पहाटे हा थरारक प्रकार जळगाव उप कारागृहात घडला. यातील एक कैदी हा दरोड्याच्या गुन्हयातील बडतर्फ पोलिस कर्मचारी आहे. विशेष ...पान २ वर

## मुलाच्या रडण्याने त्यांचे कामच बिघडले
## वार्ड बॉयचा खून करणारे रंगेहात सापडले

नागपूर/क्राईम रिपोर्टर

कोणत्याही वाईट गोष्टीचा शेवटही तितकाच वाईट असतो आणि खास करून अनैतिक संबंध तर घातकीच असतात. कारण ते कधीना कधी उघडकीस येतात आणि त्यातून एखाद्याचा जीव जाण्याचीही शक्यता असते. नागपूरच्या कामठी मधेही तसेच घडले. रुग्णालयात काम करणाऱ्या एका वार्ड बॉयच्या पत्नीचे शेजाऱ्यासोबत अनैतिक संबंध होते. मात्र या संबंधात अडसर ठरणाऱ्या पतीचा काटा काढण्याचा तिने प्लान केला आणि मध्यरात्री प्रियकराच्या मदतीने तिने पतीचा उशीने तोंड दाबून खून केला. पण यावेळी झालेल्या झटापटीत त्यांच्या पाच वर्षाच्या मुलाला जाग आली आणि तो जोरजोराने रडू लागताच शेजारी जागे झाले आणि त्यांनी तत्काळ पोलिसांना बोलावून तिन्ही आरोपींना रंगेहात पकडून दिले.

पत्नीने तिच्या प्रियकर व त्याच्या चुलत भावाच्या मदतीने अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या पतीचा उशीने नाक तोंड दाबून खून केला. ही घटना गुरुवारी मध्यरात्री ३ वाजताच्या सुमारास घडली असून, पोलिसांनी आरोपी पत्नीसह अन्य दोघांना अटक केली. राजू हरिदास कोकुर्डे (३५) असे मृताचे नाव असून, अटकेतील आरोपींमध्ये त्याच्या पत्नीसह रुपेश दिलीप बिराह (३५) व त्याचा चुलत ...पान २ वर


## नकली पोलीस बनून मामा भाचीने अनेकांना फसवले
## असली पोलिसांनी त्या दोघांना तुरुंगात नेऊन बसवले

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर

माणसाकडे पैसा नसेल किंवा पैसा मिळवण्याचे कोणतेही साधन उपलब्ध नसेल अशावेळी त्याला जगण्यासाठी काहीतरी करून पैसा मिळवावाच लागतो आणि त्यातूनच गुन्हेगारीकडे त्याची पावले वळतात आणि आजकाल गुन्हेगारीत महिलाही मागे राहिलेल्या नाहीत. अगदी सेक्स रॅकेट चालवण्यापासून ते पैशासाठी एखाद्याचा खून करण्यापर्यंत महिलांनी सगळ्याच क्षेत्रात प्रगती केली आहे. कोल्हापूरच्या गारगोटी मध्ये राहणाऱ्या एका तरुणीला पोलीस अधिकारी व्हायचे होते, पण तिला पोलीस खात्यात संधी मिळाली नाही म्हणून मग तिने आपल्या मामाच्या मदतीने नकली सीआयडी अधिकारी बनून पोलीस खात्यात नोकरी लावण्याच्या बहाण्याने बेरोजगारांना फसवायला सुरवात केली. पण अशा प्रकारचे धंदे जास्त दिवस चालत नाहीत. कधीना कधी आरोपी पकडले जातात. या मामा भाचीच्या बाबतीतही तेच झाले आणि त्यांना जेलची हवा खावी लागली.



आरोपी प्रियांका चव्हाण



CRIME INVESTIGATION DEPARTMENT
POLICE DEPARTMENT
NAME:- Miss. Pratiksha Prakash Salavi
ADDRESS:- At/P Nilpan, Pin code: 416223 Tal- Bhudaragad, Dist- Kolhapur
DATE OF BIRTH:- 29 April 2001
BATCH:- 08/L9264/20
RANK:- Constable
POSTED:- All India (Maharashtra)
Mr. Ritesh Laube, DGP

प्रतिक्षा साळवी हिला देण्यात आलेली फेक आयडी.

गारगोटी येथील प्रियांका चव्हाण ही बावीस वर्षीय युवती स्मार्ट आणि हुशार होती. तिचे बोलणे हे गोड आणि लाघवी असे होते. गारगोटी येथील सामान्य कुटुंबातील प्रियांका हिचे जीवनात मोठे होण्याचे स्वप्न होते. त्यासाठी काही ही करण्याची तिची तयारी होती. तशी ती शिक्षणात हुशार असल्याने तिने पदवीपर्यत कसे तरी आपले शिक्षण पुर्ण केले. नंतर तिने नोकरीसाठी प्रयत्न केले पण त्यात तिला म्हणावे तसे यश आले नाही. तिला मोठया पदावर ...पान २ वर

## सासरा-मेहुण्यावर फुकटचा आळ आला
## दारुड्या जावयाचा खून कुणी केला?

पुणे/क्राईम रिपोर्टर

दारुडा माणूस हा नेहमीच कुटुंबासाठी डोकेदु:खी ठरलेला असतो. कारण असा माणूस एकतर कामधंदा करीत नाही आणि दारूसाठी सतत घरच्यांना सतावत असतो. त्यामुळे अशा माणसाला कुटुंबातले लोकही वैतागलेले असतात. पिंपरी चिंचवडच्या चऱ्होली गावठी तसेच घडले. उदय लोखंडे नावाच्या दारूड्याचे नेहमीच सासरच्या मंडळींशी भांडणे व्हायची आणि एकेदिवशी उडायची हत्या झाली. त्यामुळे उदयच्या बापाने त्याच्या सासऱ्याकडे आणि मेव्हण्याकडे बोट दाखवले. त्यामुळे त्या दोघांना अटक झाली, पण प्रत्यक्षात उदयचा खून झाला, तेंव्हा ते त्याचा सासरा आणि मेव्हणा त्या भागात हजरच नव्हते. त्यामुळे उदयचा खून कुणी केला याचा आता पोलीस तपास करीत आहेत.

कौटुंबिक वादातून जावायचा खून केल्याची खळबळजनक घटना पिंपरी चिंचवडमध्ये घडली आहे. या प्रकरणी सासरा आणि मेव्हण्याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पिंपरी चिंचवड शहराजवळील चऱ्होली गावा शेजारी असलेल्या मोकळ्या एका घराजवळील मोकळ्या जागेत गुरुवारी दुपारच्या ...पान ६ वर

## मुलांच्या भविष्याचा खेळखंडोबा झाला
## आईला ठार मारून बाप तुरुंगात गेला

सांगली/क्राईम रिपोर्टर

संसारात सामंज्यासपणा आणि विश्वास खूप महत्वाचा असतो. तरच संसार टिकून राहतो. पण एकदा का पती किंवा पत्नीच्या डोक्यात एकमेकांविषयी संशयाचा किडा वळ वळायला लागला कि मग संसारात वादळ सुरु होते आणि याच वादळात संपूर्ण संसार उध्वस्त होतो. खास करून पतीच्या मनात पत्नीविषयी संशय निर्माण होणे हि धोक्याची घंटी असते. अशा वेळी पत्नीने वेळीच सावध व्हायचे असते, पण जर का सावधानता बाळगली नाही तर प्राणावर बेतू शकते. सांगली जवळच्या कुपवाड नगरमध्ये कामानिमित्त आलेल्या आणि भाड्याने राहणाऱ्या रामचंद्र हाके याच्या बाबतीतही तसेच झाले. त्याला दारूचे व्यसन लागल्याने तो दारूच्या नशेत पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागला. त्यातून पती पत्नी मध्ये रोज भांडणे होऊ लागली आणि याच भांडणातून एके दिवशी रामचंद्रने पत्नीच्या डोक्यात दगड घालून तिची हत्या केली. मात्र या घटनेने त्यांची तीन लहान मुले अनाथ झाली. कारण आईची बापाने हत्या केल्याने तोही तुरुंगात गेला आणि आईही जग सोडून गेली. या घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.



मयत अर्चना हाके



आरोपी रामचंद्र हाके

जत तालुक्यातील शिंगणापुर येथील रामचंद्र हाक्के याचा विवाह गेल्या काही वर्षापुर्वी सलगरे येथील अर्चनाशी झाला होता. अर्चना ही दिसायला देखणी आणि सुंदर होती. बघता बघता त्याच्या लग्नाला दोन तीन वर्ष सरली होती. रामचंद्र हा गावातच राहुन मोलमजुरीचे काम करीत होता. तर अर्चना ही घर काम सांभाळत होती. दिवसा मागून दिवसा असेच जात होते. ...पान ६ वर

## सासरच्या छळामुळे जगणे मुश्कील झाले
## प्लॉटसाठी पतीनेच पत्नीला ठार केले

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी



मयत सना

देशात हुंडा प्रतिबंधक कायदा असतानाही हुंड्यासाठी विवाहितांचा सासरच्या मंडळींकडून छळ केला जातोय. त्यांना कधी जिवंत जाळले जातेय, तर कधी आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले जात आहे. बरे लग्नात मुलीचा आई–वडिलांकडून योग्य तो मानपान करूनही सासरच्या मंडळींची हाव वाढतेय आणि त्यातून विवाहितेचा छळवाद सुरु होतो. तिचे जगणे असह्य केले जाते. कधी कधी तर सासरचे पुरुष तिच्यावर लैंगिक अत्याचारही करतात. त्यामुळे आता तरी हुंडा प्रतिबंधक कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी करावी अशी मागणी महिला संघटना करीत आहेत. सोलापूर जिल्ह्यातील माढा येथेही अशाच एका घटनेत प्लॉट नावावर करण्याच्या मागणीतून तसेच चारित्र्याच्या संशयातून सासरच्या मंडळीनी एका विवाहितेची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी त्या महिलेचा पती यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.






सोलापूर जिल्ह्यातील माढा शहरात शुक्रवार पेठ येथे विवाहितेचा गळा आवळून खून करण्यात आला आहे. याप्रकरणी नवरा, सासू, सासऱ्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मयताचे वडील महमदमुसा गुलाब दस्तगीर अन्सारी (वय ५२, रा. शालिमार कॉलनी, एमआयडीसी, उस्मानाबाद) यांनी फिर्याद दिली आहे. उस्मानाबाद येथील प्लॉट नावावर करून देण्याच्या कारणावरून चारित्र्यावर संशय व्यक्त करीत विवाहितेचा गळा आवळून खून केल्याप्रकरणी माढा पोलिसांत नवरा, सासू, सासरा अशा तिघांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात ...पान ६ वर

CMYK

## पान १ वरून....

### वसुलीच्या त्रासाला वैतागला फार...

अटक करण्यात आली आहे. मयत व्यक्ती घनश्याम उर्फ पप्पू पडवळ हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर बारा गंभीर गुन्ह्याची नोंद आहे. लतीफ शेख याने पप्पू पडवळ त्याच्याकडून चार वर्षापूर्वी व्याजाने पन्नास लाख रुपये घेतले होते. त्याबदल्यात लतिफने पप्पू पडवळ यास आतापर्यंत टप्प्याटप्प्याने दोन कोटी रुपये दिले होते मात्र पप्पू पडवळाच्या मागण्या काही थांबत नव्हत्या. पप्पू पडवळ लतिफकडे आणखी ८० लाख रुपये मागत होता आणि पैसे न दिल्यास लतीफला ठार मारण्याची धमकी देत होता. त्याच्या रोजच्या त्रासाला लतीफ वैतागला होता. तो काय आपल्याला मारणार त्याच्या आत आपणच त्याला संपवू, ह्या उद्देशाने लतीफ कामाला लागला. लतिफने पप्पू पडवळचा काटा काढण्यासाठी आपल्या विश्वासातील मित्राची जमवाजमव केली. या सावकाराचे दोस्त कमी आणि दुश्मन अधिक होते याचाच फायदा घ्यायचे लतिफने ठववले. घटनेच्या दिवशी एका मौलानाकरवी उपचार करण्याच्या नावाने ते पडवळ याच्या घरी गेले. लतिफ अचानक घरी आल्याने पप्पू पडवळ सावध झाला होता. तरीही संधी मिळताच तिथे तिघांनी मिळून पप्पू पडवळ याच्यावर कोयत्याने ५० ते ५५ वार करीत त्याची अत्यंत निर्घृणपणे हत्या केली. दोन दिवसानंतर हा प्रकार उघडकीस आल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आणि तपासाला सुरुवात केली . तपास लतिफपर्यंत येऊन पोहचला. पोलिसांनी संशयावरून लतीफला ताब्यात घेऊन विचारणा केली असता त्याने दिलेल्या माहितीत विसंगती आढळली. लतिफ खरी माहिती लपवत असल्याचे पोलीसांना चौकशीत समजले. लतिफ पोलीसांना गुंगारा देण्याचा प्रयत्न करीत होता. तेंव्हा मात्र पोलिसांनी त्याला खाक्या दाखवताच लतिफने सर्व सत्य सांगायला सुरुवात केली. लतीफने पडवळला पन्नास लाखाच्या बदल्यात दोन कोटी देऊनही तो आणखी ८० लाख मागत होता वरून लतीफ राहत असलेला फ्लॅट स्वतःच्या नावावर करून घेण्यासाठी दबाव टाकत होता. लतीफ शेख यांच्या घरातील महिलांविषयी देखील पडवळ सातत्याने वाईट बोलत होता. त्यामुळे लतिफने त्याला संपवण्याचा निर्णय घेतल्याची कबुली पोलिसांकडे दिली आहे. पप्पू पडवळवर कोयत्याने केलेला हल्ला इतका भीषण होता की, त्याचा चेहरा सुद्धा ओळखू येत नव्हता. एवढंच नाहीतर, त्याचा एक हात कोयत्याच्या हल्ल्यामुळे छाटला गेलेला होता तर घरात रक्ताचा सडा पडला होता. पप्पू पडवळने जीव सोडल्यानंतर हे तिघे तिथून फरार झाले होते. पप्पू पडवळ हा रेकॉर्डवरील गुन्हेगार होता. याआधीही त्याच्यावर एका टोळीकडून हल्ला झाला होता. त्याच्यावर यापूर्वीही फायरिंग झालेले होते. तो आधी एक कार चालक होता. त्यानंतर त्याने व्याजाने पैसे देण्याचा व्यवसाय सुरू केला होता व त्यातूनच त्याने पुण्यात अमाप संपत्ती कमावली होती. तरीही त्याची पैशाची आणि संपत्तीची हाव काही केल्या जात नव्हती. अमाप पैसा असूनही तो जीव धोक्यात घालून सावकाराचा व्यवसाय करीत होता.

### चारित्र्याचा संशय अखेर प्राणावर बेतला...

निलम ही साधी, सरळ, सोज्वळ मुलगी. मोकळ्या वातावरणात वावरणारी. वर्षेभरापुर्वी अंबुज तिला बघायला आला होता. दोघांनाही एकमेक आवडले. मग घरच्यांच्या आशिर्वादाने निलम आणि अंबुजचे लग्न झाले. अंबुज हुशार कर्तबगार मुलगा. नाती निभवुन नेणारा. पण तो असा काही वागेल कुणी कल्पनाही करणार नाही. अंबुजच्या अशा वागण्याचे कारण म्हणजे, झाले असे कि अंबुज आणि निलमच्या लग्नात त्याचे मित्र आले होते. अंबुजने आपल्या मित्रांची ओळख निलमशी करुन दिली. त्या सर्वांनी निलमला लग्नाच्या शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आणि जेवण करण्यासाठी ते सर्व तिथुन निघुन गेले. निलम आणि अंबुजचा लग्न सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. निलम नवरी होऊन सासरी आली. अंबुजच्या घरच्यांनी तिचे रितिरिवाजा प्रमाणे स्वागत केले. त्यानंतर ती तिवारी कुटुंबातील सून म्हणून घरात वावरू लागली. घरातील कामधंदे करून निलम आपल्या सुखी संसाराचे स्वप्न पाहू लागली. सुरुवातीला लग्नानंतरचे काही दिवस अगदी मजेत गेले. त्यानंतर मात्र अंबुज पत्नी निलम हिच्या चारित्र्यवर संशय घेऊ लागला. पण संशयाची सुई एकदा मनात घुसली ना तर तिला कितीही काढायचा प्रयत्न केला तरी ति निघत नाही. अंबुजचे नेमके हेच झाले. नको नको ते प्रश्न मनात यायला लागले. मग तो निलमसोबत भांडण करू लागला. भांडणात अंबुज निलमच्या चारित्र्यावर संशय घेऊ लागला. भांडण जास्त विकोपाला जाऊ नये म्हणुन अंबुज शांत झाला. निलमनेही नमत घेतलं. कारण घरात त्यांचे आई-वडील होते. यानंतर अंबुज झोपायला गेला. निलम मात्र बसुन फक्त विचार करु लागली. तिचा डोळा कधी लागला तिच तिलाच माहीत नाही आणि सकाळी उठायला उशीर झाला. दुपार झाली, अंबुज आलाच नव्हता. घरचे वाट बघत होते. अंबुज आला ते थेट संध्याकाळी. घरच्यांनी विचारले असता, बोलला कि काही नाही. ऑफिसच थोड काम होतं. बस तेच करायला गेलो. निलम अंबुजकडे बघत होती. पण तो अजुन रागातच होता. असेच जवळ जवळ पंधरा दिवस गेले दोघांमध्ये साध धड बोलणही होत नव्हते. एके दिवशी पुन्हा त्या मित्राचा फोन आला. अंबुजला त्याच्या संसाराबद्दल विचारु लागला. अंबुजला कळत हातं, तो चुकीचे वागत आहे. हेही त्याला कळत होते. पण काय करणार त्याच्या मनात शंकांनी घर केले होते. हे साधेसुधे भांडण नव्हते. नवरा बायकोच्या नात्यात छोटे मोठे भांडण असतातच. पण कुणी तिसऱ्याने माचिस लावली. तर नात्यातले भांडण पेटुन उठतात. मग गोष्ट जेव्हा स्त्रीच्या चारित्र्याची येते तेव्हा या भांडणाचा ज्वालामुखी सारखा विस्पोट होतो. संध्याकाळ झाली असते. अंबुज विचार करत असतो. विचार करता करता त्याच्या मनात निलम विषयी नको नको ते वाईट विचार यायला लागतात. कारण तिचे मित्र मैत्रिणी सोबतचे बोलणेच त्याला खटकत होते. दिनांक २३ जुलै रोजी अंबुज याचे वडील महेंद्र हरीहरनाथ तिवारी हे गृहस्थ रबाळे पोलीस ठाण्यात आले आणि त्यांनी पोलिसांना सांगितले की, त्यांचा मुलगा अंबुज तिवारी व सुन निलम अंबुज तिवारी हे दोघे पती-पत्नी दिनांक २२ जुलै रोजी घणसोली येथील घरातुन कोणास काहीएक न सांगता कोठेतरी निघुन गेले. आम्ही त्या दोघांचा बराच शोध घेतला पण ते मिळुन आले नाही. त्यांच्या तक्रारीची दखल घेत रबाळे पोलिसांनी हरविलेले व्यक्ती रजि.मध्ये मिसिंग कमांक ६७/२०२० अन्वये नोंद केली. त्या दोघां पती-पत्नीचा शोध सुरू केला. वाशी परीमंडळ -१ चे पोलीस उपआयुक्त पंकज डहाणे व वाशी विभागाचे सहा. पोलीस आयुक्त विनायक वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली रबाळे पोलीस ठाण्याचे वपोनि योगेश गावडे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) गिरीधर गोरे, उमेश गवळी, सपोनि तुकाराम निंबाळकर, प्रविण फडतरे, पोउपनि संदिप पाटील, अमित शेलार यांनी सदर हरविलेले व्यक्तींचा तपास सुरु केला. दिनांक २८ जुलै रोजी अंबुज तिवारी हा घणसोली परीसरात मिळुन आला. पोलिसांनी त्याच्याकडे त्याची पत्नी निलम अंबुज तिवारी हिच्या बाबत अधिक चौकशी केली असता त्याने प्रथमतः उडवा-उडवीची व असमाधानकारक उत्तरे दिली. पण तो काही व्यवस्थित सांगत नव्हता. मग अंबुज तिवारी यास पोलीस ठाण्यात आणुन त्याच्याकडे अतिशय कौशल्यपुर्णरीत्या सलग चौकशी करण्यात आली. तेव्हा कुठे तो बोलता झाला. त्याने सांगितलेली हकीकत पुढील प्रमाणे.. अंबुज महेंद्र तिवारी हा आपली धर्मपत्नी निलम सोबत घणसोली येथे राहत होता. तो सारखा नीलम हिच्यावर संशय घेत होता आणि तिला मारहाण करत होता. अंबुजच्या या वागण्याला कंटाळून निलम घर सोडून जाणार होती, पण वृद्ध सासु-सासऱ्यांकडे बघून ती गप्प बसली. निलमने अंबुजला बऱ्याचदा माझे बाहेर कुठेही तुम्ही समजता तसे काही नाही, असे ठणकावून सांगितले. तरी याच्या मनातील संशयाचे भूत काही जात नव्हते. शेवटी अंबुजने आपल्या मित्राच्या सहाय्याने निलमचा काटा काढण्याचा बेत आखला. त्यानुसार दि.२३ जुलै रोजी अंबुज तिवारी हा पत्नी निलम हिला फिरण्याच्या बहाण्याने त्याचा मित्र श्रीकांत श्रीजयनारायण चौबे याच्या अर्जुनवाडी, घणसोली येथील घरी घेऊन गेला. त्यावेळी चौबे याच्या घरात कोणी नव्हते. तिथे तो पत्नी निलम हिच्या चारीत्रावर संशय घेवुन तिला घालून पाडून बोलू लागला.

दोघांत वाद वाढत गेला. काही वेळातच अंबुजने निलमचा ओढणीने करकचून गळा आवळला. ती जीव वाचविण्यासाठी धडपडत असताना तिची ताकद कमी पडली आणि ती गतप्राण झाली. निलम मेल्याची खात्री पटल्यावर आता तिच्या प्रेताची विल्हेवाट लावण्यासाठी व पुरावा नष्ट करण्यासाठी अंबुज तिवारी याने त्याचा मित्र श्रीकांत चौबे उर्फ पण्णु याच्या मदतीने निलम तिवारी हिचा मृतदेह निळ्या रंगाच्या ड्रममध्ये लपविला. त्यानंतर त्याचदिवशी निलम हिचा मृतदेह लपवलेला ड्रम श्रीकांत चौबे याच्या मालकीच्या टाटा ऐस टॅम्पेमधुन घेवुन जावुन तो मुंबई - पुणे हायवे वर झाडाझुडपात फेकुन दिला. जणू काही घडलेच नाही या जोशात रात्री दोघेही घरी आले. मात्र अंबुजचे वडील महेंद्र तिवारी यांनी मुलगा आणि सून दोन दिवस झाले तरी घरी आले नाही म्हणून रबाळे पोलीस ठाणे येथे जाऊन ते हरविल्याची तक्रार नोंदवली. मग पोलिसांनी तपास करून अंबुजला शोधू काढले. त्याची कसून चौकशी केली असता, त्याने पत्नी निलम अंबुज तिवारी हीचा चारित्र्याच्या संशयावरून हत्या केल्याची कबुली दिली. या प्रकरणी रबाळे पोलिसांनी अंबुज तिवारी व त्याचा मित्र श्रीकांत चौबे या दोघांना अटक केली. त्याच्या विरुद्ध रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. २१५/२०२० भादवि कलम ३०२, २०१, ३४ अन्वये नोंद करण्यात आला. दरम्यान गुन्हयातील आरोपीतांकडुन खोपोली परीसरात टाकलेला मृतदेहाचा निळा ड्रम हसतगत करण्यात आला. या ड्रममध्ये त्याची पत्नी निलम तिवारी हिचा मृतदेह मिळुन आला. तो मृतदेह तिच्या नातेवाईकांनी ओळखला आहे. तसेच गुन्हयात वापरलेली टाटा कंपनीचा टेम्पो क्रमांक एमएच ४३ बीजी ५०३५ हस्तगत करण्यात आला आहे. कुठलाही पुरावा नसताना नवी मुंबईचे पोलीस आयुक्त संजय कुमार, पोलीस सह आयुक्त राजकुमार व्हटकर, परिमंडळ १ चे पोलीस उपआयुक्त पंकज डहाणे व वाशी विभागाचे सहा.पोलीस आयुक्त विनायक वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली रबाळे पोलीस ठाण्याचे वपोनि योगेश गावडे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) गिरीधर गोरे, उमेश गवळी, सपोनि तुकाराम निंबाळकर, सपोनि प्रविण फडतरे, पोउपनि संदिप पाटील, पोउपनि अमित शेलार, पोना.दिनेश चौधरी,जयदिप पवार व दर्शन कटके यांनी हा गुन्हा उघडकीस आणला आहे.

### जेलमध्ये शस्त्र पोहचली कुणालाच नाही ...

म्हणजे कारागृहातील सीसीटीव्ही कॅमेरे गेल्या महिनाभरापासून बंद असल्याचे या घटनेनंतर समोर आले आहे. सुशील अशोक मगरे (रा. पहुर कसबे ता. जामनेर), सागर संजय पाटील(रा. अमळनेर) व गौरव विजय पाटील हे तिघे आरोपी डिसेंबर २०१९ मध्ये जळगाव उप कारागृहात दाखल झाले होते. त्या तिघांनी २५ जुलै रोजी सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास हा प्रकार करत पलायन केले. पंडित दामू गुंडाळे या ४७ वर्षीय कारागृह रक्षकाच्या डोक्यावर पिस्तूल ठेवत त्याच्याकडून त्यांनी कुलुपाच्या चाव्या हिसकावल्या. शनिवारी सकाळी ७ ते दुपारी १२ वाजेपर्यंत गुंडाळे यांची मुख्य प्रवेशद्वारावर गेटकिपर म्हणून ड्युटी होती. त्यामुळे सर्व चाव्या त्यांच्याकडेच होत्या. सकाळी आधी सागर त्यांच्याकडे आला. त्याने कारागृह रक्षक कुलदीप दराडे यांची ड्युटी कुठे व किती वाजता आहे याची विचारणा केली. यानंतर तो निघून जाताच गौरव तेथे आला. सागर व गौरव हे दोघे कारागृहात ऑफिस बॉयचे काम करीत असल्यामुळे ते कामासाठी ऑफिसच्या दिशेने निघून गेले. यानंतर सुशील मगरे हा देखील गेटजवळ येऊन उभा राहिला. टेबल जवळील पेटी बघण्याच्या बहाण्याने सागर व गौरव हे पंडित गुंडाळे यांच्या जवळ आले. सुशीलही लागलीच तेथे आला आणि तिघांनी क्षणार्धात कमरेत खोचलेली पिस्तूल काढून गुंडाळे यांच्यावर रोखली. सुशीलने चाव्यांची मागणी केली. त्या दिल्या नाहीत म्हणून गौरवने गुंडाळेंना खाली पाडून त्यांच्या पँटच्या खिशातून चाव्या काढल्या आणि त्यांना स्वच्छतागृहाकडे ओढत नेले. तोपर्यंत सुशील व सागर यांनी मेनगेटचे कुलूप उघडून पलायन केले. पाठोपाठ गौरव याने गुंडाळेंवर पिस्तूल रोखून गेटपर्यंत आणले आणि त्यांना तिथेच सोडून पलायन केले. या तिघांना घेण्यासाठी बाहेर जगदीश पुंडलिक पाटील (रा. पिंपळकोठा, ता. एरंडोल) हा दुचाकी घेऊन उभा होता. बाहेर आल्यानंतर सर्वजण जगदीशच्या दुचाकीवर बसून पळून गेल्याचे बाहेर असलेल्या सीसीटीव्हीत चित्रित झाले. यावेळी गुंडाळे यांनी आरडाओरड केली. ती ऐकून कारागृहरक्षक विक्रम हिवरकर तिथे आले. त्यांनी कैद्यांचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याचा काही उपयोग झाला नाही. या घटनेनंतर औरंगाबादचे कारागृह उपमहानिरीक्षक दिलीप झळके हे सायंकाळी जळगावात दाखल झाले. त्यांनी संबधित अधिकारी कर्मचाऱ्यांचे जबाब नोंदवले. कारागृह अधीक्षक राजेंद्र मरळे यांचा पदभार काढून घेतला. त्यांच्या जागेवर उस्मानाबाद येथील गजानन पाटील यांच्याकडे कार्यभार सोपवला. सुरक्षेसाठी कारागृहाबाहेर, आतील परिसर व बराकींमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. हे कॅमेरे १२ जून २०२० पासून बंद आहेत. पळून गेलेल्या तिघा कैद्यांविरुद्ध दरोडा, अवैधरीत्या शस्त्र बाळगणे, प्राणघातक हल्ला करणे यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. सुशील मगरे हा बडतर्फ पोलिस कर्मचारी आहे. जामनेर, पहूर येथे रस्तालूट प्रकरणात तो समोर आला. त्यामुळे तत्कालीन पोलिस अधीक्षक दत्तात्रय कराळे यांनी त्याला पोलिस सेवेतून बडतर्फ केले. यानंतर त्याने पुण्यात एका सराफा दुकानावर पिस्तूलचा धाक दाखवून जबरी लूट केली. याच गुन्ह्यात अटक झाल्यानंतर त्याला २४ डिसेंबर २०१९ पासून कारागृहात ठेवले होते. गौरव व सागर हे दोघे अमळनेर, पारोळा येथील गंभीर गुन्ह्यात संशयित आहेत. १० डिसेंबर २०१९ रोजी गौरव तर १२ डिसेंबर २०१९ रोजी सागर जिल्हा कारागृहात दाखल झाले. याच ठिकाणी तिघांची मैत्री झाली.

गंभीर गुन्ह्याचा आरोप असलेल्या कैद्यांना कारागृहात येताच काही महिन्यात ऑफिस बॉय' (शिपाई)चे काम देणे आणि दोन ठिकाणच्या गेटला कुलूप न लावणेच जिल्हा कारागृह प्रशासनाला महागात पडले. दरम्यान, कारागृहात पिस्तूल आल्या कशा, असा प्रश्न निर्माणच होऊ नये म्हणून पळून गेलेल्या कैद्यांकडे पिस्टल होती हे लपविण्याचा प्रयत्न कारागृह अधीक्षकांकडून करण्यात आला. मात्र, संबंधित कारागृह रक्षकाने पोलिसांना दिलेल्या फिर्यादीतच पिस्तुलांचा उल्लेख केल्यामुळे अधीक्षकांची लपवाछपवी अखेर उघडी पडली. जिल्हा कारागृहाची क्षमता दोनशे कैद्यांची आहे. सध्या तिथे ४२१ कैदी आहेत. त्यातून प्रामाणिक कैदी शोधण्याऐवजी कारागृह प्रशासनाने काही महिन्यांपूर्वीच कारागृहात आलेल्या गंभीर गुन्ह्यातील सागर पाटील आणि गौरव पाटील या आरोपींना कारागृहातील कार्यालयात ऑफिस बॉयचे काम दिले होते. या कामाच्या निमित्ताने त्यांना कारागृहातील अन्य कैद्यांच्या तुलनेत जास्त सवलत आणि परवानगी नसलेल्या ठिकाणी जाण्याची संधी मिळत होती. सुरक्षारक्षक देखील या दोघांना हटकत नव्हते, अशी माहिती समोर आली आहे. या संधीचा गैरफायदा मास्टर माईंड सुशिल मगरेनेही घेतला. दोघा ऑफिस बॉयला सोबत घेत त्यांनी कट रचला आणि शनिवारी सकाळी पळून जाण्याची संधी साधली. २५ जुलै रोजी नेहमीप्रमाणे सकाळी साडे सात वाजता साफसफाई करण्याच्या उद्देशाने गौरव व सागर दोघेजण मेनगेटकडील कार्यालयात आले होते. बराकींच्या बाहेरच्या कुंपणाला असलेल्या गेटला कुलूप लावलेले नसल्यामुळे बडतर्फ पोलिस कर्मचारी सुशिल मगरेही त्यांच्या जवळ आला. ऑफीस पासून कारागृहात प्रवेश करण्यासाठी आणखी एक गेट आहे. तेही उघडेच असल्यामुळे प्रवेशद्वार ते हे गेट यातील ऑफीस समोरच्या मोकळ्या जागेपर्यंत तिघे सहज येऊ शकले, असेही या घटनेतून समोर आले आहे. एखाद्या चित्रपटाच्या कथानकाप्रमाणे तिघांनी पिस्तूलच्या जोरावर कारागृहातून पलायन केले. गुंडाळे यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन जिल्हापेठ पोलिस ठाण्यात सुशिल, सागर व गौरव या तिघांविरुद्ध प्राणघातक हल्ला, सरकार कामात अडथळा, बेकायदेशीपणे शस्त्र बाळगणे व कट रचणे असा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच सर्वप्रथम अप्पर पोलिस अधीक्षक भाग्यश्री नवटके, उपअधीक्षक डॉ. निलाभ रोहन, स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक बापू रोहोम, जिल्हापेठचे अकबर पटेल हे पथकांसह कारागृहात पोहोचले. त्यांनी संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून संपूर्ण घटनाक्रम जाणून घेतला. यानंतर कैद्यांच्या शोधासाठी जिल्हाभरात पथक रवाना केले. अद्याप आरोपी फरार आहेत.

### नकली पोलीस बनून मामा भाचीने अनेकांना ...

सरकारी नोकरी करायची होती. पण पैसे देऊन नोकरी करण्या इतपत तिच्या घरच्या लोकांची परिस्थिती नव्हती. तरी तिने जिद्द सोडली नव्हती. ती सतत प्रयत्न करीत होती. पण तिला नोकरी काही मिळत नव्हती. तिच्यापुढे आता आपण काय करावे असा प्रश्न होता.म्हणून ती बारकाईने विचार करीत होती. त्यातच तिचे पोलीस खात्यात नोकरी लागून वरिष्ठ अधिकारी होण्याचे स्वप्न होते. पण तिच्याबाबत नशिबाचे फासे उलटे पडत होते. प्रयत्न करूनही नोकरी काही मिळत नव्हती. तिने ही गोष्ट एकदा आपल्या मामाला बोलली होती.मामाने ही त्यावेळी तिला काही तरी करून यातून मार्ग काढू या असे सांगितले होते. तिचा मामा विठ्ठल निलवर्ण हा निळपण येथे राहत होता. त्याचे ही शिक्षण बऱ्यापैकी झाले होते. त्याला ही त्याच्या मनासारखी नोकरी भेटली नव्हती. घरची शेती सांभाळत तो बाहेरचे उदयोग करत होता. भाची प्रियांका ही दिसायला सुंदर, स्मार्ट आहे. समोरच्या व्यक्तीवर ती आपल्या लाघवी बोलण्याने छाप पाडू शकते हे त्याने ओळखले होते. त्याने प्रियांकाला पैसे मिळवण्याचा एक वेगळाच मार्ग सांगितला होता. गेल्या तीन चार वर्षापुर्वी तिला गारगोटी सोडून जायला सांगून दुसऱ्या शहरात राहयला सांगितले. यापाठीमागे त्याचा उद्देश वेगळाच होता. ती अचानक गारगोटी शहरातून गेल्यानंतर मामाने आणि तिच्या आई वडिलांनी प्रियांकाला मोठी नोकरी लागल्याचे गावातील लोकांना सांगायला सुरूवात केली. लोकांनी ही त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून बरे झाले एका सामान्य कुंटूंबातील मुलगी आपल्या जिद्दीने आणि धाडसाने पुढे गेली. असे म्हणून समाधान व्यक्त केले होते. त्यातच बाहेर गावी राहत असलेली प्रियांका ही दोन वर्षापुर्वी गारगोटी येथे परत आली होती. ती गावात आल्यावर आपल्या जवळच्या नातेवाईकांना आणि परिचयाच्या लोकाना आपण सीआयडी इन्स्पेक्टर बनल्याचे सांगत होती. त्यासाठी आपण नाशिक येथे ट्रेनिंगला दोन वर्ष गेले होते. असे सांगून आपण घेतलेल्या कष्टाचे फळ आपल्याला चांगले मिळाल्याचे ती आवर्जुन सांगु लागली होती. गारगोटी सारख्या लहान गावातील एका सामान्य कुटुंबातील मुलीने आपल्या जिद्दीच्या जोरावर सीआडी इन्स्पेक्टर बनल्याचे बघुन गावातील अनेक लहान मोठया नेत्यानी तिचे अभिनंदन केले होते. तिचा सत्कार करून तिच्या यशाचे कौतुक करणारे गावात जागो जागी डिजिटल बोर्ड ही लावले होते. तिच्या बोलण्यावर आता अनेकांचा विश्वास बसत होता. आपल्या गावातील मुलगी मोठी अधिकारी बनल्याने जो तो तिच्याकडे आशेने बघत होता. ती ही आपल्या गोड आणि लाघवी बोलण्याने समोरच्यावर आपली छाप पाडत होती. याच दरम्यान तिचा मामा विठ्ठल याने भागातील अनेक तरूण तरूणीची भेट घेऊन त्याना चांगल्या ठिकाणी नोकरी लावण्याचे अमिष दाखविले होते. आपल्या भाची प्रमाणे तुमचे ही कल्याण होईल असे सांगून अनेक सावज हेरले होते. ग्रामीण भागात एखादी व्यक्ती मोठया पदावर काम करीत असेल तर त्या व्यक्तीचे अनुभव त्यांनी केलेले प्रयत्न आणि त्याचे मार्गदर्शन घेणेसाठी अनेकजण प्रयत्नशील असतात. आजच्या घडीला नोकरी मिळविणे हे एक दिव्यच झाले असल्याने कुणाच्या वशिल्याने अथवा शिफारशीने नोकरी मिळत असेल तर त्या दृष्टीने ही प्रयत्न केले जात असतात. शिक्षण घेऊन नोकरी न मिळाल्याने अनेकांच्यावर बेकारीची टांगती तलवार असते. म्हणून नोकरी मिळविण्यासाठी काय वाटेल ते करण्याची त्यांची तयारी असते. हिच त्याची मजबुरी अनेकजण बरोबर हेरत असतात. तेच त्याचे सावज आणि टार्गेट असते. एखाद्याला फसविले तर बिघडले कुठे म्हणून नोकरी लावतो म्हणून पैसे उकळणारे ही काही कमी नाहीत. त्याच्या जाळ्यात असे बेकार तरूण तरूणी बरोबर अडकत असतात. नोकरी आणि पैसे याचे समीकरणच तयार झाल्याने पैसे दिल्याशिवायकुठे ही चांगली नोकरी मिळत नाही असा बहुदा प्रत्येकाचा समज झालेला असतो. म्हणूनच ते पैसे देऊन नोकरी मिळविण्याचा फंदात असतात. म्हणूनच पैसे घेऊन नोकरी लावतो असे सांगणाऱ्यांची एक टोळीच तयार झाली आहे. हे बरोबर प्रियांकाच्या मामाने हेरल्याने त्याने आपल्या भाचीचा बरोबर उपयोग करून पैसे मिळविण्याचा फंडा तयार केला होता. त्याने गारगोटी येथील दुसरी युवती प्रतिक्षा साळवी हिला भेटून तु ही माझ्या भाची सारखीच सीआयडी ऑफिसर बन. तुला लागेल ती मदत आम्ही करतो असे तिला व तिच्या घरच्या लोकांना सांगितले होते. त्याचबरोबर तिच्या घरच्या लोकांना आणि तिला भाची प्रियांकाबरोबर भेट घालून दिली होती. प्रियांका दोन ते तीन वेळेच्या भेटीमध्ये प्रतिक्षा आणि तिच्या आई वडिलाचे मन आपल्या लाघवी बोलण्याने वळविले होते. त्याच्या मनाची तयारी झाल्यावर प्रियांकाने आणि तिचा मामा विठ्ठल यांनी प्रतिक्षाच्या आई वडिलांना प्रतिक्षा हिला नोकरीसाठी पैसे दयावे लागतील. तरच तिला ट्रेनिंगला पाठवून देऊन सिलेक्ट केले जाईल असे सांगून त्यांच्याकडे दहा लाखांची मागणी केली होती. प्रतिक्षाच्या आई वडिलांनी ही नाही होय म्हणत प्रियांका आणि तिच्या मामाला थोडे थोडे करून ५लाख २५ हजार रूपये दिले. त्यानंतर प्रियांकाने प्रतिक्षा हिला काही दोन दोन दिवसासाठी नाशिक आणि सिंधुदुर्ग येथे ट्रेनिंगला पाठवून दिले होते. तेथून परत आल्यावर प्रतिक्षाने ही आपल्या मैत्रींना प्रियांकाने नोकरी लावल्याचे सांगुन तुम्हाला जर नोकरी पाहिजे असेल तर तुम्ही तिच्याशी आणि तिच्या मामाशी संपर्क करा म्हणून सांगितले होते. त्याप्रमाणे तिच्या मैत्रीणीने त्याच्याशी संपर्क साधला होता. त्या दोघांना आयतेच सावज मिळाल्याने त्यांनी ही त्याना गोड बोलून नोकरी लावण्याचे आश्वासन दिले. त्यासाठी त्याच्या पालकांनी ही प्रियांकाशी भेट घेतली होती. प्रियांकाने ही त्याना आपल्या गोड आणि लाघवी बोलण्याने भूरळ पाडली होती. त्याना ही नोकरी लावण्याचे अमिश प्रियांकाने आणि तिच्या मामाने प्रज्ञा मेंगाणे हिच्या पालकाकडून १ लाख ५० हजार तर मंगेश चौगुले याच्या पालकाकडून २ लाख ५० हजार रुपये घेतले होते. या तिघांच्याकडून पैसे घेऊन ही त्याना नोकरीचे पत्र त्यांनी दिले नव्हते. म्हणून त्या तिघांनी त्याच्याकडे नोकरीसाठी तगादा लावला होता. यातूनच मामा भाचीने वेगळी चाल खेळली होती. त्यांनी प्रतिक्षा साळवी हिच्याकडून नोकरीसाठी म्हणून तिचे दहावीचे बारावीचे मार्कलिस्ट व शाळा सोडल्याचा दाखलच्या झेरॉक्स प्रती घेऊन तिला नोकरीचे आयटेडी देतो असे सांगितले. तर प्रज्ञा मेगाणे मंगेश चौगले याला नोकरीच्या ट्रेनिंगसाठी नाशिकला पाठवून दिले. ते दोघे ही ट्रेनिंगला गेले होते. पण ते कोणत्या ट्रेनिंगला कुठे आणि कुणाकडे गेले याची त्याना व्यवस्थीत माहिती दिली गेली नाही.नोकरी लागणार म्हणून ते खुशीत होते. त्यातच त्यांनी काही दिवसात प्रतिक्षा साळवी हिला सीआयडीची नोकरी लागली म्हणून तिच्या नावाचे ओळखपत्र त्यावर सही शिक्का करून दिले. व सोबत नियुक्तीचे पत्र ही दिले होते. आपल्या मुलीला नोकरी लागली आणि ती थोडच्या दिवसात नोकरीवर रजु होणार म्हणुन तिच्यासह तिचे पालक खुशीत होते.याच खुशीत तिच्या लहान भावाने आपल्या व्हॉटअपवरती प्रतिक्षा हिला मिळालेल्या आयडीचा स्टेटस ठेवला होता. त्यामुळे गावात, एकच चर्चा होऊ लागली होती. परंतु या चर्चेमुळे प्रतिक्षा हिला दिलेले सीआयडी नोकरीचे ओळखपत्र आणि नियुक्ती पत्र ही बनावट असल्याचे काही जणांच्या निर्दशनास आले. यातुनच मामा भाचीची पोलखोल झाली. ही बाब प्रियांकाच्या लक्षात आल्यावर तिने प्रतिक्षा साळवी हिला बोलावुन घेऊन तिचा मोबाईल घेऊन त्यातील डाटा डिलीट केला.त्याचे सीम कार्ड ही तोडून टाकुन या संबंधी कुठे वाच्याता केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली.

यावरून प्रतिक्षा साळवी आणि तिच्या पालकांनीआपली फसवूण केली व नोकरीचे खोटे बनावट आयटेंडी व नियुक्ती पत्र दिले म्हणून प्रियांका आणि तिचा मामा विठ्ठल याच्या विरोधात भुदरगड गुन्हा नोंदविला. त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी या गुन्हयातील प्रियांका चव्हाण आणि तिचा मामा विठ्ठल निलवर्ण याना ताब्यात घेऊन त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता प्रियांका ही तोतया सीआयडी इन्सपेक्टर असल्याचे समोर आले. गुन्हाअन्वेषच्या डीवायएसपी ज्योती आमणे यांनी भुदरगड पोलीस स्टेशनला भेट देऊन या घटनेबाबत बंद खोलीत प्रियांका व तिचा मामा विठ्ठल याच्याकडे चौकशी आरंभली होती. या चौकशीतून मामा भाचीने मिळून तालुक्यातील आणि जिल्हायातील अनेकांना नोकरी लावतो म्हणून मोठी रक्कम उकळल्याची माहिती मिळाली. पोलीसांनी या दोघांना ताब्यात घेऊन त्याच्यावर वेगवेगळ्या गुन्हया खाली गुन्हे नोंदवून त्याना मा.कोर्टसमोर उभे केले असता,मा.कोर्टाने त्याना चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्याना या दोघांच्याकडून पोलीसांना चक्रावून सोडणारी माहिती मिळाल्याने अशा प्रकारे कुणाची फसवणूक झाली असल्यास त्यांनी पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा असे आवाहन केले.नक्कीच या घटनेमागे मोठे रॅकेट असावे अशी शक्यता पोलीसांनी तपासा दरम्यान वर्तवली होती. त्या शिवाय प्रियांका ही पैसे घेतलेल्या तरूण तरूणीना ट्रेनिंगसाठी पाठवून दिले नाही. त्या दृष्टीने ही पोलीस तपास करत आहेत. झुकती है दुनिया झुकाने वाले चाहिए म्हणून प्रियाकांने मोठी चाल खेळली होती. आणि त्यात ती यशस्वी ही झाली होती. मामा भाचीच्या या कारनाम्याने भुदरगड गारगोटीसह जिल्हा हादरला होता हे मात्र नक्कीच.

### मुलाच्या रडण्याने त्यांचे कामच बिघडले...

भाऊ हरिश्चंद्र राजेंद्र बिराह (३४) या तिघांचा समावेश आहे. राजू हा मूळचा बरबडी (ता., जिल्हा वर्धा) येथील रहिवासी असून, तो स्थानिक उपजिल्हा रुग्णालयात परिचारकपदी नोकरीला असल्याने क्वॉर्टरमध्ये राहायचा. त्याच्या पत्नीचे शेजारी राहणाऱ्या रुपेश बिराहसोबत प्रेमसंबंध व नंतर अनैतिक जुळले. याबाबत कळताच राजू शहरातील रमानगरात किरायाने घर घेऊन राहू लागला. राजूची पत्नी व रुपेशच्या भेटी सुरूच होत्या. त्यामुळे त्याने पत्नीला अनेकदा समजावून सांगितले होते. त्यातच रुपेश घरी येत असल्याने गुरुवारी (दि.६) रात्री पतीपत्नीचे जोरात भांडणही झाले होते. त्यावेळी रुपेश तिथेच होता. त्याचवेळी रुपेशने राजूला कायम संपविण्याची योजना आखली. तो मध्यरात्री २.१५ वाजताच्या सुमारास हरिश्चंद्रला सोबत घेऊन राजूच्या घरी आला. त्यावेळी राजू, त्याची पत्नी व मुलगा झोपेत होते. राजूच्या पत्नीने दोघांनाही घरात घेतले. त्यांनी दोरीने राजूचे हात बांधले आणि त्याचे नाक व तोंड उशीने जोरात दाबले. श्वास गुदमरल्याने राजूचा मृत्यू झाला.पोलिसांनी घटनास्थळ गाठून तिन्ही आरोपींना अटक केली. शिवाय, मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी स्थानिक उपजिल्हा रुग्णालयात पाठविला. याप्रकरणी कामठी (नवीन) पोलिसांनी भादंवि ३०२ अन्वये गुन्हा दाखल केला असून, तपास सहायक पोलीस निरीक्षक सुरेश कन्नाके करीत आहेत. मुलगा रडला आणि बिंग फुटले या प्रकारामुळे राजूच्या पाच वर्षीय मुलाला जाग आली. हा सर्व प्रकार बघून त्याने जोरात रडायला सुरुवात केली.रडण्याच्या आवाजामुळे शेजाऱ्याने औत्सुक्यापोटी खिडकीतून त्यांच्या घरात डोकावून बघितले. हा सर्व प्रकार लक्षात येताच त्याने पोलिसांना सूचना दिली. पोलिसांनी लगेच घटनास्थळ गाठले. त्यावेळी राजूची पत्नी, रुपेश व हरिश्चंद्र घरीच होते. त्यामुळे पोलिसांनी तिघांनाही ताब्यात घेत अटक केली. त्यांच्याकडून दोरी, चाकू,, उशी जप्त केली. या घटनेमुळे राजूचा मुलगा मात्र अनाथ झाला.

# भिवंडीतील सर्व बाजारपेठेत कोरोनाच्या पार्श्वभूमीवर फिरत्या तपासणी पथकाद्वारे ॲण्टीजेन तपासणी सुरु

**भिवंडी/प्रतिनिधी**




महानगरपालिकेच्या वतीने शहरातील प्रमुख दाटीवाटी गर्दीच्या चौकात बाजारपेठ एरियात भाजी मार्केट परिसरात फिरत्या तपासणी पथकाद्वारे ॲण्टीजेन तपासणी सुरू करण्यात आली आहेत. ॲम्ब्युलेंस किंवा मोबाईल व्हॅन यामध्ये वैद्यकीय पथक कार्यरत असून प्रभाग समिती निहाय गर्दीच्या परिसरात सदर तपासणी करण्यात येत आहे. शुक्रवार पासून या ॲण्टीजेन तपासणी करण्यास शहरात सुरुवात झालेली आहे. यापूर्वी स्व.इंदिरा गांधी हॉस्पिटल, रईस हायस्कूल कोवीड केंद्र, वराळ देवी मंगल कार्यालय कोरोना केंद्र, टाटा आमंत्र, याठिकाणी ॲण्टीजेन टेस्ट करण्यात येत होत्या, पण नागरिकांचा फारसा त्या ठिकाणी येऊन तपासणी करण्यास प्रतिसाद मिळत नाही हे लक्षात घेऊन प्रत्यक्ष बाजारपेठेत, भाजी मार्केट परिसर, दाट नागरीवस्तीमध्ये या कोरोना ॲण्टीजेन टेस्ट करण्यात येत आहेत. शुक्रवारी सकाळपासून ओसवाल वाडी, नविवस्ती, शांती नगर भाजी मार्केट, याच बरोबर प्रभाग समिती ३, प्रभाग समिती ४, प्रभाग समिती क्र.५ ऑफिस कार्यालय याठिकाणी कामगार कर्मचारी यांची देखील ॲण्टीजेन तपासणी करण्यात आल्या. शुक्रवारी केलेल्या मोहिमेत एकूण २६१ नागरिकांची ॲण्टीजेन तपासण्या करण्यात आल्या. यामध्ये १४ नागरिक कोरोना बाधित पॉझिटीव्ह आढळली असून, उर्वरित २४७ लोकं यांना कोरोना लक्षण दिसून आली नाहीत. प्रत्येक नागरिकांनी स्वतःहून पुढे येऊन आणि आपण तपासणी करून घेणे आवश्यक आहे, जेणेकरून भिवंडी शहर कोरोना मुक्त होण्यास मदत होणार आहे. कोणालाही सतत येणारा खोकला, ताप, घशात खवखव असेल या गोष्टीची लक्षणे लक्षात घेता ताबडतोब करून द्या नजिकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात, किंव्हा कोव्हीड तपासणी केंद्रात जाऊन कोरोना तपासणी करून घ्यावी असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.

## महापुरुषाच्या पुतळ्याच्या विटंबना प्रकरणी श्रमिक क्रांतीचे मुख्यमंत्री ठाकरे यांना निवेदन!

**देवणी/प्रतिनिधी**

माळेगाव ता.लोहा जि.नांदेड येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळास काही समाज कंटकाने बाबासाहेबांच्या पुतळ्याची दगडाने ठेचून विटंबना केली आहे. या घटनेचा श्रमिक क्रांती अभियान महाराष्ट्र या संघटनेच्या वतीने तीव्र निषेध केले असुन अशा आशयाचे निवेदन उपजिल्हाधिकारी उदगीर यांच्या मार्फत मुख्यमंत्री मंत्री महाराष्ट्र राज्य यांचेकडे पाठविण्यात आले आहे. गौतम बुद्ध, महात्मा बसवेश्वर, शिवाजी महाराज, शाहु महाराज, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व आण्णाभाऊ साठे, असे व इतर काही महापुरुष यांचा कोणत्याही प्रकारचा आपमान आम्हाला सहन होत नाही, असे ही निवेदनात सांगितले असुन सरकारवर न्यायाबाबद आमचा विश्वास आहे. म्हणून अशा घटना बाबत आम्ही सरकारकडे सतत न्यायाची मागणी करीत असुन, काही समाजकंटकांपासून या घटनांची पुर्नावृत्ती होत आहे हा अक्षम्य गुन्हा असुन याबाबत या अविचारी मानसिकतेत बदल करण्यास सरकार अपयशी का ठरत आहे? असा सवाल करुन नाराजी व्यक्त केले आहे. या दुष्टकृत्यास आळा घालण्यासाठी सरकार जर अपयशी ठरत असेल तर या दुष्कर्मी लोकास आमच्या ताब्यात द्यावे व त्यांना नीट करण्याचा आधिकार आम्हास द्यावा अशी संतप्त प्रतिक्रिया संघटनेच्या वतीने देण्यात आली आहे. या निवेदनावर संघटनेचे मारुती जयवंतराव गुंडीले, लक्ष्मण रणदिवे, बालाजी आदावळे, गोविंद शिंदे, विकास बलांडे इत्यादीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## थोडक्यात वृत्तांत

### रेणुका विद्यालयचा निकाल ८८ टक्के

भिवंडी : वज्रेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ वज्रेश्वरी या शिक्षण संस्थेची रेणुका विद्यालय झिडके या माध्यमिक शाळेचा इयत्ता १०वी चा शालांत परीक्षा सन-२०२०चा एकूण निकाल ८८% असा जाहीर झाला आहे. रेणुका विद्यालय येथे याच वर्षापासून इयत्ता १०वी चे परीक्षा केंद्र सुरु झाले आहे.आणि पहिल्याच वर्षी या केंद्रावर विशेष नैपुण्य प्राप्त विद्यार्थी याप्रमाणे आहेत. कुमार -प्रांजल शरद सोनावळे ९६.८०% (प्रथम क्रमांक) कल्याणी भास्कर पाटील ९६%(द्वितीय क्रमांक) कुमारी -जिज्ञासा प्रदीप पाटील -९४.८०%(तृतीय क्रमांक असे हे घवघवीत यश प्राप्त करणारे मानकरी आहेत. या परीक्षा केंद्रावर एकूण परीक्षार्थी -१६९ होते.त्यापेकी एकूण उत्तीर्ण -१४८ त्यापैकी विशेष प्रावीण्यसह प्रथम श्रेणी उत्तीर्ण विद्यार्थी -४४, प्रथम श्रेणी विद्यार्थी -६३, द्वितीय श्रेणी उत्तीर्ण विद्यार्थी -२८आणि पास श्रेणी विद्यार्थी -१३या प्रमाणे आहेत. त्यामुळे झिडके-अंबाडी ,परिसरातून वज्रेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळाचे मा. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव,शालेय समिती अध्यक्ष, विश्वस्त मंडळ व मुख्याध्यापक, पर्यवेक्षक,केंद्रसंचालक शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी यांचे मनापासून अभिनंदन केले जात आहे.

### मटक्याच्या अड्ड्यावर गुन्हे शाखेची धाड

देवणी : देवणी येथील बसस्थानकासमोर असलेल्या विश्वनाथ खानापुरे यांच्या कॉम्प्लेक्समधील दुकानात लपूनछपून चालणाऱ्या कल्याण नावाच्या मटक्याच्या अड्ड्यावर शुक्रवारी धाड टाकून लातूर स्थानिक गुन्हे शाखेच्या वतीने गुन्हे शाखेचे पो.नि. सुनिल नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली राम गवारे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून यावेळी योगी साहेब, मस्के साहेब, जांबळे साहेब, देवणी पोलीस ठाण्याचे विनायक कांबळे अदीनी धाड टाकली तेथे तीन आरोपी स्वतःच्या फायद्यासाठी कल्याण नावाचा मटका खेळत खेळवित असताना पकडण्यात आले आहे. या धाडीत जुगार साहित्य व रोख रक्कम आठ हजार ४६० रुपये जप्त करण्यात येऊन आरोपींना अटक करून जामीनावर सोडण्यात आले आहे. पुढील तपास देवणीचे पोलीस हेड कॉन्स्टेबल विनायक कांबळे हे करीत आहेत.

### कोरोनाची लक्षणे आढळल्यास तपासणी करावी

देवणीः शहरात काही दिवसापासून कोरोणा बाधित रुग्णांची वाढ होत असल्याने तसेच त्यांच्या जवळून संपर्कात आलेल्या व्यक्ती शहरातील काही नागरिक, कर्मचारी व व्यापारीसह अनेकजनान कोरोणाची बाधा झाल्याचे आढळल्यामुळे शहरातील व तालुक्यातील सर्व नागरिकांनी सामाजिक अंतराचे नियम पाळत घाबरून न जाता सर्दी, ताप, खोकला, अथवा कोरोना सदृश्य लक्षणे दिसून आल्यास देवणी ग्रामीण रुग्णालय येथे जाऊन आरोग्य तपासणी करून घ्यावी किंवा अंगणवाडीच्या कर्मचारी यांच्याकडून व अशा कार्यकर्त्या कडून तपासणी करून घ्यावे. गेल्या काही दिवसापासून तालुक्यात व शहरात रुग्णांची संख्या वाढत आहे. त्यामुळे नागरिकांनी सामाजिक अंतराचे पालन करावे. वेळोवेळी साबणाने हात स्वच्छ धुवावे, सार्वजनिक ठिकाणी मास्कचा वापर करावा, गर्दीचे ठिकाणी जाणे टाळावे, शहरातील नागरिकांनी घाबरून जाऊ नये, कोणत्याही अफवा वर विश्वास ठेवू नये, तसेच आपल्या घरातील अथवा परिसरातील व्यक्तीस किंवा आपणास सर्दी ताप किंवा कोरोनाचे लक्षणे आढळल्यास त्वरित ग्रामीण रुग्णालय येथे जाऊन आरोग्य तपासणी करून घ्यावे असे आव्हान देवणी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी सुमित जाधव यांनी केले आहे.

### वीरशैव लिंगायत वधू-वर परिचय मेळावा

लातूर : लिंगायत महासंघाच्यावतीने प्रांताध्यक्ष प्रा.सुदर्शनराव बिरादार यांच्या नेतृत्वाखाली प्रकाशित होणार्या राज्यव्यापी वीरशैव लिंगायत वधू-वर परिचय पुस्तकात नाव नोंदणीस चांगला प्रतिसाद मिळत असून ही नाव नोंदणी २८ सप्टेंबर २०२० पर्यंत सुरू राहणार असल्याचे लिंगायत महासंघाचे जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील यांनी सांगितले.लिंगायत महासंघाच्यावतीने होणारा वधू-वर परिचय मेळावा यावर्षी कोरोनाच्या पार्श्वभुमीवर होणार नसून वीरशैव लिंगायत समाजातील वधू-वरांची सोय व्हावी म्हणून राज्यव्यापी वधू-वर परिचय पुस्तकाचे प्रकाशन यावर्षी करण्यात येणार असून या पुस्तकात वधू-वरांची नाव नोंदणी २१ जूलै २०२० पासून सुरू झाली असून या नाव नोंदणीस संपूर्ण महाराष्ट्र, कर्नाटक, आंधप्रदेशातून खुप प्रतिसाद मिळत आहे. ही नाव नोंदणी दि. २८ सप्टेंबर २०२० पर्यंत ही नावनोंदणी सुरू राहणार असुन वीरशैव लिंगायत समाजातील सर्व वीरशैव लिंगायत समाजासह पोटजातीच्या जंगम, माळी, कुंभार, तेली, सुतार, कोष्टी, फुलारी आदि सर्वांची नोंद करता येते. तसेच विधवा, विधूर, घटस्फोटीत, पुनर्विवाह करणार्यांनी सुध्दा आपले नाव नोंदवण्याची सोय केली आहे. वधू-वर परिचय पुस्तकात नाव नोंदणीसाठी हेमंत नेलवाडकर, अंबुजा किचन वेअर्स, नंदी स्टॉप औसा रोड, लातूर येथे संपर्क साधावा.तसेच लिंगायत महासंघाचे जिल्हाध्यक्ष डॉ. काशिनाथ राजे, शिवाजी भातमोडे, सिद्रामप्पा पोपडे, माणिकप्पा मरळे, माणिक कोकणे, जी.जी.ब्रह्मवाले, चंद्रकांत झुंजारे, परमेश्वर पाटील, विश्वनाथ मिटकरी आदिंशीही संपर्क करता येईल असे आवाहन लिंगायत महासंघाचे जिल्हा सरचिटणीस चंद्रकांत कालापाटील यांनी सांगितला.

## प्रफुल्ल खंडागळे यांचा कोरोना योध्दाने सन्मान



**भिवंडी/प्रतिनिधी**

कोरोना विषाणूने जगभर धुमाकूळ घातला असून या आजाराने लाखो नागरिक मृत्युमूखी पडले असून कोट्यवधी नागरिक बाधित झाले आहेत. या आजारावर अद्यापी औषध तयार झालेले नाही. त्यामुळे सदरचा आजार नियंत्रणात राहावा यासाठी पाच महिन्यांपासून सर्वत्र लॉक डाऊन करण्यात आले आहे. या लॉक डाऊनमुळे सर्वसामान्य नागरिकांसह मजूर वर्गाचे खूपच हाल झाले आहेत. अशा या संकट काळात पूर्णा, कोपर, राहनाळ परिसरातील हजारो गोदाम कामगारांवर उपासमारीची पाळी ओढवली तर अनेकांना विविध आजारांचा सामना करावा लागला. यावेळी मजुरांची होणारी उपासमार व औषध उपचाराशिवाय मजूरांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी भाजपचे युवा मोर्चा विधानसभाध्यक्ष प्रफुल्ल (पप्पू) खंडागळे यांनी कार्यकर्त्यांना सोबत घेऊन स्वखर्चाने हजारो मजुरांना जीवनावश्यक वस्तू व वैद्यकीय सेवा उपलब्ध करून आपले कर्तव्य पार पाडले आहे. या कर्तव्य सेवेची दखल एका स्थानिक वृत्त वाहिनेने घेऊन त्यांना शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मान पत्र बहाल करून गौरविण्यात आले आहे. खंडागळे यांच्या या सामाजिक कामाचे परिसरातून स्वागत करण्यात येत आहे.

# कोवीड १९ प्रादुर्भाव नियंत्रणासाठी आंतरराज्य सीमेवर कडक निगराणी ठेवा - अमित देशमुख

**लातूर/प्रतिनिधी**



कोवीड१९ च्या प्रादुर्भावावर नियंत्रण मिळविण्यासाठी संबंधित रुग्णांच्या संपर्कात आलेल्या लोकांचा शोध घ्यावा तसेच तपासण्यांची संख्या वाढवावी, आंतरराज्य सीमेवर बंदोबस्त वाढवून येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांवर काळजीपूर्वक लक्ष ठेवावे असे निर्देश निलंगा येथील कोवीड१९ आढावा बैठकी दरम्यान लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अमित विलासराव देशमुख यांनी दिले आहेत.निलंगा भेटीवर असलेले पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवारी येथील विश्रामगृहाच्या सभाग्रहात निलंगा तालुक्यातील कोवीड १९ प्रादुर्भाव नियंत्रणात आणण्यासाठी राबवण्यात येत असलेल्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. या आढावा बैठकीस अतिरिक्त जिल्हाधिकारी लोखंडे अतिरिक्त पोलिस अधीक्षक हिम्मत जाधव, तहसिलदार गणेश जाधव व इतर अधिकारी उपस्थित होते. निलंगा तालुका कर्नाटक राज्याच्या सीमेवर असल्यामुळे कर्नाटक तसेच आंध्रप्रदेश, तेलंगणा राज्यातील वाहतूक या तालुक्यातून होते, लातूर जिल्ह्यात कोवीड१९ बाधित रुग्ण सर्वप्रथम निलंगा येथेच सापडले होते. ते रुग्ण तेलंगणा राज्यातील होते. या राज्यातून त्या राज्यात ये-जा करणाऱ्या लोकांमुळे कोवीड१९ प्रादुर्भाव वाढण्याची भीती आहे. त्यामुळे असे प्रवासी परवानाधारक आहेत किंवा नाही, त्यांच्याकडे मेडिकल फिटनेस सर्टिफिकेट आहे किंवा नाही याची कसून चौकशी करावी, असे निर्देश यावेळी पालकमंत्री ना. देशमुख यांनी दिले आहेत. कोवीड १९ चा प्रादुर्भाव नियंत्रणात आणण्यासाठी तपासण्याची संख्या वाढवावी त्यासाठी आवश्यकतेनुसार रॅपीड टीजेन किट उपलब्ध करून घ्यावेत, कोवीड बांधीत रूग्णाचे संपर्क शोधुन संपर्कात आलेल्या सर्वांची तपासणी करावी, त्यांना विलगीकरणात ठेवावे, ग्रामीण रूग्णालय व इतर व्यवस्थेतुन जासतीत जास्त बेड उपलब्ध करून ठेवावेत, जास्तीत जास्त बेड ऑक्सिजनकेटेड असावेत, औषधी व ऑक्सिजनचा पुरेसा साठा उपलब्ध करून ठेवावा आदी सुचनाही पालकमंत्री देशमुख यांनी यावेळी दिल्य आहेत. प्रारंभी अधिकाऱ्याकडून निलंगा तालुक्यातील कोवीड १९ प्रादूर्भावासंबंधिची माहिती पालकमंत्री देशमुख यांनी अवगत करून घेतली.

# गुजरातमधून तीन ट्रकमध्ये आलेला ६५ लाखांचा गुटखा जप्त



**भिवंडी/प्रतिनिधी**

महाराष्ट्रात सुगंधी तंबाखू व गुटखा विक्रीस प्रतिबंध असतानाही शेजारील गुजरात राज्यातून विविध मार्गे कोट्यवधी रुपयांचा गुटखा , पान मसाला महाराष्ट्रात विक्री केला जात असून ठाणे येथील अन्न सुरक्षा पथकाने भिवंडी तालुक्यातील खारबाव येथे रात्रभर पाळत ठेवून तीन ट्रक मधून भिवंडी च्या दिशेने येणाऱ्या तीन ट्रक मधील २८० गोण्यात असलेला ६५ लाख ७८ हजार रुपय किमतीचा विमल सुगंधित पान मसाला व गुटखा व ३६ लाख रुपयांचे तीन ट्रक ताब्यात घेत कारवाई केली आहे. ठाणे अन्न सुरक्षा विभागाचे सहाय्यक आयुक्त भूषण मोरे यांना गुप्त बातमीदारा मार्फत भिवंडी शहराच्या दिशेने गुजरात येथून तीन ट्रक मधून गुटखा व सुगंधित तंबाखू येत असल्याची माहिती समजली असता अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त अरुण उन्हाळे व कोकण विभाग सह आयुक्त शिवाजी देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा निरीक्षक माणिक जाधव, एस.एम. वधारकर, एम.एम. सानप, ए.डी.खडके या पथकाने खारबाव येथे एक धाब्यावर रात्रभर पाळत ठेवून पहाटेच्या सुमारास पंधरा पंधरा मिनिटांच्या अंतराने आलेले तीन आयशर ट्रक क्रमांक MH 04 HY 937 , DN 09 K 9472 , DN 09 S 9691 हे ट्रक आले असता त्यांना अडवून त्यांची तपासणी केली असता त्यामध्ये २८० गोणी विमल सुगंधित पान मसाला व तंबाखू गुटखा आढळून आला .या कारवाईत ट्रक चालक मोहम्मद आदिल व उदल यादव यांना ताब्यात घेत असतानाच तिसरा ट्रक चालक अंधाराचा फायदा घेत एक पसार झाला असून ६५ लाख ७८ हजार रुपयांचा गुटखा व ३६ लाख रुपयांचे ट्रक असा एकूण १ कोटी १ लाख ७८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करीत त्यांच्या विरोधात भादवी कलम २७२,२७३,१८८,३२८ सह अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ चे कलम ५९ अंतर्गत भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करीत सर्व मुद्देमाल जप्त केला आहे.

## भाजपा युवक नेते संतोष पाटीलांची कन्या दिव्यानी पाटील हिचे सुयश!

**देवणी/प्रतिनिधी**



देवणी येथील भाजपाचे जेष्ठ नेते बस्वराज गुरबसप्पा पाटील यांची नात तथा भाजपा युवक नेते संतोष बस्वराज पाटील यांची कन्या कु.दिव्यानी संतोष पाटील हिने इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेत ९५ टक्के गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे. उदगीर येथून इंग्रजी माध्यमातील शिक्षण घेतलेल्या कु.दिव्यानीने सर्वच विषयांत विशेष प्राविण्य दाखवित गुण पटकावले आहेत.तिला संपुर्ण विषयातील एकूण ५०० पैकी ४६०+१५ असे गुण मिळाले आहेत.तिला या यशात बल्लुरकर सर, कापसे सर,घुगे सर, देवरसे सर, अबंडे सर, नऊशेन मॅडम आदींचे सहकार्य मिळाले. तिच्या या यशाबद्दल तिचे गुरूजन, पाटील परिवार, नातेवाईक, मित्र परिवार आदींसह माजी मंत्री संभाजी पाटील निलंगेकर, अरविंदभैया पाटील निलंगेकर, नागनाथ अण्णा निडवदे, रामचंद्र तिरूके, काशिनाथ अण्णा गरीबे, प्रशांत पाटील जवळगेकर, पृथ्वीराज शिवशिवे सर, भगवानदादा पाटील तळेगावकर, शंकरराव पाटील तळेगावकर, सत्यवान कांबळे, वैजनाथ आष्टूरे, हावगीराव पाटील, प्रकाश पाटील, मनोहर पटने, यशवंतराव पाटील, अमर पाटील, ओम धनुरे, अटलविश्वास धनुरे, शरणप्पा पाटील, विजय लुल्ले, रमेश कोतवाल, प्रा. रेवणप्पा स्वामी मळभगे, माणिकराव पाटील, शंकरराव पाटील, महेश पाटील, उमेश पाटील, गणेश पाटील, अमित संभाळे, विनोद मलशेटे आदींनी अभिनंदन केले आहे.

## अपघातात तरुणाचा जागीच मृत्यू



वाडा : मामाच्या घरून परत येत असताना दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने झालेल्या अपघातात २५ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली आहे. तालुक्यातील दुपारे पाडा येथे राहणारा तरुण सोपान मंगेश दुपारे (२४) हा सोमवारी रक्षाबंधन असल्याने आईला त्याच्या मामाकडे कांबरा येथे सोडून परत येत असताना माळी पाडा येथील वळणावर दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने त्याची गाडी रस्त्या कडेला असलेल्या झाडावर आदळली ही धडक येवढी भयंकर होती की या धडकेत सोपानचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे. हसमुख चेहरा, कधीही कुनाशी न भांडनारा, मन मिळावू, इतरांच्या मदतीला धावणारा, निर्व्यसनी व दासभक्त असलेल्या सोपानच्या जाण्याने परिसरात शोककळा पसरली आहे. या प्रकरणी वाडा पोलिस ठाण्यात निष्काळजी पणे वाहन चालवून स्वतःच्या मृत्यूस कारणीभूत झाला म्हणून भा.दं.सं.वि. ३०४(अ) नुसार गुन्ह्याची नोंद करण्यात आली असल्याची माहिती पोलीस निरीक्षक जयकुमार सूर्यवंशी यांनी दिली.

## वाडा तालुक्यातील विकासकामांचा आमदार दौलत दरोडांच्या हस्ते शुभारंभ



**वाडा** : वाडा तालुक्यातील गारगाव येथे विविध मंजूर विकासकामांचे भूमिपूजन शुक्रवारी शहापूर विधानसभेचे आमदार दौलत दरोडा यांच्या हस्ते करण्यात आले. वाडा तालुक्यातील शहापूर विधानसभा मतदारसंघात येणाऱ्या गारगाव परिसरात आमदार दौलत दरोडा यांच्या प्रयत्नाने विविध योजनांतर्गत विकासकामे मंजूर करण्यात आली आहेत. यामध्ये गारगाव येथे समाजगृह, धापटे ते मेनरोड पर्यत रस्ता, मुख्यरस्ता ते विहिरीकडे जाणारा रस्ता, हनुमान मंदिर ते विठ्ठल भांगरे यांच्या घरापर्यत जोडणारा रस्त्याचे भूमिपूजन आमदार दरोडांच्या हस्ते करण्यात आले. तसेच यावेळी गारगाव येथील धर्मवीर प्रतिष्ठानच्या व्यायाम शाळेचे उद्घाटनही आमदार दरोडांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाप्रसंगी वाडा पंचायत समितीचे उपसभापती जगदीश पाटील, जिल्हा परिषद सदस्य रोहिणी शेलार, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस अशोक गव्हाळे, तालुकाध्यक्ष रोहिदास पाटील, माजी उपसभापती मृणाली नडगे, पंचायत समिती सदस्य रघुनाथ माळी, पुनम पथवा, प्रकाश पाटील रोहिदास शेलार, कैलास सोनटक्के, भगवान भोईर आदी उपस्थित होते. यावेळी परिसरातील नागरिक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.

# पाच महिन्यानंतर वाड्यातील ग्रामीण भागात बस सेवा सुरू

**वाडा/प्रतिनिधी**




मार्च महिन्यात वाड्यातील खंडेश्वरी नाका ते परळी नाका दरम्यान रस्ता रुंदीकरण व काँक्रीटीकरणाच्या कामाला सुरुवात झाली होती त्यामुळे वाडा बस स्थानकात येणाऱ्या सर्व बस खंडेश्वरी नाक्या पर्यतच येत होत्या त्यानंतर मार्च महिन्यात कोरोनाचा शिरकाव झाल्याने देशभर लॉकडाउन लागू करण्यात आल्याने बस सेवा सुद्धा बंद करण्यात आल्या होत्या. मागील काही दिवसांपासून रस्त्याचे काम पूर्ण होऊन वाहतुक सुरळीत चालू झाली आहे मात्र कोरोनाचा प्रभाव तालुक्यात वाढतच असल्याने बस सेवा सुरू करण्यात येत नव्हत्या मात्र आता कोरोना पॉझिटिव्ह असलेले रुग्ण काही दिवसातच निगेटिव्ह होऊन घरी परत येत असल्याने नागरिकांच्या मनातून भीती नाहीशी होत असल्याचं चित्र दिसून येत आहे. लॉकडाऊन काळात भिवंडी, ठाणे, कल्याण व पालघर च्या बस चालू होत्या पण ग्रामीण भागातील बस सेवा बंदच ठेवण्यात आल्या होत्या त्या रविवार पासून सुरू करण्यात आल्या आहेत तर कोरोनाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक बस आगारातून बाहेर पडताना व बाहेरून आल्या नंतर दोन वेळा धुवून घेतल्या जात असल्याची माहिती वाहतूक नियंत्रक रघुनाथ दळवी यांनी दिली. तालुक्यातील पिंपळास, अलमान, सापना, निशेत, पिंपरोली, दाभोन मांगरूळ, गारगाव, पिंपरोळी या गावातील बस सेवा काही प्रमाणात सुरू करण्यात आल्या आहेत प्रवाशांचा प्रतिसाद मिळाला तर आणखी फेऱ्या वाढविण्यात येतील असेही दळवी यांनी सांगितले.

# मराठी मातीतले बिहारी घरभेदी

मुंबई पोलीस हे तपासाच्या बाबतीत जगातील दुसऱ्या क्रमांकाचे पोलिस म्हणून ओळखले जातात. कारण स्कॉटलंड यार्ड नंतर जगातली दुसरी सक्षम तपास यंत्रणा म्हणून मुंबई पोलिसांकडे पाहिले जाते आणि याच मुंबई पोलिसांमुळे आज मुंबईतील ३ कोटी लोक सुरक्षित आहेत. मुंबई पोलीस दलात अत्यंत कमी मनुष्यबळ असूनही त्यांच्या कामाचा दर्जा जर सर्वोत्तम असेल तर अशा पोलिसांबद्दल केवळ मुंबई महाराष्ट्रालाच नव्हे, तर संपूर्ण देशाला अभिमान वाटायला हवा. कारण देशाच्या प्रत्येक राज्यातील लोकं मुंबईत येऊन पोट भरीत आहेत आणि त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी याच मुंबई पोलिसांनी समर्थपणे आपल्या शिरावर पेलली आहे. त्यामुळे प्रत्येक मुंबईकर पोलिसांचा ऋणी आहे. असे असताना कोण कुठला सुशांतसिंग राजपूत यांच्या आत्महत्येवरून मुंबई पोलिसांना टार्गेट केले जात आहे. त्यांनी केलेल्या तपासाबाबत संशय घेतला जात आहे. त्यामुळे मुंबई महाराष्ट्राशी प्रामाणिक असलेल्या प्रत्येक माणसाच्या मनात संतापाची भावना आहे. पण काही भाड्याचे टट्टू मराठी असूनही आज बिहरींच्या आवाजात बोलून मुंबई पोलिसांना बदनाम करीत आहेत. युपी बिहारींना वर्षांवर्ष मुंबई महाराष्ट्राने पोसले आहे, तरीही महाराष्ट्रावर त्यांचा जळफळाट आहे. कारण गेल्या ७० वर्षात महाराष्ट्राने सर्वच क्षेत्रात प्रगती केली आहे, तर युपी, बिहारमध्ये आजही १९४७ सारखी स्थिती आहे. तिथे ना धड शेती आहे, ना धड उद्योग धंदे आहेत. त्यामुळे तिथले लोक पोट भरण्यासाठी मुंबईला येतात आणि मुंबईने सुद्धा त्यांना आपल्यात सामावून घेतले, त्यांना रोजी रोटी दिली, त्यांना वेगवेगळ्या क्षेत्रात नाव आणि पैसा कमावण्याची संधी दिली. अशापैकीच एक होता सुशांतसिंग राजपूत. तो बिहार वरून इथे काय घेऊन आला होता? काय होतं त्याच्याकडे? त्याने जे काही मिळवलं ते इथे मुंबईत अर्थात त्याला ते टिकवता आले नाही हा काय मुंबईचा दोष? त्याने कमावलेला सगळा पैसा आय्याशित उडवला, याला मुंबई किंवा महाराष्ट्र सरकार जबाबदार आहे का? तरीही आज संपूर्ण बिहार तिथले पोलिस तिथले राजकारणी तिथला सोशल मीडिया मुंबई पोलिसांना दोष देतोय. ज्या महाराष्ट्र सरकारने त्यांना रोजी रोटी दिली त्याच महाराष्ट्र सरकारला शिव्याशाप देतोय. त्यामुळेच आज मनसेची या युपी बिहारी बाबतची भूमिका किती रास्त होती याची आज प्रचिती आलीय. सुशांत सिंग राजपूतने आत्महत्या केली हे सूर्य प्रकाशा इतके सत्य आहे. त्यामुळे बिहारी लोकांनी किती जरी आकांड तांडव केले आणि साप समजून भुई थोपटली तरी त्याचा फायदा नाही. सुशांत बिहारी असल्यामुळे त्याच्या बाबत बिहारीचा आक्रोश समजण्यासारखा आहे, पण जे इथले काही हरामखोर बिहारींच्या सुरात सूर मिसळून छात्या पिटत आहेत त्यांचे काय? अरे तुम्ही महाराष्ट्रीयन आहात की बिहारी ते अगोदर सांगा! तुम्ही इतकी वर्ष मुंबईत राहत आहात मुंबईने तुम्हाला नाव दिलं भल्या बुऱ्या मार्गाने पैसा कमावण्याची संधी दिली आणि ज्या मुंबई महाराष्ट्राच्या जीवावर तुम्ही मोठे झालात, ज्या मुंबई पोलिसांनी तुम्हाला सुरक्षा दिली म्हणून गुन्हेगार असतानाही तुम्ही वाचलात त्याच महाराष्ट्रावर आज टांगवर करताना तुम्हाला थोडी तरी लाज वाटायला हवी होती. महाराष्ट्राचं खाऊन बिहारींची बाजू घेऊन बोलणाऱ्या लोकांनी बिहारमध्ये जाऊन एक महिना सुरक्षित राहून दाखवावे, म्हणजे तुम्हाला महाराष्ट्र आणि बिहार मधला फरक कळेल. आता जे लोक बिहरींची बाजू घेत आहेत त्यांना महाराष्ट्रातल्या प्रत्येक मतदाराने लक्षात ठेवावे. कारण हे लोक महाराष्ट्रासाठी धोकादायक आहेत. आज शिवप्रभू असते तर त्यांनी या महाराष्ट्र द्रोह्यांना हत्तीच्या पायी दिले असते किंवा टकमक टोकावरून त्यांचा कडेलोट केला असता. कारण महाराष्ट्र सर्व काही सहन करू शकतो, पण गद्दरी सहन करू शकत नाही आणि महाराष्ट्रात जे जे सूर्याजी पिसाळ झाले ते कुत्र्याच्या मौतीने मारले गेले. आज जे बिहारींना खांद्यावर घेऊन नाचत आहेत त्यांनी शिवशाहीचा हा इतिहास विसरू नये. एखाद्या प्रश्नाचे राजकारण जरूर करावे, पण जेंव्हा आपल्या मातीच्या अस्मितेचा प्रश्न येतो तेंव्हा राजकारण बाजूला ठेऊन राज्याच्या हितासाठी एकत्र येऊन काम करायचे असते. पण दुर्दैवाने या महाराष्ट्रात आज असे काही राजकारणी पैदा झालेत की ज्यांना महाराष्ट्राच्या अस्मितेपेक्षा पक्ष अधिक जवळचा वाटतोय आणि म्हणूनच लोकांनीही अशा घरभेद्यांना सतेच्या राजकारणा पासून दूर ठेवायला हवंय. राहता राहिला प्रश्न सुशांतसिंग राजपूतच्या आत्महत्येचा तर बॉलिवूडमध्ये यापूर्वीही अशा अनेक आत्महत्या झाल्या होत्या. तेंव्हा इलेक्ट्रॉनिक मीडियावाले झोपले होते का? त्यांनी का नाही झिया खानच्या आत्महत्येविरूद्ध आवाज उठवला. त्या प्रकरणामध्ये तर झियाच्या आईच्या जबानीवरून आदित्य पांचोली आणि झरीना वहाबच मुलगा सूरज विरूद्ध गुन्हाही दाखल झाला होता, तेंव्हा कुठे गेले होते अन्यायाच्या विरोधात आवाज उठवणारे मराठी नेते? आज अर्बन गोसावी नावाचा एक पिसाळलेला कुत्रा महाराष्ट्रावर भुंकतोय पण त्याने केलेल्या फसवणुकीमुळे एका मराठी आर्किटेक्चरने आत्महत्या केली होती, त्याची बायको गेली दोन वर्ष न्यायासाठी भटकते आहे. आज सुशांतसिंगसाठी अस्तन्या सावरून मुंबई पोलिसांवर तुटून पडणारे इथले घरभेदी पुढारी त्या मराठी माणसाच्या बायकोच्या मदतीला का नाही धावले? अर्बन गोसावी हा चॅनलवाला आहे, पण त्याचा चॅनल कुत्राही बघत नाही. तरी त्याची मिजास केवढी बघा महाराष्ट्रासारख्या एका मोठ्या राज्याच्या विरोधात तो चॅलेंजची भाषा करतोय. एकदा त्याने मार खाल्ला त्यातून त्याने काहीच धडा घेतला नाही. कारण असे लोक निर्लज्ज असतात. त्यांना लोकांच्या शिव्या आणि मार खाण्याची सवय झालेली असते. अर्बन याने मराठी माणसाला अजून पुरते ओळखलेले नाही म्हणून तो असा वागतोय. अर्बन असो किंवा सुशांतसाठी धायमोकलून रडणारे बाकीचे हिंदी चॅनेलवाले असोत त्यांच्या कोल्हेकुईला हा शिवरायांचा महाराष्ट्र कदापि घाबरणार नाही हे त्यांनी लक्षात ठेवावे.

# हे तर 'लिव्ह इन'चे दुष्परिणाम



**संध्या स्ट्रोक**

**सोनू जाधव**

आयटी तंत्रज्ञानामुळे जग खूप जवळ आलंय. सर्वच क्षेत्रात ग्लोबलायझेशन सुरू आहे. जगाच्या विकासाच्या दृष्टीने हे किती जरी खरे असले तरी प्रत्येक देशाची वेगवेगळी संस्कृती आहे आणि त्यात ज्या गोष्टी बसत नाहीत त्याचे आपण अनुकरण करायला गेलो की मग त्यातून फायद्याऐवजी नुकसानच अधिक सोसावे लागते. दुर्दैवाने याच वस्तुस्थितीचा आजच्या पिढीला विसर पडत चालला आहे. त्यामुळेच पश्चात देशातील काही चुकीच्या आणि आपल्या मूळ संस्कृतीत न बसणाऱ्या गोष्टींचे जेंव्हा आपण अनुकरण करायला जातोय. तेंव्हा त्यातून अनेक समस्या उद्‌भवत आहेत. सेक्स हा सुद्धा एक असाच विषय आहे. कारण फॉरेन कंट्रीमध्ये स्त्री पुरुषांच्या किंवा अन्य प्रकारच्या लैंगिक संबंधांना कोणत्याही मर्यादा अथवा नात्या गोत्याची बंधने नाहीत. त्यामुळे तिथे सर्व काही खुलेआम चालते आणि त्यातूनच लिव्ह इन रिलेशनशिपच्या व्यभिचारी पद्धतीचा उदय झाला आणि हे सर्व येवढ्यासाठी सांगावस वाटतंय की सध्या अभिनेता सुशांत सिंह राजपूत यांच्या आत्महत्येचे जे प्रकरण गाजतेय ते लिव्ह इन रिलेशनशिप मधूनच घडलेय. मुळात लग्न न करता स्त्री पुरुषाने एकत्र राहणे हे भारतीय संस्कृतीत बसतच नाही. कारण यात फक्त आणि फक्त व्यभिचार असतो. जोवर महिलेला पुरुषाचं आणि पुरुषाला महीलेच शारीरिक आकर्षण असते तोवरच असली नाती टिकतात. शिवाय अशा नात्यांना आर्थिक समृद्धीच पाठबळ असावं लागत, तरच काही काळ ही नाती टिकतात. बरे अशा नात्यांना कायद्याची कुठलीही बंधने नसतात. ज्याप्रमाणे लग्नासाठी किंवा घटस्फोटासाठी कायद्याची, समाजाची, कुटुंबाची मान्यता असावी लागते. त्याप्रमाणे लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये अशा कोणत्याही मान्यतेची आवश्यकता नसते. त्यामुळेच आजकाल लोकांनी आणि खास करून सिनेमा सृष्टीतील लोकांनी फक्त मजा मौज करण्यासाठी लिव्ह इन... चां शॉर्ट कट निवडलाय. बर आहे ना एखादी मुलगी आवडली तर थोडे दिवस तिच्याशी मजा मारायची आणि नंतर दुसरी शोधायची. बायकांच्याही बाबतीत तेच एखादा पैसेवाला बघायचा थोडे दिवस त्याच्या पैशावर मजा मारायची त्याच्याकडून लुटता येईल तितका पैसा लुटायचा आणि तो थकला किंवा कंगाल झाला की दुसरा गाठायचा, यालाच म्हणतात लिव्ह इन रिलेशनशिप! त्यामुळे रिया चक्रवर्ती असो किंवा अंकिता लोखंडे असो लिव्ह इन मधल्या बायकांचा हाच धंदा आहे आणि फिल्म लाईनमध्ये अशा कितीतरी रिया आणि अंकिता आहेत. ज्या मालदार लोकांच्या सोबत लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये आहेत. मात्र अशा बायांना वापरणाऱ्यांना त्यांच्यात किती गुंतून राहायचे याची अक्कल असायला हवी. सुशांत सिंह राजपूत याला तशी अक्कल नव्हती म्हणून तो अशा बायांच्या नदी लागून बरबाद झाला आणि त्याच्यावर आत्महत्या करण्याची पाळी आली. आता त्याच्या घरचे रीयाच्या नावाने कशासाठी बोबलत आहेत तेच कळत नाही. अरे तुमचा मुलगा स्वतःला घडवण्यासाठी स्वतःच नशीब आजमावण्यासाठी मुंबईत आला होता, इथं येऊन त्याने स्ट्रगल केलं, त्यानंतर त्याच्या नशिबाने त्याला काही सिनेमा मिळाले. त्यातून त्याच्याकडे थोडाफार पैसा आला. पण त्या पैशाचं त्याला महत्व कळल नाही आणि जे लोक असे लूज क्यॅरॅक्टरचे असतात त्यांना रिया सारख्या बायका सहज जाळ्यात ओढून त्यांचा पैसा लुटतात. मात्र सुशांतला कळायला हवं होत की अजून आपल्याला खूप पल्ला गाठायचा आहे. त्यामुळे त्याने आपलं सगळं लक्ष करीयरकडे द्यायला हवं होत, पण तेच त्याला जमल नाही. बरे बिहार वरून बॉलिवूडमध्ये करीयर करायला आलेला सुशांत हाच काही एकटा अभिनेता नव्हता तर काही वर्षांपूर्वी एक बिहारी तरुण मुंबईला नशीब आजमवण्यासाठी आला. त्याने इथे प्रचंड स्ट्रगल केल्यामुळे मिळेल ती भूमिका स्वीकारून खलनायक पासून सुरुवात करून नायक बनला आणि नाव कमावलं आणि याच भांडवलावर तो खासदारही झाला त्याच नाव शत्रुघ्न सिन्हा! आज बॉलिवूड आणि राजकीय क्षेत्रात त्याच नाव आहे. समाजात त्याला इज्जत आहे. त्याचंही रिना रॉय बरोबरच प्रेम प्रकरण खूप गाजलं, पण त्याने रीनाला आपल्या व्यावसायिक आणि कौटुंबिक आयुष्या पासून दूर ठेवले. म्हणून तो यशस्वी झाला आणि आज आपल्या संसारात सुखी आहे. तसं पाहता सुशांतसिंग शत्रुघ्न सिन्हा समोर किस झाड की पत्ती होता. पण त्याचा आदर्श जर सुशांतने डोळ्यासमोर ठेवला असता तर त्याच्यावर आत्महत्या करण्याची पाळी आली नसती सुशांतच्या आत्महत्येने पुन्हा एकदा लिव्ह इन रिलेशनशिपचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. कारण अशा अनैतिक संबंधांमुळे विवाह संस्थांचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. कारण लोकांना आता असं वाटू लागलंय की लग्नासाठी लाखो रुपये खर्च करून आयुष्यभर एकाच बाईच्या पदराला बांधून घेण्यापेक्षा लिव्ह इन रिलेशनशिप काय वाईट आहे? कपडे बदलतात तशा प्रकारे पुरुषांना बायका आणि बायकांना पुरुष बदलता येतात ना कायद्याची झंझट न संसराच टेंशन! आश्चर्याची गोष्ट म्हणजे जे हिंदू धर्म संस्कृतीचे रखवालदार आहेत ज्यांचा वेलेनटाईन डे ला विरोध असतो जे गार्डन मध्ये प्रेमी युगुलांना बसायला देत नाहीत त्यांना मात्र या लव्ह इन रिलेशनशिप बद्दल फारसे काही वावगे वाटत नाही. कारण त्यांच्याही अशाच काही भानगडी असतील म्हणून ते गप्प असावेत. पण यावर आता देशव्यापी चर्चा होणे गरजेचे आहे.

कारण लिव्ह इन रिलेशनशिप मधून गुन्हेगारीला आणि व्याभिचार करायला चालना मिळतेय. त्याच बरोबर यातून कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनाही घडत आहेत. कारण लिव्ह इनमध्ये राहणारे पुरुष किंवा बायका या बहुतेक विवाहित असतात. कारण अशा संबंधात पुरुषांना कसलीच भीती नसते तर अशा संबंधातून महिलांना गर्भधारणा झाली तर नवऱ्यावर बिल फाडता येते, एकूणच काय तर लिव्ह इन् रिलेशनशिप हे मजमौज करण्याचं हक्काचं आणि स्वस्त साधन बनलाय, म्हणूनच लोकं त्याकडे जास्त आकर्षित होत आहेत. पण त्यातून लोकांचे संसार उध्वस्त होतायत, विवाह संस्था धोक्यात येतायत त्याचे काय? समाजाने आणि सरकारनेही याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे, तरच समाजाचे स्वास्थ्य आणि संस्कृती टिकून राहील.

**(मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३)**

# आधुनिक दुचाकी भारतात लाँच

**तारुण्यात सगळ्यांना दुचाकीचे आकर्षण असते. रायडिंग, टूर्स, कूल स्टाईल स्टेटमेंट म्हणून दुचाकीकडे पाहण्याचा पहिला दृष्टीकोन असतो. कॉलेज संपल्यावर मात्र हिच दुचाकी सोयीचे साधन बनते. वाहतूक कोंडीतून मार्ग काढण्यासाठी सोप्पी, सहज पार्किंग, रिक्षा आणि बसपेक्षा चांगला प्रवास, सामानाची ने-आण, गर्लफ्रेंडसोबत फिरणे इत्यादी कारणांमुळे बाईक चालवायला सगळ्यांना आवडते. भारतात गिअर आणि नॉन-गिअर दोन्ही दुचाकींची अमाप लोकप्रियता आहे. अगदी सर्वसामान्य व्यक्तीपासून ते अतिश्रीमंत व्यक्तीपर्यंत सगळ्यांकडे दुचाकी त्यांच्या त्यांच्या सोयीसाठी किंवा आवडीसाठी असते.**



**दिशायन**

बऱ्याच दिवसंपासून टीव्हीवर अमिताभ बच्चन आणि महेंद्र सिंह धोनी टीव्हीएस मोटर्स भारतात पहिल्यांदाच काहितरी आणत असल्याची जाहिरात पाहिली. ही जाहिरात सगळ्यांच्याच चर्चेचा विषय बनली. संपूर्ण जाहिरात प्रसिद्ध केल्यानंतर टीव्हीएस मोटर्सने इटी-एफआय आणि आरटी-एफआय अर्थात इकोथ्रस्ट फ्युएल इनजेक्शन आणि रेस ट्युन्ड फ्युएल इनजेक्शन या टेक्नॉलॉजींनी परिपूर्ण दुचाकी आणल्या आहेत. टीव्हीएसच्या अपाची ३१०, रेडिओन या गिअर असलेल्या दुचाकी आणि जुपिटर, एनटॉर्क या नॉन-गिअर दुचाकींमध्ये ही यंत्रणा जोडून नव्याने लाँच करण्यात आले आहे.



एफआय म्हणजे फ्युएल इनजेक्श. दुचाकीचे इंजिन हे हवा आणि इंधनाच्या मिश्रणाने सुरू होते किंवा चालते. ही मिश्रणाची प्रकिया पूर्वी कार्बोरेटर यंत्रणेद्वारे चालविली जात होती. पण सध्याच्या दुचाकींमध्ये फ्युएल इनजेक्शन हीच यंत्रणा कार्यान्वित केली जाते. खरेतर हवा आणि इंधनाचे मिश्रण व्यवस्थित झाले नाही तर इंजिन लवकर खराब होते. त्यासह गाडीतून कार्बन मोनॉक्साईड मोठ्या प्रमाणात बाहेर पडतो. हा वायू पर्यावरणासाठी अतिशय हानिकारक आहे. त्यामुळे जगभरातील देशांमधील मोटर उत्पादक कंपन्यांनी फ्युएल इनजेक्शनयुक्त गाड्या बनवण्यास सुरुवात केली.

जगभरात स्वीकारल्या गेलेल्या युरोपीय वाहनांमधील वायू उत्सर्जनाच्या निकषांवरुन भारतात बीएस अर्थात भारत स्टेज हे नियम केंद्र शासनाने लागू केले. बीएस ४ च्या नियमांमध्ये सुधारणा आणून बीएस ६ या वर्षी एप्रिलपासून लागू करण्यात येणार होते. मात्र टाळेबंदीमुळे सर्व उत्पादने, विक्री बंद झाली. मोदी सरकारने २०१६ मध्येच सांगितले होते की बीएस ५ हा स्तर सोडून थेट ६ व्या स्तराचे नियम स्वीकारले जातील. प्रदूषणावर नियंत्रण मिळविण्यासाठी जगभरातील गाड्यांच्या उत्पादकांसाठी हे निकष लावण्यात आले आहेत. म्हणूनच एफआय तंत्र उत्पादकांनी आपल्या गाड्यांमध्ये आणले. जेणेकरून प्रदूषणावर नियंत्रण ठेवता येईल आणि इंजिनही चांगले चालेल.

बीएस ६ च्या निकषांनुसार इंधनातील सल्फरचे प्रमाण प्रति भाग ५० दशलक्षावरुन १० दशलक्ष करण्यात येणार आहे. डिझेल आणि पेट्रोलवर चालणाऱ्या गाड्यांमधून नायट्रोजन ऑक्साईडचे उत्सर्जन होते. हे उत्सर्जन डिझेलवर चालणाऱ्या गाड्यांमधून ७० टक्के तर पेट्रोलवर चालणाऱ्या गाड्यांमधून २५ टक्क्यांनी कमी करण्यात येईल. या नव्या बीएस ६ च्या नियमांमुळे पूर्वीच्या नियमांनी बनत असलेल्या ६ लाख दुचाकी आणि ९६ हजार चारचाकी गाड्यांचे उत्पादन मार्च महिन्यापासून थांबविण्यात आले. या सर्व निकषांवर नुकतीच लाँच झालेली इटी-एफआय आणि आरटी-एफआय तंत्रयुक्त टीव्हीएस दुचाकी खरी उतरली आहे.

टीव्हीएसने इतर उत्पादकांच्या एक पाऊल पुढे जात, आपल्या गिअर आणि नॉन गिअर दुचाकींमध्ये ड्युएल एफआय तंत्र कार्यान्वित केली आहे. इकोथ्रस्ट फ्युएल इनजेक्शन आणि रेस ट्युन्ड फ्युएल इनजेक्शन ही दोन्ही तंत्रे एकत्र आणली. या दोन्ही तंत्राच्या एकत्र वापरामुळे इंजिनमधील घर्षण सहज होते कारण यात मॉलिकोटचा थर दिलेला असतो. ट्रफिकमध्ये गाडीचे इंजिनमध्ये सतत घर्षण होते. त्यामुळे इंजिन लवकर खराब होते. पण या तंत्रामुळे इंजिनचा कार्यकाळ वाढेल. अद्ययावत थ्रोटल मेकॅनिझममुळे म्हणजे इंधनाच्या प्रवाहाचे व्यवस्थापन करणारे यंत्र इंजिनची पावर वाढते. त्यामुळे रायडिंग करायला मज्जा येते. अद्ययावत मायक्रोप्रोसेसरमुळे गाडी कोल्ड पीक-अपही लगेच घेते. तसेच डिजिटल मॅपिंगमुळे गाडीचा स्पीड, इंधन इत्यादी गोष्टी डिजिटली रेकॉर्ड होऊन प्रदर्शित होतात. इंजिनची पावर जास्त असल्यामुळे कठीण रस्त्यांवरही गाडी चांगली चालते. यामुळे दुचाकींच्या देखरेखीचा खर्च आपोआप कमी होतो, असा दावा टीव्हिएसने या तंत्राबद्दल केला आहे. इटी-एफआय आणि आरटी-एफआय तंत्रयुक्त दुचाकींची मुख्य खासियत आपण जाहिरातीत पाहिलीच आहे. या गाड्या १५ टक्क्यांनी अधिक मायलेज देतात. या नव्या दुचाकी भारतातल्या सर्वसामान्य जनतेला परवडणाऱ्या आहेत. तसेच यामुळे गाड्यांमुळे होणाऱ्या प्रदूषण आटोक्यात येणार आहे.

आज दुचाकीमध्येही किती वेगवेगळे तंत्रज्ञान येत आहे. ज्यामुळे माणसाचे जीवन अधिक सुकर होत आहे. गंमत म्हणजे चाकाचा शोध इ. स. पूर्व ५ हजारमध्ये लागला होता. ज्या चाकामुळे माणसाला गती मिळाली आणि माणूस उत्तरोत्तर प्रगत होत गेला. आजही त्या चाकाचा वापर आपण इतक्या निरनिराळ्या पद्धतीने करत आहोत, त्यात नवे तंत्र आणत आहोत. अगदी मातीची भांडी बनवण्यापासून ते मोठ मोठ्या मशिन्समध्येही याचा वापर होत आहे. आज आपल्याला सर्वात जुने चाक इराकमध्ये म्हणजे पूर्वीच्या मेसोपोटेमियामध्ये आढळते. तेथे उत्खननाद्वारे मिळालेले इ. स. पूर्व ४ हजार २०० ते ४ हजार दरम्यानचे चाक अस्तित्त्वात आहे. इजिप्त आणि मेसोपोटेमियामध्ये इ. स. पूर्व ४ हजार ते इ. स. पूर्व ३ हजार ५०० दरम्यान चाकाचा वापर प्राथमिक स्वरुपात वाहतुकीसाठी केल्याचे पुरातत्त्वशास्त्रज्ञांनी सांगितले आहे.

पुढे याच चाकावर निरनिराळे प्रयोग करत माणसाने सायकल बनवली. जगात पहिली सायकल जर्मनीत १८१७ मध्ये बनविण्यात आली होती. पहिल्या मोटरसायकलचा जन्मसुद्धा जर्मनीत १८८५ मध्ये झाला. आपल्या सर्वानाच माहिती आहे की सायकलवरुनच मोटरसायकलचा शोध लागला. म्हणूनच दुचाकीला मोटरसायकल आणि बाईक (बायसिकल) हे शब्द पडले. तर अमेरिकेत १८९५ मध्ये पहिल्यांदा नॉन गिअर दुचाकी अर्थात स्कूटर बनविण्यात आली, ही माहिती अमेरिकेतील ब्रिटानिका या माहिती कोशागारमध्ये लिहिली आहे. जे इंटरनेटवरही उपलब्ध आहे. आज या गिअर आणि नॉन गिअर दुचाकींचा वापर सहज सोप्पा व्हावा यासाठी संशोधन करून वेगवेगळे तंत्र आणले जात आहे. जसे टीव्हीएसने भारतात पहिल्यांदा दुचाकीमध्ये इटी-एफआय आणि आरटी-एफआय तंत्र आणले.

करोना माहमारीचे संकट आल्यामुळे देशभरात टाळेबंदी करण्यात आली. त्यामुळे सर्व सार्वजनिक वाहतूक बंद झाली. अशावेळी अडचण आल्यावर बाहेर जाताना कोणत्याही प्रकारची गाडी असणाऱ्यांना त्याचा उपयोग करता आला. आपल्या देशात चारचाकीपेक्षा दुचाकीच वापरली जाते. चारचाकीच्या मानाने स्वस्त, कमी जागा लागते, टोल-पार्किग फी कमी, वाहतुककोंडीत सहज जागा काढून बाहेर पडता येते इत्यादी कारणांमुळे दुचाकीला पसंत केले जाते. २०१९ मध्ये ऑटोमोबाईल इंडस्ट्री खालावत असतानाही २ कोटी १ लाख दुचाकी विकल्या गेल्या.

सध्या टाळेबंदी शिथील झाली तरी सार्वजनिक वाहतूक पूर्णपणे सुरू झालेली नाही. अशावेळी ज्यांच्याकडे गाडी आहे त्यांच्या प्रवास व्यवस्थित होत आहे. तसेच टाळेबंदी पूर्णपणे हटल्यावर अनेक लोक करोनाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून सार्वजनिक वाहतुकीने प्रवास करणे टाळतील. अशावेळी जास्त मायलेज देणारी, कमी देखरेख करावी लागणारी दुचाकी खरेदी करण्यासाठी सर्वसामान्य मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यम वर्गीय लोक नक्कीच सरसावतील, असा विश्वास ऑटोमोबाईल तज्ज्ञ मुकेश विरानी यांनी व्यक्त केला आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण**, सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

10 TO 16 AUGUST 2020 (CRIME SANDHYA):Layout 1 08/08/2020 7:42 PM Page 1



# मृत्यू घराचा पहारा, विनोद अहिरे यांचे पुस्तक प्रकाशनाच्या वाटेवर

**जळगाव/प्रतिनिधी**

जळगाव जिल्हा पोलिस दलातील मुख्यालयात कार्यरत असलेले पोलीस नाईक विनोद पितांबर अहिरे गेल्या तीन महिन्यापासून कोरोना कक्षात ड्युटी करत आहेत. दि. २१/४/२०२० रोजी अहिरे यांची प्रथमच कोरोना कक्षात ड्युटी लावण्यात आली. त्यावेळी कोरोनाची जनमानसात प्रचंड दहशत होती. त्यात पोलीस दल देखील अपवाद नव्हते. त्यामुळे विनोद अहिरे देखील आपल्या कुटुंबीयांच्या काळजीने प्रचंड तणावाखाली झाले होते. आपले अनुभव कथन करतांना त्यांनी म्हटले की माझ्या अठरा वर्षाच्या नोकरीत आतापर्यत ड्युटी करण्याची एवढी भिती कधीच वाटली नव्हती. यापुर्वी अनेक जोखमीच्या ठिकाणी, दंगलीत जिवाची पर्वा न करता अहिरे यांनी कर्तव्य पार पाडले आहे. यापुर्वी दंगलीत अथवा जोखमीच्या ड्युटीत जखमी झाल्यास अथवा जिव गेल्यास ते स्वत:पुरता मर्यादित होते. मात्र कोरोना कक्षातील ड्युटीचे तसे नव्हते. हा आपला एकट्याचा धोका नसून आपल्यासह परिवाराचा देखील धोका होता. आपल्याला कोरोनाची लागण झाल्यास आपल्या परिवाराला




देखील लागण होण्याची भिती विनोद अहिरे यांना सतावत होती. कोरोनामुळे होणाऱ्या मृत्यूच्या कल्पनेने पोलिस नाईक विनोद अहिरे सुरुवातीला भेदरून गेले होते. असे असले तरी त्यांच्यासाठी



देश आणि कर्तव्य महत्त्वाचे होते. कोरोना कक्षात ड्युटी करताना निर्माण झालेल्या भावभावना शब्दबद्ध करत त्यांनी २२/४/२०२० रोजी फेसबुकवर पोस्ट केल्या आहेत. त्या पोस्टला त्यांना भरभरुन प्रतिसाद मिळाला आहे. अनेकांनी फोन करुन त्यांचे कौतुक केले. कोरोना कक्षात ड्युटी करतांना आलेल्या अनुभवाबद्दल आपले एखादे पुस्तक लिहिण्याचे त्यांना सांगण्यात आले.

याच प्रेरणेतून पोलिस नाईक विनोद अहिरे यांनी कोरोना कक्षात ड्युटी करतांना आलेल्या अनुभवावर आधारीत पुस्तक लिहिण्यास सुरुवात केली. मृत्यू घराचा पहारा हे त्यांनी लिहिलेले पुस्तक आता तयार असून प्रकाशनाच्या वाटेवर आहे. सदर पुस्तकाला नाशिक शहराचे पोलीस आयुक्त विश्वास नागरे पाटील यांनी प्रस्तावना दिली आहे. पोलीस अधीक्षक जळगाव व निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त धनराज वंजारी यांनी पुस्तकाला लेखी स्वरूपात शुभेच्छा देखील दिल्या आहेत. पोलिस नाईक विनोद अहिरे यांना पोलिस दलात दाखल करुन घेणारे जळगावचे तत्कालीन पोलिस अधिक्षक प्रवीण साळुंके तसेच कोरोना महामारीत जिवाची बाजी लावणाऱ्या सर्व कोरोना योद्धांना हे पुस्तक अर्पण करण्यात आले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक मल्हारी शिवरकर यांनी विनोद अहिरे लिखीत पुस्तकाला अर्थसहाय्य केले आहे सदर पुस्तकात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर देखील मुख्यमंत्री हे जनतेचे पालक या शीर्षकाखाली लेख लिहिण्यात आला आहे. मुख्यमंत्र्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत पोलिस नाईक विनोद अहिरे यांनी आपले एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री निधीत जमा केले आहे.

# कौशल्याधारित प्रशिक्षणाच्या वर्गाचे आयोजन

**देवणी/प्रतिनिधी,** तालुक्यातील कवठाळा येथे बुधवार दिनांक ५ ऑगस्ट रोजी आत्मा विभागाच्यावतीने शेतकरी व शेतमजूर यांच्या साठी कौशल्य आधारित शेतकरी प्रशिक्षणाच्या एक दिवशी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सदरील कार्यक्रमात शेतकऱ्यांनी विविध पिकावर फवारणी करतेवेळेस फवारणीचे तंत्र, फवारणी करतेवेळी घ्यावयाची काळजी, फवारणी करताना विषबाधा झाल्यास कोणते उपाय करायचे असतात तसेच फवारणीच्या बाबतीत सविस्तर माहिती मार्गदर्शन सदरील प्रशिक्षण कार्यक्रमात शेतकरी शेतमजुरांना प्रात्यक्षिकासह दाखवण्यात आले. आत्माचे प्रकल्प संचालक दत्तात्रय गावसाने साहेब यांचा 'योग्य नियोजनाने आणि आत्मा'चे प्रकल्प उपसंचालक आर.एस. पाटील यांच्या आदेशान्वये संबंधित कार्यक्रमाचे आणखी एक वर्ग शनिवार दिनांक ८ ऑगस्ट रोजी दरेवाडी येथील पुरुषोत्तम नमणगे यांच्या शेतामध्ये होणार आहे. या एक दिवसीय कार्यशाळेत ठिबक तुषार देखभाल-दुरुस्ती संच असणार आहे. या कार्यक्रमासाठी तालुक्याचे बी.टी.एम. राहुल जाधव, कृषी सहाय्यक डी.पी. कदम, कृषी पर्यवेक्षक बी.एम. जाधव, कृषी सहाय्यक सूर्यवंशी जी.पी., प्रगतिशील शेतकरी ओमकार मस्कले, राजकुमार बिरादार, संतोष कुसनुरे, इत्यादी व्याख्याते आणि कवठाळा येथील बळीराजा शेतकरी गटातील सर्व सदस्य, शेतकरी उत्पादक कंपनीचे सदस्य आदींसह शेतकरी बांधव उपस्थित होते.

# बेरोजगार उमेदवारांसाठी ऑनलाईन रोजगार मेळाव्याचे लातूरमध्ये आयोजन

**लातूर - प्रतिनिधी**

जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, लातूर यांच्या मार्फत पंडित दीनदयाळ उपाध्याय ऑनलाईन रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. हा मेळावा १४ ऑगस्ट पर्यंत सुरु राहणार असून नोंदणीकृत उमेदवारांना रोजगार उपलब्धतेसाठी सहाय्य होण्याच्या दृष्टीने मेळावा महत्वाचा आहे.

मुलाखती व्हिडिओ कॉन्फरन्स तसेच मोबाईल किंवा दूरध्वनीव्दारे घेण्यात येणार आहेत. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे शासनाने जाहीर केलेल्या लॉकडाऊनमुळे मागील काही दिवसांपासून अनेक औद्योगिक आस्थापना, व्यवसाय व उद्योग बंद होते. आता शासनाने काही अटी व शर्तींच्या अधिन राहून कंपन्या, औद्योगिक आस्थापना सुरु करण्यास मान्यता दिली आहे. आस्थापनांना मनुष्यबळाची आणि बेरोजगार उमेदवारांना कामाची आवश्यकता आहे. इच्छुकांसाठी या जागा रोजगार मेळाव्यामध्ये विविध नामांकित कंपन्यांकडील ३०० रिक्तपदे (Dioloma - pprentice, CNC Operator, Welder, Turner, Quality Inspector, Semi Skilled Workmen ) अधिसूचित करण्यात आलेली आहेत. (सदरच्या पदामध्ये वाढ होवू शकते.) कंपन्यांचे नियुक्ती अधिकारी ऑनलाईन पध्दतीने तसेच मोबाईल, दूरध्वनीव्दारे पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेऊन विविध पदांसाठी रिक्त जागांसाठी निवड व भरती करणार आहेत. ऑनलाईन अर्ज करणसाठी उमेदवारांनी अद्यापपर्यंत सेवायोजन नोंदणी केली नसल्यास

www.rojgar.mahaswayam.gov.in

या संकेतस्थळावर नोंदणी करावी. तसेच या वेबपोर्टलवर लॉग-इन करुन जॉब फेअर टॅबवर क्लिक करुन online job fair Latur-2 या मध्ये जाऊन १० वी १२ वी पदवीधर तसेच इतर पात्रताधारक उमेदवारांनी आपल्या पात्रतेप्रमाणे विविध कंपन्याच्या उपलब्ध रिक्त पदांसाठी अर्ज करुन जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन प्र. सहायक आयुक्त राजू वाकुडे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवावे - अश्विनी शेलार



**अहमदपूर/फिरोज शेख**

अभ्यासात सातत्य ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांना यश मिळविण्यात कोणीच रोखणार नाही, असे प्रतिपादन पोलीस उपविभागीय अधिकारी अश्विनी शेलार यांनी केले. समविचारी मराठी पत्रकार संघाच्या वतीने गुणवंत विद्यार्थी सत्कारा निमीत्त बोलत होत्या. अहमदपूर शहरातील पेपर विक्रेता इद्रिस सादिक यांचा मुलगा जैद सादीक याने बिकट परिस्थितीमध्येही दहावी बोर्डाच्या परिक्षेमध्ये ८० टक्के गुण घेऊन यश संपादन केले. त्यामूळे त्यांचा सत्कार करण्यात आला.पुढे बोलताना शेलार म्हणाल्या की सत्कारामूळे मुलांना प्रोत्साहन मिळत असतो.मेहनतीने कष्ट केल्यास फळ आपो आप मिळत असते. त्यामूळे विद्यार्थ्यांनी परिस्थितीची जाण ठेवून अभ्यास करून जीवनात यशस्वी व्हावे. शिक्षण फक्त नोकरी किंवा अर्थार्जणासाठीच नव्हे तर एक चांगला व्यक्ती किंवा माणूस तयार होण्यासाठी शिक्षणाची गरज असल्याचे पोलीस उपविभागीय अधिकारी अश्विनी शेलार यांनी सांगितले. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष बासीद पठान, सलीम सय्यद, प्रा.बाबन आत्तार, रामलिंग तत्तापूरे, प्रा. रत्नाकर नळेगावकर, प्रा.सादिक शेख, गजानन भुसारे, सचिन कोंडलवाडे, उदय गुंडिले, मासुम शेख, साबेर शेख, गोंविद काळे, मेघराज गायकवाड, फिरोज शेख, इद्रिस सादिक आदींची उपस्थिती होती.

# प्रियकरासोबत लग्न करण्यासाठी मुलीनेच लुटले बापाचे घर

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरातील नारपोली पोलीस ठाणे हद्दीतील कामतघर येथील अष्टविनायक बिल्डिंग मधील फ्लॅटमध्ये दिवसा ढवळ्या फ्लॅटच्या मुख्य दरवाजाचे लैच लॉक बनावट चावीने उघडून घरातील कपाटासह किचनमध्ये पत्र्याच्या पेटित पिशवीत बांधून ठेवलेले १३ लाख २१ हजार रुपये किमतीचे सोने चांदीचे दागिने व रोख रक्कम अज्ञात चोरट्याने चोरी केल्या प्रकरणी सुवर्णा सोनगीरकर या महिलेने २२ जुलै रोजी नारपोली पोलीस ठाण्यात तक्रार दिली असता त्याचा तपास पोलीस उपायुक्त राजकुमार शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त नितीन कौसडीकर, नारपोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोनिरी. मालोजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने धुळे येथून प्रियकर मित्रा सोबत त्याच्या साथीदारास ताब्यात घेऊन या गुन्ह्याची उकल केली आहे.

पोउपनिरी. राहुल व्हरकाटे, पोहवा सोनावणे, सातपुते, पोना सोनगीरे, पोशि बंडगर, शिरसाठ, ताटे या पथकाने घटनास्थळाची पाहणी केली असता या घरफोडीच्या गुन्ह्यात घरातील माहितगार असू शकतो, या दिशेने तपास करीत असताना बीएचएमएसच्या पहिल्या वर्षात शिक्षण घेणाऱ्या मुलीकडे तपास केला असता तिच्या बोलण्यातील विसंगती लक्षात आल्यावर तिच्याकडे अधिक तपास केला असता तिने आपल्या प्रियकर मित्रा सोबत कट रचून ही घरफोडी घडवून आणत भविष्यात प्रेम विवाह करण्याच्या अनुषंगाने केल्याचे तपासात निष्पन्न झाल्यावर तपास पथकाने धुळे येथून प्रतीक तुषार लाळे माने (वय २१) व हेमंत दिलीप सौन्दाणे (वय २१) दोघे रा.देवपूर धुळे यांना ताब्यात घेतले असून त्यांच्या कडून ५५ हजार रोख व ८ लाख ९६ हजार रुपये किमतीचे दागिने हस्तगत करण्यात यश मिळविले असून या यशस्वी कामगिरी बद्दल पोलीस पथकाचे पोलीस उपायुक्त यांच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला.

# पुरोगामी पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्षपदी शमशुल काझी यांची निवड

**औसा/प्रतिनिधी**

संपूर्ण देशाच्या सामाजिक आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक, यासर्व क्षेत्रात अग्रेसर काम करणारा एकमेव पत्रकार होय. आज पत्रकार चौथा स्तंभ म्हणून ओळखला जाणारा लेखणीच्या जोरावर आणि गोर-गरिबांच्या प्रश्नावर नेहमीच वाचा फोडणारा समाजाचा कणा म्हणून पत्रकारांकडे पाहिले जाते. आज तब्बल पुरोगामी पत्रकार संघाने महाराष्ट्रातील कोकण, पश्चिम, मराठवाडा, खांन्देश पाच विभागांमध्ये जोडण्याचे काम मोठ्या प्रमाणात चालू आहे. महाराष्ट्राची आर्थीक, सामाजिक आणि राजकीय सांस्कृतिक नेहमीच बदलत असलेले उस्मानाबाद जिल्हाची म्हणून ओळखले जाणारे भव्य मोठे शहर देशात नव्हे तर जगात एक नवी ओळख होय, लातूर जिल्हाची पुरोगामी पत्रकार संघानी आपले पत्रकार क्षेत्रांमध्ये गरुड झेप घेतली असून पत्रकारिता मधील नवे तरुण नेतृत्व दखल लातूर जिल्हाध्यक्ष पदी शमशुल हक अब्दूल हक्क (एस ए काझी) काझी हे औसा तालूका प्रतिनिधी दैनिक, गावकरी या मराठड्यातील एकमेव वृत्तपत्रचे काम करत असून यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली. पुरोगामी पत्रकार संघाचे अध्यक्षांच्या परवानगीनेच झालेली आहे. महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यामध्ये पुरोगामी पत्रकार संघाने आपले पत्रकारांना एकसंघ करून त्यांना जोडण्याचे काम करण्यात येत आहे. संघाचे संस्थापक अध्यक्ष मा. विजयजी सूर्यवंशी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात व संपूर्ण जिल्हाच्या निवड होत असते. महाराष्ट्रात लातूर जिल्हा एकमेव सामाजिकता शैक्षणिकता राजकियता, अशा वेग-वेगळ्या क्षेत्रामध्ये आग्रेसर दळणवळण क्षेत्रामध्ये सुध्दा सुधारित व प्रगतीकडे आहे. लातूर जिल्हाध्यक्ष पदी शमशुल हक अब्दूल हक्क (एस ए काझी) काझी यांची जिल्हाध्यक्षपदी घोषणा करण्यात आली. त्यांचे लातूर जिल्ह्यामध्ये पत्रकारितेमध्ये सामाजिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये उभरते नेतृत्व असून त्यांना तरुण पत्रकार म्हणून औसा तालूक्यातच नव्हे तर संपुर्ण लातूर जिल्ह्यामध्ये प्रसिद्ध आहेत. दैनिक गावकरी या वृत्तपत्र मुळे सामाजिकता ल पत्रकारितातेत युवा पत्रकार म्हाणून एक वेगळी ओळख निर्माण केलेली आहे. त्यांच्या हे पत्रकार क्षेत्रातील कार्य पाहून पुरोगामी पत्रकार संघाने जिल्ह्याचे नेतृत्व करण्यासाठी संवर्णसंधी देवून दिली. त्यांना संपूर्ण तालूका व शहराची निलंगा औराद उदगीर, रेणापूर, लातूर तालूका व लातूर ग्रामीण तालूका, औसा, चाकूर, नळदुर्ग, अहमदपूर पानगांव पत्रकारांना एकसंघ करुन जोडण्याचे हाती काम घेतलेले आहे, संघाने तरुण युवापिढीचे पत्रकार क्षेत्रांमधील काम करणाऱ्यांना एक संधी नवीन आणि नेतृत्व उभा करत आहे .महाराष्ट्रातील नव्या तरुण पत्रकारांना संधी देण्याचे सामाजिक पत्रकारितातेच्या जाण ठेवून हे संघ कार्य करत आहे. संघाचे अध्यक्ष विजय सुर्यवंशी महाराष्ट्र कोअर कमिटीचे आयु दिलीप पवार (प्रदेशध्याक्ष, म.रा.) प्रा.दशरथ वैजनाथ रोडे (उपाध्यक्ष, म.रा.) संतोष निकम राज्य उपाध्यक्ष विकास पाटील, प्रतिमा चौहान, कैलास गडदे, संतोष परदेशी, प्रकाश चीतळकर, सुभाष परदेशी, सुनील चौधरी, छोटुलाल मोरे, कृष्णा पेंडसे, संजय रुपनर, सचिन जाधव, सतीश परदेशी, हेमलता महाले,साबीर बागवान, प्रल्हाद पाटील, भागवत वैद्य राज्य-संघटक, विजयकूमार वाव्हळ मराठवाडा-उपाध्यक्ष औरंगाबाद, किशोर इंगळे प्रदेशध्यक्ष विदर्भ विभाग. डॉ.प्रशांत गुरव (सोनी) पुरोगामी पत्रकार संघाकडून शमशुल हक अब्दूल हक्क (एस ए काझी) काझी निवड झाल्याबदल लातूर जिल्हात अभिनंदन करण्यात येत आले.

# कोव्हीडमुळे शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून, गणेशोत्सव साध्या पद्धतीने साजरा करावा -जिल्हाधिकारी

**पालघर/प्रतिनिधी**

गृह विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक दि.११/७/२०२० अन्वये कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता शासनाने यावर्षी गणेशोत्सव साध्या पध्दतीने साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, त्याअन्वये खालील प्रमाणे मार्गदर्शक सूचना विहीत करण्यात आलेल्या आहेत.

सार्वजनिक गणेशोत्सवासाठी गणेशोत्सव मंडळांनी महानगरपालिका, स्थानिक प्रशासन यांची त्यांचे धोरणानुसार यथोचित पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. मा.न्यायालयाने निर्गमित केलेले आदेश आणि महानगरपालिका तसेच संबंधित स्थानिक प्रशासनाचे मंडपाबाबतच्या धोरणानुसार मर्यादित स्वरुपाचे मंडप उभारण्यात येवून घरगुती तसेच सार्वजनिक गणपतीचे सजावट करतांना त्यात भपकेबाजी नसावी. श्री गणेशाची मुर्ती सार्वजनिक मंडळाकरिता ४ फुट व घरगुती गणपती २ फुटांच्या मर्यादेत असावी. या वर्षी शक्यतो पारंपारीक गणेश मुर्ती ऐवजी घरातील धातु संगमरवर आदी मुर्तीचे पुजन करावे. मुर्ती शाडूची, पर्यावरण पुरक असल्यास त्याचे विसर्जन शक्यतो घरच्या घरी करावे. विसर्जन घरी करणे शक्य नसल्यास नजीक च्या कृत्रिम विसर्जन स्थळी विसर्जन करण्यात यावे. गणेश मुर्तीचे विसर्जन पुढे ढकलणे शक्य असल्यास या मुर्तीचे विसर्जन माघी गणेशोत्सव विसर्जनाच्या वेळी किंवा २०२१ च्या भाद्रपद महिन्यात पुढील वर्षीच्या विसर्जनाच्या वेळी करता येणे शक्य आहे. त्यामुळे आगमन, विसर्जनासाठी गर्दीत जाणे टाळून स्वत: व कुटुंबियांचे कोरोना साथीच्या रोगापासून रक्षण होईल. उत्सवाकरीता वर्गणी, देणगी स्वेच्छेने दिल्यास त्यांचा स्विकार करावा. जाहिराती गर्दी आकर्षित करणाऱ्या नसाव्यात तसेच आरोग्य विषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करण्यास पंसती देण्यात यावी. सांस्कृतिक कार्यक्रमांऐवजी आरोग्य विषयक उपक्रम, शिबीरे उदा. रक्तदान आयोजित करण्यात प्राधान्य देण्यात यावे आणि





त्याव्दारे कोरोना, मलेरीया, डेंग्यु इ. आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता याबाबत जनजागृती करण्यात यावी. आरती, भजन, किर्तन वा अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजित करतांना गर्दी होणार नाही तसेच ध्वनी प्रदुषणासंबंधातील नियमांचे व तरतुदींचे पालन करण्यात यावी. श्री गणेशाचे दर्शनाची सुविधा ऑनलाईन, केबल नेटवर्क, वेबसाईट व फेसबुक इ. व्दारे उपलब्ध करुन देण्याबाबत जास्तीत जास्त व्यवस्था करण्यात यावी. गणपती मंडपामध्ये निर्जतुकीकरणाचे तसेच थर्मल स्क्रिनिंगची पर्याप्त व्यवस्था करण्यात यावी. प्रत्यक्ष येऊन दर्शन घेऊ इच्छिणाऱ्या भाविकांसाठी शारिरीक अंतराचे (फिजीकल डिस्टन्सींग) तसेच स्वच्छतेचे नियम (मास्क, सॅनिटायझर इ.) पाळण्याकडे विशेष लक्ष देण्यात यावे. श्री च्या आगमन व विसर्जन मिरवणुका काढण्यात येवू नयेत. विसर्जनाच्या पारंपारीक पध्दतीत विसर्जन स्थळी होणारी आरती घरीच करुन विसर्जन स्थळी कमीत कमी वेळ थांबावे. लहान मुले आणि वरिष्ठ नागरिकांनी सुरक्षेच्या दृष्टीने विसर्जन स्थळी जाणे टाळावे. संपूर्ण चाळीतील, इमारतीतील सर्व घरगुती गणेश मुर्तीच्या विसर्जनाची मिरवणुक एकत्रितरित्या काढण्यात येऊ नयेत. प्रतिबंधित क्षेत्रामध्ये (Containment Zone) गणेशोत्सावाचे सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करता येणार नाही.

वरील शासनाच्या सूचनांचे पालघर जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी काटेकोरपणे पालन करावे आणि कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य परिस्थिती खंबीरपणे नागरिक व प्रशासन यांनी एकत्रितरित्या हाताळण्याबाबतचे आवाहन डॉ.कैलास बा. शिंदे, जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी पालघर यांच्याकडून करण्यात आले आहे.

# मांजरा नदीपात्रात भरमसाठ वाळू उपसा केलेल्या खड्डयात दोन बालकांचा अंत

**देवणी/प्रतिनिधी,** तालुक्यातील हिसामनगर येथील मांजरा नदीपात्रात वाळु काढण्यासाठी खोदलेल्या खड्ड्यातील पाण्यात बुडुन दोन चिमुकल्या भावंडाचा मृत्यु झाल्याची घटना घडली. मंगळवारी रात्री उशिरा घटना उघडकीस आली असुन याबाबत देवणी पोलिसात आकस्मित मृत्युची नोंद करण्यात आली आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, यश माधव वाघमारे (वय ११ वर्ष) व कार्तिक माधव वाघमारे (वय ६ वर्ष) या चिमुकल्याच्या आईचा दोन वर्षापुर्वी मृत्यु झाला होता. वडील माधव वाघमारे हे मोलमजुरी करतात. आजोबा शेळ्या राखण्याचे काम करतात. आईच्या मृत्युनंतर यश हा लातुर येथे आजोळी राहतो. पण तो परवाच गावाकडे आला होता. मंगळवारी सकाळी नित्याप्रमाणे आजोबा शेळ्या चारायला गेले होते. या दरम्यान हे भांवडे खाऊसाठी पैसे घेण्यासाठी आजोबाच्या शोधात नदीपात्रात उतरले पण नदीपात्रात भरमसाठ वाळु उपसा झाल्याने ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत.या खड्ड्याचा अंदाज न आल्याने या दोन चिमुकल्याचा पाण्यात बुडुन मृत्यु झाला. रात्री उशिरा ही बालके घरी न आल्याने गावकरी, नातेवाईक यांनी शोध घेतला असता रात्री एका खड्ड्यात मृत अवस्थेत ही बालके आढळली. या दोन्ही बालकांना देवणी येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. गेल्या दोन वर्षापुर्वी आईच्या निधनानंतर पोरखे झालेल्या या दोन चिमुकल्याचा मृत्यु नदीपात्रात बुडून झाल्याने हीसामनगर व परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# अवैध धंदेवाल्याच्या मुसक्या आवळणार -नितीन थिटे

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सदरक्षणाय खलनिग्रणाय हे ब्रीदवाक्य घेऊन वाटचाल करणाऱ्या मंद्रुप पोलीस ठाण्याचे आणखीन रुपडे बदलून कामकाजात जास्तीत जास्त पारदर्शकता आणून तसेच काही नवनवीन उपक्रम राबवित मंद्रुप पोलीस ठाण्याला आणखीन स्मार्ट व हायटेक बनविण्याबरोबर, महिलांच्या विविध तक्रारींकडे लक्ष दिले जाईल. कायदा व सुवस्थेला प्राधान्य दिले जाईल. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी अवैध धंदेवाल्यांचा मुसक्या आवळणार असून, कायदा मोडण्याऱ्याची गय केली जाणार नसल्याचा इशारा मंद्रुप पोलीस ठाण्याचे नूतन सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन थिटे यांनी दिली आहे. तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप धांडे यांची बदली झाल्याने त्यांच्या जागी नितीन थिटे हे नुकतेच पदभार घेतले आहेत. त्या निमित्त दक्षिण सोलापूर मराठी पत्रकार संघाने आयोजित केलेल्या वार्तालाप कार्यक्रमात नितीन थिटे बोलत होते. मंद्रुप पोलीस ठाण्यात भौतिक सुधारणा करण्याबरोबरच येथील कामकाजात नाविण्यता आणण्यात आपला प्रयत्न असणार आहे. येथील पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचाऱ्यांचा निवासस्थानाचा प्रश्न प्रलंबित असून, तो मार्गी लावण्याचा आपला संकल्प आहे.

मंद्रुप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विविध गावात शेतीचे बांध व रस्त्यावरून तसेच घरगुती भांडणामुळे तक्रारी दाखल होण्याचे प्रमाण जास्त आहे. यासाठी त्या त्या गावातील तंटामुक्त समितीच्या माध्यमातून त्या त्या गावात दर महिन्याला जाऊन असे तंटे जागेवरच सोडविण्याचा आपला विचार आहे. दर शनिवारी तक्रार निवारण दिवस म्हणून पोलीस ठाण्यात तक्रारदारांच्या तक्रारी निकालात काढण्याचा प्रयत्न राहील. आगामी काळात शासनाने परवानगी दिली तर मंद्रुप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावात सण, उत्सव, जयंती, विविध यात्रा महोत्सव शांततेत पार पडण्यासाठी सरपंच, तंटामुक्त अध्यक्ष,



पोलीस पाटील यांना सर्वांना सोबत घेऊन काम करणार आहे.

संचारबंदी पार्श्वभूमीवर विविध नियमांचा भंग करणाऱ्या १५०० जणांवर कारवाई करून त्यांच्या कडून २ लाख १६ हजारांचा दंड आकारण्यात आला आहे. आगामी काळात देखील शासनाचे नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाई करण्यात येणार आहे. नागरिकांनी नियम पाळून प्रशासनाला सहकार्य करावे असेही ते म्हणाले.

# अहमदपूर पुरवठा विभागाचे लाचखोर नायब तहसीलदार एसीबीच्या जाळ्यात

**अहमदपूर/तैसिफ सय्यद**

तहसील कार्यालयात वर्ग-२ पदावर कार्यरत असलेले पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार सुनील कांबळे वय ४९ वर्ष यांनी हाडोळती येथील तक्रारदार यांचे रास्त भाव राशन दुकानावर कार्यवाही होऊन लायसन रद्द झाल्यामुळे तक्रारदार यांचे विनंती प्रमाणे शिधापत्रीका धारकांची गैरसोय होऊ नये म्हणुन तक्रारदार यांचे राशन दुकान उमरगा येल्लादेवी व आनंदवाडी यांच्या राशन दुकानास सलंग्न केली व दुकानाचे लायसन्स परत मिळवुन देण्याच्या कामात मदत करतो म्हणुन ५० हजारांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातुर यांनी ५ ऑगस्ट दुपारी ३.३१ वाजता पुरवठा विभागाच्या कार्यालयात रंगेहात पकडण्यात आले असुन सदरील लोकसेवका विरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याविषयी सविस्तर माहीती अशी की, अहमदपूर तालुक्यातील हाडोळती येथे तक्रारदार यांचे राशन दुकान असुन काही दिवसापूर्वी दि १९ मे रोजी तक्रारदार यांच्या दुकानातला १०० कट्टे तांदुळ काळ्या बाजारात विक्रिसाठी जात असताना तहसीलदार यांना मिळालेल्या गुप्त माहीतीवरून या कार्यालयाचे पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार सुनिल कांबळे यांना पाठवुन वाहनासह मुद्देमाल जप्त करून सदरील दुकानावर कार्यवाही होऊन लायसन्स रद्द झाल्यामुळे हाडोळती येथील तक्रारदार यांच्या विनंती प्रमाणे शिधापत्रिका धारकांची गैरसोय होऊ नये म्हणुन तक्रारदार यांचे राशन दुकान उमरगा येल्लादेवी येथील सोमवंशी व आनंदवाडी (हाडोळती) येथील कबीर यांच्या राशन दुकानास सलंग्न केली व दुकानाचे लायसन्स परत मिळवुन देण्याच्या कामात मदत करतो म्हणुन ५० हजार रुपये पंचासमक्ष लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. आरोपी लोकसेवक नायब तहसीलदार सुनील कांबळे यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम देण्यासाठी तक्रारदार यांना दि ५ ऑगष्ट रोजी तहसील कार्यालय अहमदपूर येथे पाठवीले असता सदरील आरोपीने ५० हजार रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दुपारी ३.३१ वाजता पंचासमक्ष तहसील कार्यालय अहमदपूर येथील पुरवठा विभागाच्या कार्यालयात खतःहा स्विकारली म्हणुन त्यांना लातुर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वतीने रंगेहात पकडण्यात आले आहे . सदरील लोकसेवक आरोपीविरुद्ध अहमदपूर पोलीस स्टेशन येथे कलम ७, ला.प्र.का अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपअधिक्षक माणिक बेद्रे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग लातुर हे करीत आहेत. सदरील सापळा यशस्वी करण्यासाठी कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परीक्षेत्र, नांदेड अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक मानीक बेद्रे, पोलीस निरीक्षक कुमार दराडे, बाबासाहेब काकडे, पोह संजय पस्तापुरे, लक्ष्मीकांत देशमुख, पोना चंद्रकांत डांगे, मोहन सुरवसे, मपोना शिवकांता शेळके, संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, अमोल शिंदे, संदीप जाधव, दिपक कलवले, मपोशी रूपाली भोसले, चापोना राजु महाजन आदींनी मोलाचे सहकार्य केले.

# मायक्रो फायनान्स कडुन महिला बचत गटाना होत असलेली सक्तीची वसुली ताबडतोब थांबवा मनसे मागणी

**देवणी/शकिल मनियार**

सध्या कोरोना या महामारीमुळे मार्च ते ऑगस्ट दरम्यान सर्व लघुउद्योग छोटे-मोठे व्यवसाय पूर्णत ठप्प आणि बंद आहे. सर्वसामान्य नागरिकांनी त्यांच्या अडचणीसाठी वेगवेगळ्या बचत गट, फायनान्स तसेच छोट्या सावकाराकडून कर्ज घेतले होते. पण ह्या कोरोना लॉकडाऊन कालावधीमध्ये सर्व व्यवहार ठप्प असल्यामुळे कसल्याच प्रकारचे उत्पन्न नसल्यामुळे सर्व सामान्य जनतेची आर्थिक परिस्थिती डबघाईला आलेली असल्यामुळे कोणत्याच फायनान्सने सक्तीची वसुली करू नये असे स्पष्ट निर्देश राज्य आणि केंद्र सरकारने दिलेले असताना त्या आदेशाचा नियमभंग करून उदगीर मधील जनतेला महिंद्रा फायनान्स बजाज फायनान्स व तसेच वेगवेगळ्या महिलाच्या बचट गटाला दिलेले कर्ज मायक्रो फायनान्स कर्जदारास सक्तीची वसुली करून प्रचंड मानसिक त्रास देण्याचा व आत्महत्येस प्रवृत्त करण्याचा उद्योग चालवलेला आहे. संबंधित कर्जदार कळकळीची विनंती करूनही ते ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नाहीत. तसेच अशा फायनान्स किंवा वेगवेगळ्या बचत गटास ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्याकडून नेमण्यात आलेल्या बाउन्सरकडून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून सक्तीच्या वसुलीसाठी धमकावण्यात येत आहे. त्यामुळे प्रशासनाने या विषयात ताबडतोब लक्ष घालून कोरोना थांबून उद्योग-व्यवसाय पूर्ववत सुरू होईपर्यत सक्तीची वसुली थांबवावी व उदगीर मधील जनतेस दिलासा देण्याचे काम करावे अशा आशयाचे निवेदन महाराष्ट्र नवनिर्मान सेना उदगीरच्या वतीने उपजिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. हे निवेदन देताना संजय राठोड उपजिल्हाध्यक्ष, लकी पाटील जिल्हा सचिव, संग्राम रोडगे तालुका अध्यक्ष, अभय सूर्यवंशी शहराध्यक्ष, उमाकांत पाटील तालुकाध्यक्ष स्वयंरोजगार पदाधिकारी उपस्थित होते.



पान १ वरून...

## पती, पत्नी आणि दोन मुलांचे निर्घृणपणे ....

नांदगाव तालुक्यातील वाखारी या गावी शेतातील घराच्या ओसरीत खाटांवर झोपलेले पती-पत्नी व दोन लहान मुले अशा चौघा जणांची गुरुवारी ६ ऑगस्टच्या मध्यरात्री गळा चिरुन निर्घृण हत्या करण्यात आली. सदर हृदयद्रावक घटना शुक्रवारी (दि. ७ ऑगस्ट) सकाळी उघडकीस आली. त्यात समाधान अण्णा चव्हाण (३५), भारती समाधान चव्हाण (३२) या दाम्पत्यासह त्यांचा पाच वर्षाचा मुलगा अनिरुद्ध ऊर्फ गणेश व सात वर्षाची मुलगी आराध्या यांचा बळी गेला आहे. हत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. अज्ञात मारेकऱ्यांच्या निर्दयतेने अवघा नाशिक जिल्हा हादरला आहे. दोन एकर शेती कसताना समाधान हा मालवाहतूक पिकअप व प्रवासी रिक्षा चालवत होता. आई, वडील, पत्नी व दोन मुलांसह तो जेऊर रस्त्यालगत असलेल्या शेतात रहात होता. हत्या झालेल्या समाधान चव्हाण याचा लहान भाऊ दादाजी हा लष्करात जम्मू-काश्मीर येथे सेवा बजावत आहे. तो कर्तव्यावर असल्यामुळे त्याची पत्नी माहेरी आहे. त्याचे आई- वडील काही दिवसांपासून वऱ्हाळे (ता. मालेगाव) येथे मुलीकडे गेलेले होते. समाधान याने गुरुवारी सायंकाळी मधुकर सांगळे यांच्याकडे कांदे भरण्यासाठी पिकअप उभी केली होती. सांगळे यांनी कांदे भरल्यानंतर समाधानच्या मोबाइलवर संपर्क साधला. प्रतिसाद मिळत नसल्याने त्यांनी घरी जाऊन पाहिले असता समाधान आणि मुलगा गणेश एका खाटेवर तर त्याची पत्नी भारती आणि मुलगी आराध्या दुसऱ्या खाटेवर रक्ताच्या थारोळ्यात पडलेले दिसुन आले. घटनेची माहिती मिळताच मालेगाव तालुका व नांदगाव पोलिस घटनास्थळी दाखल झाले. शंभर मीटरचा परिसर सील करून घटनेचे धागेदोरे शोधण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला. कुऱ्हाडीसारख्या धारदार शस्त्राने चौघांच्या मानेवर व डोक्यात वार करण्यात आले होते. पोलिस अधीक्षक डॉ. आरती सिंह, अपर अधीक्षक संदीप घुगे, मनमाडचे उपअधीक्षक समीरसिंग साळवे यांनी पाहणी करून तपासकामी सूचना केल्या. नाशिक येथून आलेल्या श्वानपथकानेही आरोपींचा माग काढण्याचा प्रयत्न केला. श्वानही फक्त घराभोवती रेंगाळले. बाजूला दाट पिके असल्याने श्वानपथक माग काढू शकले नाहीत. खुनाचे कारण स्पष्ट नसल्याने फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी येऊन नमुने विश्लेषणासाठी ताब्यात घेतले. मृतदेह शवविच्छेदनासाठी मालेगाव येथे नेण्यात आले. गुन्हे शाखेचे सहायक निरीक्षक संदीप दूनगहू व तालुका पोलिस ठाण्याचे निरीक्षक नरेंद्र भदाणे यांनी शेतपिकांचा परिसर पिंजून काढला. त्यांना वाखारी रस्त्यावर रक्ताने माखलेला लाकडी दांडा सापडला. मालेगाव सामान्य रुग्णालयात चौघांचे शवविच्छेदन करण्यात आले. याप्रकरणी अण्णा पुंजाराम चव्हाण यांच्या फिर्यादीवरून नांदगाव तालुका पोलिस स्टेशनला खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. पाच वर्षाचा अनिरुद्ध तथा गणेश व सात वर्षाच्या आराध्याचा रक्ताळलेला मृतदेह बघून पोलिस अधिका-यंचे मन देखील हेलावले. समाधान, भारती व अनिरुद्ध यांच्यावर प्रत्येकी दोन घाव होते तर आराध्याच्या मानेवर, डोक्यात व हातावर तीन वार होते. काय चूक या निष्पाप जीवांची' असे म्हणत प्रत्येकजण सुन्न झाला होता. कुणाशीही वैर नसताना चव्हाण कुटुंबाची क्रूरतेने झालेली हत्या अनेक प्रश्न उपस्थित करत आहे. मृत भारती यांच्यावर अत्याचार झाल्याचा संशय देखील व्यक्त होत आहे. शवविच्छेदन अहवालानंतर यातील सत्य समोर येईल, असे पोलिसांनी सांगितले. प्रथमदर्शनी घरातून कुठल्याही वस्तूची चोरी झाली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. झटापट झाल्याच्या खुणा नाहीत. त्यामुळे मारेकऱ्यांनी नियोजन करून हे हत्याकांड घडवून आणल्याचा संशय आहे. शेतीचे जुने वाद किंवा आणखी काही कारण हत्येमागे आहे का, अशा सर्व शक्यता पोलिस पडताळून पहात आहेत. मध्यरात्री दोन वाजेच्या सुमारास दोन मोटारसायकल वाखारी-जेऊर रस्त्याने वेगाने गेल्याचे बघितल्याचे परिसरातील शेतकऱ्यांनी सांगितले. या खूनाचा तपास सुरु आहे.

## मुलांच्या भविष्याचा खेळखंडोबा झाला...

जत तालुका तसा दुष्काळग्रस्त तालुका म्हणून ओळखला जातो. त्यामुळे त्याला गावात राहून कधी रोजगार मिळत होता. तर कधी मिळत नव्हता. त्यामुळे त्याच्या उदर निर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला होता. अलिकडे तर गावात रामचंद्र याला काम करून ही म्हणावे तसे पैसे मिळत नसल्याने तो आणि त्याची पत्नी ही गावसोडून सांगली येथे कामाच्या शोधासाठी आले. याच दरम्यान त्याना दोन मुले ही झाली होती. खाणारी तोडे वाढली होती. सांगली शहर मोठे असल्याने त्याला ओळखीतुन एका ठिकाणी काम मिळाले.त्याच्यावरच तो आपल्या कुटुंबाचा उदर निर्वाह चालवु लागला होता. तो आपल्या पत्नी मुलासह सांगली शहरापासून जवळच असलेल्या कुपवाड येथील वाघमोडे नगरमधील यशवंत गडदे याच्या भाडयाच्या खोलीत राहु लागला होता. बघता बघता त्या दोघांचा संसार फुलत चालला होता. त्यांना मुलगी झाली होती. त्याच्या लग्नाला आता जवळपास नऊ दहा वर्ष झाली होती. संसार वाढला होता.तसे संसारातील कटकटी ही वाढल्या होत्या. अलिकडे रामचंद्र हा कामावरून घराकडे येत असताना दारू पिऊन घरी येत होता.घरी आल्यावर तो अर्चनाबरोबर भांडण काढून तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करीत होता. त्या दोघांचे भांडण सुरू झाले की ते लवकर थांबत नव्हते. कधी कधी ते भांडण रात्रभर चालत असे या भांडणात तो तिला अर्वाच्च भाषेत शिव्या देत आज कुणाकडे शेण खायला गेली होतीस. तुझा यजमान कोण आहे म्हणून तिच्या झिंज्या धरून तिला मारहाण करीत होता. त्या दोघांची भांडणे बऱ्याच वेळेला घर मालक यशवंत गडदे आणि शेजाऱ्यांनी सोडविली होती.त्याला दारू पिऊन येऊन घरात भांडण काढून तमाशा करू नकोस असे ही सांगितले होते. घरमालकाने तर त्याला तु जर असेच भांडण करणार असशील तर घर खाली कर. आणि दुसरीकडे राहयला जा असा दम दिला होता. त्या दोघांचे भांडण चालले की घरातील तीन्ही लहान मुले भेदरून थरथर कापत होती. अर्चना ही आपल्या तीन मुलांच्याकडे बघुन संसाराचा गाडा कसाबसा ओढीत होती. अगोदरच संसार चालवित असताना तिला तारेवरची कसरत करावी लागत होती. त्यात नवऱ्याचा मार खावून ती खचली होती. सौंदर्य हे शाप ठरते की काय असे तिला वाटत असायचे.ती त्याला भांडणात माझे कुणाबरोबर तसले घाणरडे संबंध नाहीत तुम्ही माझ्यावर उगाच आळ घेऊन मला बदनाम करू नका. असे बजावित होती.पण त्याचे मागचे तसे पुढे चालु असायचे. नवरा आपल्याला मारहाण करून आपल्या चारित्र्यावर संशय घेतो.मुलांच्यासमोरच नको नको ते बोलतो आणि घाणेरडया शिव्या देते असे तिने आपल्या माहेरी सलगरे येथील आई वडिल आणि भावाला सांगितले होते. कधी कधी भांडणातून ती आपल्या माहेरी पंधरा पंधरा दिवस जात होती. त्यामुळे रामचंद्र अधिकच पिसाळत होता. आपल्या सासरी जावून तो तिच्याबरोबर आणि सासरच्या लोकांबरोबर भांडण काढीत होता. त्यावेळी तिच्या माहेरच्या लोकांनी त्याला समजावून ही सांगितले होते. पण तो काही कधीच कुणाचे ऐकत नव्हता. उलट भांडण सोडवायला आलेल्याच्यावर तो मी आणि माझी बायको बघुन घेतो तुम्ही नवरा बायकोच्या भांडणामध्ये पडू नका असे सांगत होता. त्यामुळे त्याच्या भांडणामध्ये सहसा कुणी पडत नव्हते. संसार म्हटला की भांडयाला भांडे लागणार. त्याचा आवाज होणार हे गृहीत धरले जाते. म्हणून अर्चनाच्या माहेरच्या लोकांनी ही त्याच्या भांडणाकडे दुर्लक्ष करून अर्चनालाच चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या होत्या. तो ही चार दिवस सुधारल्याचे दाखवत होता. आणि नंतर त्याचे मागचे तसे पुढचे असे होत होते. वाघमोडे नगरमध्ये त्या दोघांच्या भांडणाचा तमाशा लोकाना बघायला मिळत होता. तो कामावर गेला की दारू पिऊन येत होता.त्यामुळे भांडणात अर्चनाही त्याच्या तोंडाला लागत नव्हती. कसा तरी आपल्या संसाराचा गाडा तीन मुलांच्याकडे बघून ओढत होती. गेल्या पंधरा दिवसापुर्वी नवऱ्याबरोबर झालेल्या भांडणातून ती आपल्या तीनही मुलांना घेऊन आपल्या माहेरी सलगरे येथे गेली होती. तर लॉकडाऊन असल्याने कामाचा ही वणवा असल्याने रामचंद्र ही शिगंणापुरला जत येथे गेला होता. तो तिकडे आणि बायको माहेरी अशी त्याच्या संसाराची परिस्थीती झाली होती. बायको माहेरी जावून पंधरा दिवस झाले तरी तो तिला बोलवायला गेला नव्हता. शेवटी घरच्याच्या तगादयाने सोमवारी सलगरे येथे जावून बायकोची समजुत घालून तिला आणि मुलांना घेऊन आला कुपवाड येथे आला होता. लॉकडाऊन मध्ये शिथिलता दिली गेल्याने कामधंदा सुरू झाला होता. म्हणून तो बायको मुलांना घेऊन आला खरा पण त्याच्या वागण्यात काही फरक पडला नव्हता. दुसऱ्या दिवशी मंगळवारी तो कामावर गेला आणि संध्याकाळी येताना दारू पिऊनच घराकडे आला होता. घरात आल्याबरोबर त्याने अर्चनाबरोबर भांडण काढून पंधरा दिवसाचा वचपा काढून मारहाण केली होती. तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला नको नको ते शिव्या देत होता. तुझा माहेरात एक यजमान आहे होय. त्याच्याकडेच तु सारखी कारण सांगून जातेस काय? असे म्हणून तिला मारहाण सळो की पळो करून सोडत होता.आपण का परत आलो याचा तिला पश्यातापा होत होता. त्याच्या डोक्यातील तिच्या चारित्र्याचा संशय काही केल्या जात नव्हता. आपल्या पत्नीचे बाहेर कुणाबरोबर तरी लफडे आहे. त्याशिवाय ती इतकी नटून थटून राहणार नाही. शिवाय ती मोबाईलवरून तास न तास कुणाबरोबर तरी बोलत असते. आपण कामावर दिवसभर जातो ही दिवसभर आपल्या याराला घेऊन मजा मारत असेल असले भलते सलते विचार त्याच्या मनात येत होते. त्याच्या डोक्यात संशयाचा किडा वळवळत असायचा. बुधवार दि.दि.२९ जुलै रोजी ही तो घरातून कामावर जातो म्हणून बाहेर गेला पण त्या दिवशी त्याला काम न मिळाल्याने तो दिवसभर इकडे तिकडे करत मित्रांच्याबरोबर दारू पित बसला. संध्याकाळी नेहमी प्रमाणे तो कामावरून घरी यायच्या वेळेला घराकडे परत आला. त्याला जरा दारूची नशा जास्तच झाली होती. त्यातच पत्नीच्या चारित्र्याचा संशय जास्तच बळावला होता. आल्या आल्या त्याने अर्चना बरोबर भांडण काढायला सुरूवात केली होती. घराचा दरवाजा त्याने लावून घेतलेला होता. त्यामुळे त्याच्या भांडणाचा आवाज बाहेर जात नव्हता. तो तिला अश्लिल नको नको ते बोलत होता.घाणेरडया शिव्या देत होता. ती ही त्याला उगाच काही ते तोंडाला येईल ते बरळु नका. मी त्यातली बाई नाही. माझ्यावर खोटे नाटे आरोप करून नका. असे बजावत होता. त्यातच तिने मुलांना जेवण करून वाढले. नवऱ्याला ही वाढले तो कसा बसा जेवला. तो जेवल्यानंतर तिने ही जेवण केले. मुलांना दुसऱ्याखोलीत झोपवले. ती ही झोपण्याची तयारी करत होती.तेवढयात त्याचा परत पारा चढला. तु माझ्याबरोबर कशाला झोपतेस. त्याच्याबरोबर झोप जा. तो तुला चांगला माजा देईल. असे म्हणून त्याने परत भांडण उकरून काढले होते.त्यावेळी रात्रीचे ११.३० वाजले होते.त्याचे भांडण वाढतच चालले होते. ती ही त्याच्या तोंडाला लागली होती. ती उलटे बोलत असल्याने त्याला तिचा राग आला भांडणात त्याने बाहेर जावून एक दगड आणला. भांडणात त्याने एक टॉवेल घेतला. त्या टॉवेलमध्ये त्याने तो दगड गुंडाळला आणि फिरवून अर्चनाच्या डोक्यात जोरात दोन तीन वेळा हाणला. त्यासरशी ती ओरडुन घडाघडा लोळु लागली होती. बाहेरच्या खोलीत झोपलेली तीनही मुले तिच्याजवल मम्मी मम्मी करत आले. त्यावेळी त्याने मुलांना बाजुला ढकलून गप्प बसा नाही तर तुम्हाला ही मारून टाकेन असे धमकावले. त्याच्या भितीने मुले ही रडतच गप्प बसली होती. अर्चनाच्या डोक्यातून रक्तस्त्राव सुरु झाला होता. तिच्या ओरडण्याच्या आवाजाने शेजारचे लोक ही पळत आले होते. दरवाजा बंद होता. शेजाऱ्यांनी रामचंद्र दरवाजा उघडा असे ओरडत होते. पण तो काही दरवाजा लवकर उघडत नव्हता. शेवटी शेजाऱ्यांनी दरवाजा ढकलून उघडला.समोर रक्ताच्या थारोळयात अर्चना पडली होती. ती गंभीर जखमी झाली होती. शेजाऱ्यांनी तिला उपचारासाठी सांगली येथील सिव्हील हॉस्पिटलमध्ये उपचारा साठी दाखल केले. उपचारादरम्यान गुरूवारी पहाटे तिचा मृत्यु झाला. या घटनेची माहिती कुपवाड पोलीसांना समजल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनेचा पंचनामा करून तपसाला सुरुवात केली. मिरजचे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.संदिप सिंह गिल, सहाय्यक पो.निरी.नीरज उबाळे, उपनिरीक्षक राजु अन्नछत्रे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी करून तपासाच्या योग्य त्या सुचना पोलीसांना दिल्या. पोलीसांनी या घटनेतील संशयीत आरोपी रामचंद्र हाक्के याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती दिली. या घटनेची फिर्याद मयत अर्चनाचा भावाने पोलीसात दिल्यावर पोलीसांनी अर्चना रामचंद्र हाक्के (वय २८) हिच्या खूनप्रकरणी पोलीसांनी रामचंद्र विठोबा हाक्के (वय ३५) याच्या विरूध्द कुपवाड पोलीसात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवून ताब्यात घेऊन त्याला सांगली येथील मा.कोर्टासमोर उभे केले. मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला टॉवेल आणि दगड ताब्यात घेतला होता. या घटनेचा पुढील तपास कुपवाड पोलीस स्टेशनेच पोलीस उप.निरी.राजु अन्नछत्रे हे करीत आहेत. संशयाने मन पोखरत. एकदा का मनात संशय बसला की तो काही केल्या जात नाही. त्यातूनच घरात पती पत्नीत किरकोळ कारणातून भांडणाला सुरूवात होते. आणि या भांडणाचा शेवट खूनात होतो. रामचंद्र हाक्के याच्या संशयी वृत्तीने उचल खाल्ली आणि त्याने भांडणात पत्नी अर्चनला संपवून टाकले. म्हणून मनात संशय न ठेवता संसाराकडे लक्ष दिले तर तो संसार पैलतिरी लागत असतो.नाही तर एका चुकीच्या घटनेने घरदार उघडयावर मुले बाळे अनाथ व्हायला वेळ लागत नाही हेच या घटनेवरून दिसून येते.

## सासरच्या छळामुळे जगणे मुश्कील...

आला आहे. ही घटना माढ्यातील शुक्रवार पेठेत शुक्रवारी रात्री साडे दहाच्या सुमारास घडली. सना इरफान मोमीन (वय २७) असे मयताचे नाव असून इरफान रजाक मोमीन, रजाक मकबूल मोमीन, आसिया रजाक मोमीन अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्याची नांवे आहेत. माढा पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार मयत सना इरफान मोमीन (२७) हिचे लग्न झाल्यानंतर दोन महिन्यापासून तिला सासरी नवरा इरफान रजाक मोमीन, सासरा रजाक मकबूल मोमीन, सासू आसिया रजाक मोमीन यांनी दोन महिने व्यवस्थित नांदून, त्यानंतर तिला आई-वडिलांनी लग्नामध्ये आम्हाला काही दिले नाही. मानपान ही केला नाही, म्हणत उस्मानाबाद येथील प्लॉट आमच्या नावावर कर असे म्हणत तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन वेळोवेळी मारहाण केली. सतत तिचा मानसिक छळ व शारीरिक छळ केला. तिचा नवरा इरफान रजाक मोमीन याने शुक्रवारी रात्री साडे दहाच्या सुमारास तिचा गळा आवळून खून केला आहे. याप्रकरणी माढा पोलीस ठाण्यात भांदवि नुसार ३०२, ४९८, ३२३, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक पास पोलीस उपनिरीक्षक किरण घोंगडे हे करीत आहेत.

## सासरा-मेहुण्यावर फुकटचा आळ...

सुमारास ही घटना घडली. या घटनेत उदय लोखंडे नामक जावायचा मृत्यू झाला. मयत उदय हा दारूच्या आहारी गेला होता. शिवाय कौटुंबिक कारणावरून त्याचे सासरच्या मंडळीशी नेहमी वाद व्हायचे. गुरुवारी जेव्हा उदयचा मृतदेह मिळून आला तेव्हा त्याच्या वडिलाने आळंदी पोलीस स्टेशनमध्ये उदयला काठीने मारून त्याचा सासरा हनुमंत सोनवणे आणि मेव्हाणा किरण सोनवणे यांनी खून केल्याची फिर्याद दिली. त्यानुसार, पोलिसांनी दोघांनाही ताब्यात घेऊन चौकशी सुरू केली आहे परंतु, ज्या वेळी उदयची हत्या झाली तेव्हा दोघेही घटनास्थळी उपस्थित नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे उदयचा खून नेमका कुणी केला याचा आम्ही शोध घेत असून लवकरच या प्रकरणाचा छडा लावू, असा विश्वास आळंदी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र चौधर यांनी व्यक्त केला आहे. मयत व्यक्तीच्या वडलाने दिलेल्या फिर्यादीनुसार पोलिसांनी संबधित आरोपी सासऱ्याला व मेव्हण्याला ताब्यात घेतलय ,मात्र जेव्हा खुनाची घटना घडली दोन्ही दोघेही घटनस्थळावर नसल्याची माहिती समोर येत असल्याने संबधित व्यक्तीचा खून नेमका कुणी केलाय याचा पोलीस तपास करत आहे.

# 'प्लाझ्मा थेरपी' कोरोनासाठी वरदान



२० २० हे साल संपूर्ण जगासासाठी कठीण संकटाचे आणि अडचणींचे ठरले आहे. या वर्षात कोरोना, लॉकडाऊन, क्वॉरंटाईनसारखे नववीन शब्द सामान्य माणसाच्या शब्दकोषात दाखल झाले. महाराष्ट्र शासन कोरोनावर मात करण्यासाठी अथक प्रयत्न करीत आहे. आणि त्यात यशस्वी देखील झाला आहे. महाराष्ट्राने प्लाझ्मा उपचार करण्यास सुरुवात केली अहे. आपण प्रथमच ह्या प्लाझ्मा उपचाराचे नाव ऐकले असणार पण हा उपचार काही नवीन नाही. याचा शोध १३० वर्षा पूर्वी जर्मनीच्या फिजियोलॉजिस्ट एमिलवॉन बेह्रिंग यांनी लावला होता. यासाठी त्यांना नोबल पारितोषिकही देण्यात आले होते. वैद्यकीयक्षेत्रातील हे पहिलेच नोबेल पारितोषिक होते.

संसर्गजन्य रोगांवर उपचार म्हणून अनेक दशकांपासून प्लाझ्मा थेरपीचा वापर केला जात आहे. यापूर्वी सार्स (२००३) आणि मर्स (२०१२) मध्ये प्लाझ्मा थेरपीद्वारे उपचार केले गेले होते. कोरोना विषाणू देखील या प्रकारात येतात. १९१८ मध्ये पहिल्या महायुद्धाच्याकाळात पसरलेल्या स्पॅनिश फ्लूपासून लोकांची सुटका करण्यासाठी प्लाझ्मा थेरपीचा वापर करण्यात आला होता. इबोला या आजाराचा संसर्ग झालेल्या रुग्णांकरीता प्लाझ्मा थेरपीचा वापर करण्यात आला होता. इबोलाने थैमान घातल्यानंतर जागतिक आरोग्य संघटनेने प्लाझ्मा थेरपीबाबत मार्गदर्शक सुचना जाहीर केल्या होत्या. कोरोना विषाणूवर अद्याप लस निघालेली नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत प्लाझ्मा थेरपी हे एक वरदानच ठरु शकेल.

महाराष्ट्र हे प्लाझ्मा थेरपीचा व्यापक प्रमाणात प्रयोग करणारे देशातील पहिले राज्य ठरले आहे. तसेच जगातली सगळ्यात मोठी प्लाझ्मा थेरपीची ट्रायल महाराष्ट्रात झाली आहे. महाराष्ट्रात २३ ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालये, पालिका रुग्णालयात या थेरपीचा वापर करण्यास केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. यापैकी १७ ठिकाणी ही उपचार पद्धती कोविड रुग्णांसाठी सुरु करण्यात आली. या केंद्रांवर दाखल झालेल्या महाराष्ट्रातील सर्व रूग्णांसाठी संपूर्ण प्लाझ्मा थेरपी उपचार मोफत आहे. गंभीर रुग्णांना चांगले करण्यासाठी प्लाझ्मा थेरपीचा प्रथमच उपयोग होतो आहे. राज्याने एप्रिलमध्ये प्लाझ्मा थेरपीचा पहिला प्रयोग केला होता. प्लाझ्मा थेरपीमध्ये कोरोनातून पूर्णपणे



ठिक झालेल्या व्यक्तीच्या शरीरातील रक्त घेतलं जातं. रक्ताचा वापरकरून अँटीबॉडीजयुक्त प्लाझ्मा वेगळे केले जातात. या नंतर हा प्लाझ्मा कोरोनाची लागण झालेल्या रुग्णाच्या शरीरात इंजेक्ट केला जातो. जेव्हा शरीर कोणत्याही बॅक्टेरीयाच्या संपर्कात येते. तेव्हा रोगप्रतिकारक यंत्रणा स्वयंचलितपणे सक्रिय होते आणि अँटीबॉडीज मुक्त होतात.

कोरोना विषाणूच्या संसर्गापासून बरे झालेल्या रुग्णांच्या रक्तातील प्लाझ्मामध्ये अँटीबॉडीज असतात. जे आधी कोरोनाशी लढलेले असतात. हा प्लाझ्मा कोणत्या रुग्णाला द्यायचा हे डॉक्टर्स ठरवितात. मध्यम व तीव्र स्वरुपाची लक्षणे असलेल्या व नेहमीच्या औषध उपचारांनी बरा न होणारा, ऑक्सिजनची गरज असणारा रुग्ण निवडला जातो. डॉक्टर्स आपल्या रक्तातून प्लाझ्मा स्वतंत्ररित्या काढू शकतात. यात अँटीबॉडी असतात. जी एखाद्या रोग्याला दिली जातात. यामुळे त्याची प्रतिरोधक शक्ती अधिक प्रभावीपणे काम करूशकते. प्लाझ्मा थेरपीमध्ये कोरोनातून बरे झालेल्या व्यक्तींच्या रक्तातून प्लाझ्मा घेऊन कोरोनाग्रस्तांवर उपचार करण्यात येतात. प्लाझ्मा थेरपी फायदेशीर असल्याचं म्हटलं जात आहे. प्लाझ्मावेळत दिल्याने १० पैकी ९ रुग्ण बरे झाले आहेत. प्लाझ्मा बँक तयार करणे आणि ते शास्त्रीय पद्धतीने उपलब्ध करून देणे ही जबाबदारी आपणास पार पाडावी लागेल. महाराष्ट्रात सर्वठिकाणी ही व्यवस्था करण्यात आली आहे. आयसीएमआरतर्फे देशभरात प्लाझ्माच्या क्लिनिकल ट्रायल सुरु आहेत.

प्लाझ्मा दानासाठी जनतेने पुढे येणे आवश्यक आहे. प्लाझ्मा देण्यापूर्वी रुग्ण संपूर्णपणे कोरोनामुक्त झाल्यानंतर १४-२८ दिवसांपर्यंत प्रतीक्षा करणे आवश्यक आहे. हा कालावधी पुर्ण झाल्यानंतर कोरोनामुक्त व्यक्तीला ताप नाही, श्वास घेण्यासा कोणतीही अडचण येत नाही. त्याच्या शरीरातील ऑक्सिजनचे प्रमाण सामान्य आहे म्हणजेच ९५ टक्के ते १०० टक्के आहे. एकूणच त्या व्यक्तीचे आरोग्य चांगले आहे. इतर काही संक्रमण किंवा संसर्गजन्य रोगाची बाधा झालेली नाही याची खात्री झाल्यानंतरच प्लाझ्मादान करण्यास ती व्यक्ती सक्षम असते.

प्लाझ्मा कसे संकलित केले जाते? प्लाझ्माफेरेसिस नावाच्या प्रक्रियेद्वारे रक्तातील प्लाझ्मा गोळा केला जातो. या प्रक्रियेस सुमारे ४५ मिनीटे वेळ लागतो. या प्रक्रियेदरम्यान, रक्त काढले जाते आणि प्लाझ्मा वेगळे केले जातात. संकलित केले जाण्यासाठी प्लाझ्माची सामान्य मात्रा ३०० मिली ते ६०० मिलीमीटर दरम्यान असते. एकदा काढलेला प्लाझ्मा १० डिग्री सेल्सिअस तापमानात थंड वातावरणात ठेवला जातो.प्लाझ्मा काढण्याच्या तारखेपासून १२ महिन्यांपर्यत संग्रहित केला जाऊ शकतो. मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते दि. २९ जून २020 रोजी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या माध्यमातून नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात 'प्लाझ्मा थेरपीच्या प्रोजेक्ट प्लॅटिना' उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

एखादा पूर्णपणे बरा झालेल्या रुग्णाने www.plasmayoddha.in या संकेत स्थळावर आपली नोंद करून प्लाझ्मादान करावे, असे आवाहन मुख्यमंत्री महोदय यांनी जनतेला केले आहे. या मुळे एखाद्या रुग्णाचा जीव वाचू शकतो. गंभीर रुग्णांना बरे करण्यासाठी प्लाझ्मा थेरपीचा प्रथमच उपयोग होत आहे. जगातली ही सर्वात मोठी सुविधा महाराष्ट्राज्यात सुरु करण्यात आला आहे. गृहनिर्माण मंत्री ना.जितेंद्र आव्हाड यांनीही प्लाझ्मादान करून एक नवा आदर्श जनते समोर ठेवला आहे. कोकण विभागात कोरोनाला हद्दपार करायचे असेल तर प्लाझ्मा दान महत्त्वाचे ठरेल. आवश्यक ती काळजी आणि वेळीच उपचारामुळे कोरोना अटकाव सहज शक्य आहे. शेवटी काय 'कोरोना' म्हणजे कोकणात रोग नाही असे म्हणून लढू या!

**– प्रविण डोंगरदिवे,**
**माहिती सहाय्यक विभागीय माहिती कार्यालय कोकण विभाग, नवी मुंबई**

# मुंबईचा मराठी माणूस ज्याने हिंदी व कानडी पेपर काढले!



स काळी दारात येणाऱ्या वृत्तपत्रामागे एक खूप मोठी यंत्रणा असते. बातमी देणाऱ्यापासून ते घरी पेपरची घडी टाकणारी व्यक्ती ही सगळीच मंडळी या साखळीचा महत्त्वाचा भाग असतात. त्यातल्या वितरक हा सगळ्यांत महत्त्वाचा भाग. मुरलीधर शिंगोटे उर्फ बाबा हे असेच वर्तमानपत्राचे वितरक होते. मग ते एक वृत्तपत्राचे मालक झाले. गुरुवारी (६ ऑगस्ट) जेव्हा शिंगोटेंनी देह ठेवला तेव्हा पुण्य नगरी, मुंबई चौफेर, कर्नाटक मल्ला, आपला वार्ताहर, यशोभूमी ही पाच वर्तमानपत्र मागे सोडून गेले आणि त्यामागे अनंत आठवणी. पत्रकारितेशी तसा अर्थाअर्थी संबंध नसताना एखादा पेपर २५ पेक्षा अधिक वर्ष सुरू ठेवणं हे साधंसुधं काम नाही शिंगोटेंनी ते केलं. ही सुरुवात कशी झाली याविषयी सांगताना दिव्य मराठीचे संपादक संजय आवटे सांगतात, बाबांकडे आधी नवा काळची एजन्सी होती. त्यानंतर कालनिर्णय समुहाने वृत्तपत्र सुरू केलं. त्याची एजन्सी शिंगोटेंनी घेतली. मग 'नवा काळ'च्या लोकांनी कंत्राट संपवलं. कालांतराने वर्तमान हे कालनिर्णय समुहाचं वर्तमानपत्रही बंद झालं. तिथून पुढे मग त्यांनी स्वतःचं वर्मानपत्र काढलं.

साधेपणा हा मुरलीधर शिंगोटेंच्या जगण्याचा पाया होता. एखाद्या वृतसमूहाचा मालक म्हटला की त्याच्यामागे एक विशिष्ट वलय असतं. शिंगोटेंच्या मागे ते वलय साधेपणाचं होतं.आपल्या कंपनीतल्या सर्व कामगारांना समानतेने वागवणं हे त्यांचं वैशिष्ट्य होतं. ते कोणालाही अंतर देत नसत. ज्येष्ठ पत्रकार राही भिडे यांना शिंगोटेंबरोबर काम करण्याचा प्रदीर्घ अनुभव आहे. त्यांच्या साधेपणाचे अनेक किस्से त्यांनी बीबीसी मराठीला सांगितले.

त्या सांगतात, माझी पुणे आवृत्तीची संपादक म्हणून नेमणूक झाली होती. काही दिवसांनी शहरातल्या व्यक्ती मला भेटायला येऊ लागल्या. एक दिवशी उल्हासदादा पवार मला भेटायला आले. दारात पेपर टाकून एक व्यक्ती झोपलेली दिसली. त्यांनी माझ्याकडे विचारणा केली. मलाही त्यावेळी कल्पना नव्हती. थोडी चौकशी केल्यावर कळलं की ते बाबा शिंगोटे आहेत. आम्हाला आश्चर्याचा धक्का बसला. ते रात्रभर प्रिंटिंग प्रेसमध्ये काम करून दिवसा आराम करत. शेवटी मी त्यांच्या झोपण्याची व्यवस्था ऑफिसमध्ये केली.

नागपुरातील ज्येष्ठ पत्रकार नितीन कुलकर्णी यांनीही शिंगोटेंच्या साधेपणाचा किस्सा सांगितला. पुण्य नगरीची नागपूर आवृत्ती सुरू होणार होती. तेव्हा आम्ही खूप उत्साहात होतो. पहिल्या आवृत्तीच्या प्रकाशन समारंभाला नितीन गडकरी येणार होते. आम्ही सगळी माणसं खाली चहा पित होते.

आमच्याबरोबर अत्यंत साधे कपडे घातलेला आणि साध्याशा चपला घातलेला एक माणूस उभा होता. गडकरी आले आणि त्यांनी विचारणा केली, की काय बाबा कसं काय चाल्लंय. मग कळलं की ती व्यक्ती म्हणजे आमच्या वृत्तपत्राची मालक होती. आम्ही त्यांना अक्षरशः वाकून नमस्कार केला.

'एबीपी माझा'चे पत्रकार नवनाथ साकुंडे सांगतात, १९९७-९८ च्या सुमारास मी मानखुर्द स्टेशनवर पेपर विकायचो. त्याच काळात मी लेखही लिहायचो. एकदा बाबा मला भेटायला आले. पेपर विकणारा आणि पेपरमध्ये लिहिणारी अशी व्यक्ती पाहून त्यांना आश्चर्य वाटलं. त्यांनी मला थेट लेख पाठवत जा असा आदेश दिला. नंतर बराच काळ मी आपला वार्ताहर मध्ये लिहायचो. कालांतराने माझा आणि त्यांचा संपर्क कमी झाला. पण ते कायम माझ्या लक्षात राहिले. कामात हयगय नाही आणि कष्टकऱ्यांना कायम पाठिंबा आणि आधार त्यांनी दिला.

साधेपणाला त्यांनी कष्टाची जोड दिली. वितरण हा त्यांचा आत्मा होता. त्याचबरोबर त्यांनी वाचकांची नसही ओळखली होती. पुण्य नगरी हा तसा घरोघरी जाणारा पेपर नाही, मात्र तो स्टॉलवरचा पेपर होता.

मग त्या अनुषंगाने पेपरमधील मजकूर ठरवला. अर्धा पान शब्दकोडे हा त्यातलाच एक भाग होता. उदा. लोकलमध्ये प्रवास करणाऱ्या व्यक्तीला काय आवडेल किंवा रिक्षेवाला या लोकांना काय वाचायला आवडतं ही नस ओळखून त्यांनी मुंबई चौफेर, आपला वार्ताहर अशी दैनिकं सुरू केली. मराठी व्यक्ती असून पाच विविध भाषात वर्तमानपत्र चालवणारे शिंगोटे हे, तसे दुर्मिळच.

आपल्या वर्तमानपत्रांबद्दल आणि तिथल्या बातमीबद्दल ते आग्रही होते. त्यांनी इतर पेपरसारखे कोणतेही सोहळे केले नाही, किंवा मोठे इव्हेंट साजरे केले नाही. वर्तमानपत्राबद्दलच्या भूमिकेबद्दल ते शेवटपर्यंत ठाम राहिले, असं नितीन कुलकर्णी म्हणतात. कामाच्या रगाड्यात त्यांनी प्रकृतीकडे लक्ष दिलं नाही. त्यांची अनेक स्वप्नं होती. त्यांना त्यांच्या वर्तमानपत्रात अनेक नवे प्रयोग करायचे होते. त्यासाठी ते अनेक पत्रकारांबरोबर सतत चर्चा करायचे. त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या लोकांना ते पुरेसे स्वातंत्र्य द्यायचे, असं राही भिडे सांगतात.

सध्याच्या डिजिटल काळात पुण्य नगरी आणि इतर वर्तमानपत्र मागे राहिली. कारण बाबांनी काळाची पावलं नीटशी ओळखली नाही हे अनेक पत्रकार मान्य करतात. मुळात शिंगोटेंना डिजिटल हा प्रकार पटला नाही आणि ते फार काळ टिकणार नाही असं त्यांना वाटायचं. डिजिटल आलं तर पेपर कोण घेणार असा युक्तिवाद ते करतात. त्यांचा प्रेक्षक फोनवर पेपर वाचणारच नाही असं त्यांना वाटायचं. मुरलीधर शिंगोटे हे मुळात वितरक होते. मजल दरमजल करत ते वर्तमानपत्राचे मालक झाले. त्यांना वर्तमानपत्राच्या उद्योगाची नस माहिती होती. तरीही त्यांचा पेपर घराघरात पोहोचला नाही अशी खंत अनेक पत्रकार व्यक्त करतात. तरीही मोठ्या कष्टाने त्यांनी हे साम्राज्य उभं केलं हे नाकारून चालणार नाही.

# बसवराज पाटील यांनी निलंगेकर कुटुंबियाची भेट घेतली



महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आदरणीय डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांचे बुधवारी पहाटे निधन झाले. आज निलंगा येथे त्यांच्या निवासस्थानी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी कार्याध्यक्ष मा.बसवराज पाटील यांनी भेट दिली. डॉ शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली व त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी माजी मंत्री मधुकराव चव्हाण, उस्मानाबाद जिल्हा काँग्रेस कमिटी कार्याध्यक्ष प्रकाश आष्टे, जि.प.माजी सदस्य दिलीप भालेराव ॲड. बादाडे साहेब, शिवाजी रेश्मे, सतिष चिक्राळे व निलगेंकर कुटुंबातील प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अशोक पाटील निलंगेकर, माजी मंत्री संभाजी पाटील निलगेंकर, डॉ. शरद पाटील निलंगेकर, विजयकुमार पाटील निलंगेकर आदि उपस्थित होते.

## देवणी येथे डॉ.शिवाजीराव पाटील निलंगेकर यांना श्रद्धांजली

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांना देवणी येथे काँग्रेस पक्षातर्फे एका विशेष कार्यक्रमात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी सर्वप्रथम मान्यवर तर्फे निलंगेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार वाहून विनम्र अभिवादन करण्यात आले. या श्रद्धांजली कार्यक्रमास प्रमुख उपस्थित पक्षाचे ज्येष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी काशिनाथ मानकरी, वैजनाथ लुल्ले, विजयकुमार मानकरी, जावेद येरोळे, देविदास पतंगे, बालाजी वळसंगकर, प्रा.महादेव मळभगे, अमित सुर्यवशी, शेख मौजूद निलेश लांडगे, रमेश कोतवाल, राम रुपनरे, दिलीप तपसाळे आदी मान्यवर उपस्थित होते.



# चित्र काढण्यासाठी साहित्य मिळत नसल्याने तो पिंपळाच्या पानावर काढू लागला चित्र...





सो लापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यातील महेश अशोक मस्के हे जन्मता एका डोळ्याने अंध.. कला क्षेत्रात काम करत असताना, पेन्सिल चित्र, चित्रकला क्लासेस, या सर्व गोष्टींमधून उदरनिर्वाह करत आहे परंतु सध्या लॉकडाउनच्या काळामुळे, संपूर्ण क्लास बंद करायची वेळ आली, तसेच चित्रकलेचा मार्केट शहरात असल्यामुळे, सध्या गावाकडं चित्रकला करावी लागत आहे, आणि पाहिजे त्या प्रमाणात कलेची किंमत केली जात नाही, ग्रामीण भागातील लोक कलेकडे तेवढं, आत्मीयतेने व कलाकाराच्या किंमत करण्याच्या दृष्टीने बघत नाहीत. याच गोष्टीमुळे आज गावाकडेच कलेला कुठेतरी, स्थगिती प्राप्त झाली आहे. तसेच चित्रकलेतील साहित्य भेटत नसल्यामुळे पण बऱ्याच अडचणी निर्माण झाल्या तयार केलेले चित्र या लॉकडाऊनमुळे कुरियर करण्यासाठी अडचणी येऊ लागल्या. आणि ज्या ठिकाणी कुरियर उपलब्ध आहेत त्या ठिकाणावरुन, अति प्रमाणात पैसे घेऊन त्या ठिकाणी लूटमार चालू केली. एकंदरीतच सध्याच्या परिस्थितीमध्ये सर्व लोक फक्त स्वतःला जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे कले कडं सहाजिकच लोकांचा बघण्याचा दृष्टिकोण आणखीन तरी निर्माण झालेला नाही. सध्या समाजात सर्व लोक जीवनावश्यक गोष्टीला प्राधान्य देत असल्यामुळे. कुठेतरी हौशी आणि स्वतःच्या आनंदासाठी आमची चित्र विकत घेणाऱ्या व्यक्तींची संख्या कमी झाली आहे. या सर्व







गोष्टीचा तोटा फक्त कलाकार वर्गालाच नाही तर सर्व क्षेत्रातील व्यक्तींना सहन करावा लागत आहे. तसेच लोक डाऊन मुळे घरात देखील ताण तणावाचे वातावरण निर्माण होत आहे काही गोष्टींची कमतरता भासत असल्यामुळे. लोकांना किंमत सांगितली तर ती त्यांना जास्त वाटू लागली.

आज कुठे तरी या सर्व गोष्टींमुळे कलाकारावर उपासमारीची वेळ आली हे मात्र नक्की. तरीही या गोष्टीला न जुमानता मी माझ्या कलाक्षेत्रात आज सतत काम करत आहे. पेपरच्या काही मिळत नसलेल्या प्रॉब्लेममुळे पिंपळपानावरती कलाकृती निर्माण करत एक कलाक्षेत्रात वेगळा आदर्श निर्माण करून, या लोकांचा वेळेचा फायदा कलाक्षेत्रात केला आहे. आणि या पिंपळाच्या पानावरील कलेला मोठ्या प्रमाणात मागणी आहे. यामध्ये अनेक वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांची चित्र पिंपळाच्या पानावर रेखाटण्याचा प्रयत्न केलेला आहे. लवकरच ही परिस्थिती बदलून एकदा पुन्हा चित्रकलेत नव्याने सुरुवात करण्याची वाट पाहत आहे.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी अध्यक्ष शरद पवार, राज ठाकरे, नाना पाटेकर, देवेंद्र फडणवीस अमृता फडणवीस, प्रवीण तरडे, नागराज मंजुळे, झारखंड जिल्हाधिकारी रमेश घोलप, पुणे जिल्हाधिकारी नवल किशोर राम धवल, वेगवेगळ्या कलाक्षेत्रातील व सामाजिक राजकीय क्षेत्रातील अनेक व्यक्तींना पेन्सिलचित्र भेट दिल्या आहेत. चित्रकलेची आवड लहानपणापासूनच होती, साधारण पाचवीला असल्यापासून जनावरांना चारायला घेऊन गेल्यानंतर त्यांच्या पाठीवर चित्र काढायचो, घरामध्ये आई वडील मोठा भाऊ वहिनी, असे कुटुंब आहे, कला क्षेत्रात काम करताना आई-वडील व भावांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. सध्या चित्रकलेच्या माध्यमातून आई-वडिलांसाठी होईल त्या प्रकारे मदत करत आहे. जास्त करून व्यक्तींची चित्र रेखाटण्याचा प्रयत्न करतो. यामध्ये अनेक गुरूंचे मार्गदर्शन लाभले.

सध्या लॉकडाउनच्या काळात, पेपरची कमतरता पैशाचा अभाव या कारणांमुळे चित्रकला येणार कुठेतरी प्राधान्यक्रम निर्माण झाल्यामुळे पैशाची अडचण निर्माण होऊ लागले आणि त्यामधूनच, टिक टॉक वर काही व्हिडिओ बघितले आणि प्रेरणा घेऊन पिंपळाच्या पानावर हस्ताक्षर काढून ते विकण्याचा प्रयत्न चालू केला. कदाचित साहित्याचा अभाव असल्यामुळे मी पिंपळाचे पान तयार करण्याचा निर्णय घेतला. आणि खऱ्या अर्थाने चित्रकलेला एक वेगळं वळण भेटलं. या चार महिन्यांमध्ये बरेच काम आली परंतु साहित्याच्या कमतरतेमुळे बरीच काम हातातून गेली. अशाप्रकारे या लोकांचा फटका कलाक्षेत्रात मोठ्या प्रमाणात या चार महिन्यांमध्ये प्रत्येक कलाकारांना सोसावा लागला.त्यासाठी शासनाने लक्ष देऊन मदत करणे गरजेचे आहे..

10 TO 16 AUGUST 2020 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 08/08/2020 7:44 PM Page 1

C M Y K



क्राईम संध्या

# लातूर महापालिकेचा लोकाभिमुख उपक्रम

## डॅश बोर्डच्या माध्यमातून मिळणार कोव्हीड-१९ची अद्ययावत माहिती

**लातूर/प्रतिनिधी**

सर्वत्र कोरोनामय वातावरण झालेले असताना दुर्देवाने एखाद्या व्यक्तीला बाधा झाली तर कुठल्या रुग्णालयात जावे? कुठे बेड शिल्लक आहेत? यासह उपचार आणि रुग्ण संख्येबाबत अद्ययावत माहिती देणारा डॅशबोर्ड महापालिकेने विकसित केला असून शुक्रवारी तो कार्यान्वित करण्यात आला. महापालिकेच्या या उपक्रमामुळे शहरातील रुग्ण आणि नातेवाईकांची होणारी पळापळ थांबण्यास मदत होणार असून अद्ययावत माहिती डॅश बोर्डच्या माध्यमातून मिळणार कोरोनाची अद्ययावत माहिती bedinfo.mclatur.org या संकेत स्थळावर एकाच क्लिक मध्ये मिळू शकणार आहे.



लातूर शहरात कोरोना रुग्णांची संख्या वाढत असताना शहरातील नागरिकांना वेळोवेळी माहिती देता यावी, रुग्णांनाही परिपूर्ण माहिती मिळावी यासाठी डॅशबोर्ड विकसित करण्याची संकल्पना जिल्ह्याचे पालकमंत्री श्री अमित विलासराव देशमुख यांनी मांडली होती. लातूर शहर महानगरपालिकेने ही संकल्पना तातडीने अमलात आणण्यासाठी प्रयत्न केले. लातूरचे रहिवासी शिवकुमार महाजन यांनी हा डॅशबोर्ड विकसित केला आहे. लातूर शहरात एकूण कोरोना पॉझिटिव रुग्णांची संख्या किती आहे? आज क्टिव्ह असणारे रुग्ण किती? किती जणांना रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला, याची माहिती या डॅशबोर्ड द्वारे मिळू शकणार आहे. त्यापेक्षाही महत्वाचे म्हणजे एखादा व्यक्ती कोरोना पॉझिटिव्ह आढळल्यानंतर उपचार कुठे घ्यावे हे त्याला स्वातंत्र्य असते. अशावेळी रुग्णालयात प्रत्यक्ष जाऊन विचारपूस करण्यास वेळ नसतो. या डॅशबोर्डच्या माध्यमातून ही माहिती देखील दिली जात आहे.

शासकीय रुग्णालयात उत्तम पद्धतीने उपचार केले जात आहेत. शहरात खासगी रुग्णालयातही उपचार सुरू आहेत. या सर्व ठिकाणी एकूण किती बेड उपलब्ध आहेत? त्या रुग्णालयात किती रुग्ण उपचार घेत आहेत ? किती बेड शिल्लक आहेत ?याची माहिती आता घरबसल्या मिळणार आहे. रुग्णालयाचा पत्ता, मोबाईल क्रमांक, बेडची संख्या तसेच नेमलेले नोडल ऑफिसर आणि त्यांचा संपर्क क्रमांकही बोर्ड मध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे. दररोज नव्याने आढळणारे रुग्ण व डिस्चार्ज होणाऱ्या रुग्णांची संख्या अद्ययावत केली जाणार आहे.यामुळे शहरातील नागरिकांना कोरोनाच्या सद्यस्थितीची माहिती एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. कोरोना वाढत असताना अफवा देखील पसरत आहेत. रुग्ण व मृत्यूची खोटी संख्या याच्यासोबतच सर्वत्र बेड शिल्लक नसल्याच्याही अफवा पसरविल्या जात आहेत.या डॅशबोर्डमुळे अशा प्रकाराला आळा बसणार आहे शुक्रवारी (दि.७ ऑगस्ट )महापालिकेत या डॅशबोर्डचे अनावरण करण्यात आले. महापौर विक्रांत गोजमगुंडे, उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, स्थायी समितीचे सभापती दीपक मठपती, नगरसेवक सुनील मलवाड यांच्यासह अधिकाऱ्यांची यावेळी उपस्थिती होती.लातूर शहराला लवकरात लवकर कोरोनामुक्त करण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे. त्या अनुषंगाने विविध उपाय योजना केल्या जात असून शहरातील नागरिकांनी स्वतःची सुरक्षितता बाळगावी. विनाकारण घराबाहेर पडणे टाळावे, असे आवाहन महापौर विक्रांत गोजमगुंडे व उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांनी केले आहे.

# जिल्हास्तरीय शोध बचाव पथकाची नागझरी बॅरेज येथे रंगीन तालीम



**लातूर/प्रतिनिधी**

जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जी श्रीकांत यांच्या निर्देश वरून व निवासी उपजिल्हाधिकारी प्रदीप कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर अंतर्गत लातूर शहर महानगरपालिका अग्निशमन विभाग, पोलीस प्रशासन, महसुल विभाग, होमगार्ड, पाटबंधारे विभाग या सर्व विभागाच्या सहभागाने दि.०४ ऑगस्ट २०२० रोजी मांजरा नदीवरील मौजे नागझरी तालुका रेणापूर येथील नागझरी बॅरेज येथे जिल्हा स्तरीय शोध व बचाव पथकाची पूर प्रतिसाद व शोध व सुटका यासंदर्भात प्रात्यक्षिक व रंगीत तालीम घेण्यात आली. या वेळी इंफ्लॅटेबल रबर बोट, ओबीएमची माहिती देण्यात आली.

पूर परिस्थितीमध्ये करावयाच्या शोध सुटका व बचाव, स्थलांतरण व प्रथमोपचार याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले व प्रात्यक्षिक घेण्यात आले. यावेळी लातूर शहर महानगरपालिकेचे सन्माननीय महापौर विक्रांतजी गोजमगुंडे, उपमहापौर, चंद्रकांतजी बिराजदार साहेब, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी साकेबजी उस्मानी, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता, श्रीमती रुपाली ठोंबरे, उपविभागीय अभियंता कोंडे, लातूर महानगरपालिकेचे मुख्य अग्निशमन अधिकारी जाफर शेख, उदगीर नगरपरिषदचे अग्निशमन अधिकारी विशाल आल्टे, अहमदपूर अग्निशमन अधिकारी पानपट्टे,आपत्ती व्यवस्थापन विभागाचे गोपाळ शिंगडे, श्रीराम वाघमारे, वाजिद शेख, गोविंद भुरेवार, इंद्रठाणा गावचे सरपंच रउफ पटेल, आनंद शिंदे, जिल्हास्तरीय शोध व बचाव पथकाचे सदस्य, लातूर अग्निशमन विभागाचे कर्मचारी, रेणापूर, मुरुड, अहमदपूर, येथील पोलिस कर्मचारी, होमगार्ड, कार्यक्षेत्रातील मंडळाधिकारी तलाठी ग्रामसेवक सरपंचगावातील नागरिक उपस्थित होते. कोरोनाच्या पार्श्र्वभूमीवर शारीरिक अंतर ठेवून सदर पूर प्रतिसाद शोध व सुटका या विषयाचे प्रशिक्षण व प्रात्यक्षिक कार्यक्रम जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या माध्यमातून यशस्वीरीत्या पार पाडण्यात आले. यासाठी राधाकृष्ण कासले, अनंत भालेराव शिरसागर प्रवीण गायकवाड आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# निलंगा तालुका पत्रकार संघाच्या वतीने माजी मुख्यमंत्री स्व. डॉ.शिवाजीराव पाटील निलंगेकर यांना श्रद्धांजली!



**देवणी/प्रतिनिधी**

निलंगा तालुका पत्रकार संघाच्या वतीने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांना शुक्रवार दिनांक ७ ऑगस्ट रोजी शासकीय विश्रामगृह निलंगा येथे आयोजित बैठकीत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर उपस्थित सर्व पत्रकारांनी अशोक बंगला येथे निलंगेकरांच्या निवासस्थानी जाऊन निलंगेकर कुटुंबीयांचे पत्रकारांच्या वतीने सांत्वन करण्यात आले. या प्रसंगी अशोकराव पाटील निलंगेकर, आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर, विजय पाटील निलंगेकर, अरविंद पाटील निलंगेकर, डॉक्टर अरुण डावळे आदी उपस्थित होते. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष राम काळगे, सचिव झटिंगराव म्हेत्रे, मोहन क्षीरसागर, संजय इंगळे,श्रीशैल बिराजदार, मोईज सितारी, शिवाजी पारेकर, सुधीरनाना रामदासी, समीर नाईक, साजिद पटेल, हरिभाऊ सगरे, आयुब बागवान, द्रोणाचार्य कोळी, असलम झारेकर यासह मोठ्या संख्येने तालुक्यातील पत्रकार उपस्थित होते.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची सम्राट मित्रमंडळाची मागणी

**अहमदपूर/फिरोज शेख**

माळेगांव (यात्रा) ता.लोहा जि.नादेड येथील भारतरत्न बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूतळ्याची विटंबना करणाऱ्या समाजकंटकांचा शोध घेवून तातडीने कठोर कारवाई करावी अशी आग्रही मागणी सम्राट मित्रमंडळाच्या वतीने यूवकनेते डॉ. सिध्दार्थकूमार सूर्यवंशी यांनी एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. आज येथील सम्राट मित्रमंडळाच्या वतीने पुतळा विटंबना प्रकरणी निषेधाचा निवेदन तहसिलदार यांच्या मार्फत मुख्यमंत्री उध्दवजी ठाकरे यांच्या कडे देण्यात आले. सदरील निवेदनात पूढे म्हटले आहे की, मौजे माळेगाव (यात्रा) तालुका लोहा जिल्हा नांदेड येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा अनेक वर्षापासून उभा आहे.काही समाजकंटकांनी जातीय भावनेने ५ ऑगस्ट २०२० च्या रात्री विटंबना केली आहे.या घटनेचा आम्ही जाहीर निषेध व्यक्त करून खालील मागण्या करीत आहोत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्या आरोपींचा समाजकंटकांचा शोध घेऊन त्यांच्यावर तातडीने कठोरातील कठोर कारवाई करण्यात यावी. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या देखभालीसाठी दूरूस्ती आणी संरक्षणाची जबाबदारी ग्रामपंचायत कार्यालय माळेगाव तालुका लोहा जिल्हा नांदेड यांच्यावर तातडीने देण्यात यावी. अशाप्रकारे भविष्यामध्ये राज्यात अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घेऊन पुतळ्याच्या संरक्षणासाठी शासनाने कठोर पावले उचलावीत आणी राज्यातील पुतळ्याच्या देखभालीसाठी तातडीने विशेष उपाययोजना करण्यात येवून आवश्यकते प्रमाणे निधीची उपलब्धता करण्यात यावी आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. या निवेदनावर डॉ.सिध्दार्थकूमार सूर्यवंशी, गोविंद गीरी, आकाश सांगविकर, अजय भालेराव, सचिन बानाटे, इंद्रजित वाघमारे, गणेश मदने, अमोल कांबळे, रोहिदास तिगोटे, आकाश वाघमारे, पठाण शहारूख, नूर मोहम्मद, प्रशांत जाभाडे, मोहम्मद पठाण, मूजम्मील खूरेशी, मल्हारी सोनकांबळे, शरद बनसोडे, धम्मानंद कांबळे आदींचे नांवे आहेत.




# अयोध्या येथील राममंदिराच्या भूमिपूजना निमित्त वाड्यात श्रीरामाच्या प्रतिमेचे पूजन



**वाडा/प्रतिनिधी**

अयोध्येत बुधवारी झालेल्या श्रीराम मंदिराच्या भूमिपूजन कार्यक्रमाच्या निमित्ताने भाजप वाडा तालुकाच्या वतीने येथील पक्ष कार्यालयात श्रीराम प्रतिमा पूजन व कारसेवकांच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बुधवारी अयोध्येत राममंदिराचे भूमिपूजन झाले. याच पार्श्वभूमीवर वाड्यातील भाजप कार्यालयात श्रीराम प्रतिमेचे पूजन करण्यात आले व राममंदिर आंदोलना दरम्यान वाडा तालुक्यातील कारसेवा करण्यासाठी गेलेल्या कारसेवकांचा सत्कार वाडा तालुका भारतीय जनता पक्षाच्या वतीने पक्ष कार्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात करण्यात आला. यावेळी कारसेवकांनी त्या आंदोलनावेळेचे अनुभव कथन केले. अयोध्येत पंतप्रधानांच्या हस्ते भूमिपूजन होत असतांना येथील कार्यकर्त्यांनी फटाक्यांची आतषबाजी करुन व पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. या कार्यक्रमास माजी आदिवासी विकास मंत्री विष्णू सवरा, भाजपचे जेष्ठ नेते बाबाजी काठोळे, राज्य कार्यकारिणी सदस्य डॉ. हेमंत सवरा, जिल्हाध्यक्ष नंदकुमार पाटील, जिल्हा उपाध्यक्ष संदीप पवार, तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, महिला आघाडीच्या पदाधिकारी, तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनिष देहेरकर यांनी केले.

# माजी मुख्यमंत्री डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**निलंगा/प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर यांचे आज (दि. ५ ऑगस्ट) पहाटे पुणे येथील रुग्णालयात निधन झाले. आज दुपारी निलंगा येथे त्यांच्या घरी पार्थिव सामान्य नागरिकांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आले होते . त्यानंतर सायंकाळी निलंग्याजवळील निलंगेकर कुटुंबियांच्या शेतात शासकीय इतमामात डॉ. शिवाजीराव पाटील - निलंगेकर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पार्थिवास पुत्र शरदराव, अशोकराव आणि विजयराव तसेच नातू संभाजी पाटील - निलंगेकर यांनी मुखाग्नी दिला.प्रारंभी वैदिक पध्दतीने मंत्रोपोचार करण्यात आले.



त्यानंतर पोलीस प्रशासनाच्या वतीने हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडून डॉ. पाटील - निलंगेकर यांना मानवंदना देण्यात आली. हा अंत्यविधी कार्यक्रम शासकीय इतिमामात करण्यात आला. जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी जी. श्रीकांत यांनी डॉ. पाटील - निलंगेकर यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. तसेच पोलीस अधीक्षक राजेंद्र माने यांनी ही पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. अतिरिक्त पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, उप विभागीय अधिकारी विकास माने, उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश देशमुख, नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे यांनी पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले. तसेच उस्मानाबाद चे खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी ही पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सम्पूर्ण देशभरातून आलेल्या शोक संदेशाचे वाचन करण्यात आले. यामध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, पालकमंत्री अमित देशमुख यांचे शोक संदेश वाचण्यात आले. यावेळी माजी पालकमंत्री तथा निलंगा विधानसभा मतदार संघाचे आ. संभाजी पाटील निलंगेकर,डॉ . निलंगेकर यांचे पुत्र शरदराव, अशोकराव, विजयराव व मुलगी चंद्रकला यासह सर्व निलंगेकर कुटुंबिय उपस्थित होते.

तसेच यावेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहुल केंद्रे, उपाध्यक्ष श्रीमती साळुंखे, माजी खासदार सुनील गायकवाड, माजी आमदार शिवाजी पाटील - कव्हेकर यांच्यासह अन्य लोकप्रतिनिधी, अधिकारी, पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. डॉ. निलंगेकर हे १९८५ ते ८६ या दरम्यान राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यांनी राज्याच्या मंत्रिमंडळात त्या आधी अनेक महत्त्वाच्या खात्यांचा कारभार सांभाळला होता. त्यांच्या मागे पत्नी, तीन मुलगे, एक मुलगी आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# मानकोली चिंचोटी रस्त्याची चाळण



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडीतील मानकोली चिंचोटी महामार्गावर सध्या खड्डयांचे साम्राज्य पसरले असून अंजुरफाटा ते खारबावपर्यंत या रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. या खड्डेमय रस्त्यांवरून वाहन चालवितांना वाहन चालकांना अनेक अडचणी येत आहेत. विशेष म्हणजे हा रस्ता बीओटी तत्वावर देण्यात आला असून सुप्रीम कंपनीतर्फे सध्या या रस्त्याची देखभाल दुरुस्ती व टोल वसुली करण्यात येत आहे. हा महामार्ग चिंचोटी येथे मुंबई अहमदाबाद महामार्गाला जोडत असून मानकोली येथे मुंबई नाशिक महामार्गाला जोडला जातो. तसेच भिवंडीत या मार्गावर गोदाम पट्टा मोठ्या प्रमाणात विकसित झाला असल्याने या चिंचोटी मानकोली महामार्गावर अवजड वाहनांची नेहमीच वर्दळ सुरु असते. या माध्यमातून टोल कंपनीला मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा होत असतो मात्र आर्थिक फायदा होऊनही टोल वासून करणाऱ्या सुप्रीम कंपनीचे रस्त्याच्याया देखभाल दुरुस्तीकडे पुरता दुर्लक्ष होत आहे. या रस्त्यावर नेहमीच मोठमोठे खड्डे असल्याने या महामार्गावर नेहमीच अपघात होत असून अनेकांना आपला जीव गमवावा लागत आहे. मात्र या रस्त्याची देखभाल करणाऱ्या सुप्रीम कंपनी त्यासंदर्भात काहीच देणं घेणं नसून केवळ आर्थिक नफा मिळविणे हे एकमेव उद्देश या टोल वसूल करणाऱ्या कंपनीने ठेवले आहे. विशेष म्हणजे राजकीय वरदहस्तामुळे सुप्रीम कंपनी स्थानिकांच्या गंभीर समस्येकडे व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सुचनांकडे नेहमीच दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे हा रस्ता दुरुस्त करण्याचे आदेश शासनाने त्वरित सुप्रीम कंपनीला द्यावे अशी मागणी वडघर येथील स्थानिक नागरिक व पत्रकार नितिन पंडीत यांनी केली आहे.

# विरार पोलिसांनी केली मोटारसायकल चोरट्याला अटक

**विरार/प्रतिनिधी**

विरार पोलिसांनी एका मोटार सायकल चोराला अटक केली असून त्याच्याकडून चोरीच्या चार मोटार सायकल जप्त करण्यात आल्या आहेत. या मोटार सायकलींची किमत १ लाख १५ हजार इतकी आहे. विशेष म्हणजे हा मोटार सायकलचोर गॅरेजवाला आहे. विरार पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर मोटार सायकल चोरीचे गुन्हे घडत असल्याने त्याची गंभीर दाखल घेऊन पालघर जिल्हा पोलीस अधीक्षक दत्तात्रय शिंदे यांनी या गुन्ह्याच्या तपासाचे आदेश दिले होते. त्यानुसार अप्पर पोलीस अधीक्षक विजयकांत सागर वसईच्या उपविभागीय पोलीस अधिकारी रेणुका बागडे आणि विरारचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश वराडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा प्रकटीकरण शाखेच्या पोलीस पथकाने तपास सुरु केला आणि खास बातमीदाराने दिलेल्या माहितीवरून नालासोपारा येथील गॅरेजवाला मोहम्मद मुद्दसर उर्फ मोहसीन मोहम्मद खलील खान (२१) याला अटक केली. त्याच्याकडून होंडा डिओ कंपनीची एम एच ४८ यु २२६७ क्रमांकाची मोटार सायकल तसेच दिएलेस कंपनीची एमएच ४८ ए बी ९००६ मोटार सायकल किमत ३०,००००, दिओ मोडेल काळ्या रंगाची एम एच ४८ ए एन २५८९ क्रमांकाची मोटार सायकल आणि एम एच ४८ एएफ ३६८२ क्रमांकाची स्कूटर अशा चार गाड्या जप्त करण्यात आल्या. या कारवाईत विरार पोलीस ठाण्याचे उप निरीक्षक संदेश राणे, स.फौ.राजेश वाघ,पो.ह. सचिन लोखंडे, पो.न. सचिन घेरे, विजय दुबळा, हर्षद चव्हाण, भूषण वाघमारे, पो.शी. इंद्रनील पाटील, विशाल लोहार, सुनील जाधव, रवी वानखेडे आणि सुनील पाटील यांनी भाग घेतला.



विरार पोलिसांनी केलेल्या कारवाईत पडलेला मोटारसायकल चोर आणि त्याने चोरलेल्या मोटारसायकल छायाचित्रात दिसत आहेत

C M Y K